१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, गुरुवार ९ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-३५, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 35 Marathi - Daily - Mumbai, 9 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

युद्धाचे संकट टळले? ट्रम्प यांचा मोठा निर्णय !

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# अमेरिकेची माघार! दोन आठवडे युद्धबंदी! पाकिस्तानची मध्यस्थी

## इराणच्या दहा अटी! शुक्रवारी इस्लामाबादला चर्चा

■ वॉशिंग्टन



**इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणविरुद्ध छेडलेल्या युद्धाला आज ४० दिवसांनंतर अचानक कलाटणी मिळाली. कालपर्यंत इराणला एका रात्रीत बेचिराख करून टाकण्याच्या धमक्या देणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज अचानक दोन आठवड्यांसाठी युद्धबंदी झाल्याची घोषणा केली. इराणने यावर अमेरिकेपुढे दहा अटी मांडल्या आहेत. इराणने ही तात्पुरती युद्धबंदी मान्य केली असली तरी शुक्रवारी इराणच्या अटींबाबत पाकिस्तानच्या इस्लामाबाद शहरात चर्चा होणार आहे. ही चर्चा यशस्वी झाली तर युद्ध कायमचे थांबेल, ट्रम्प यांना या युद्धातून माघार घ्यावीच लागणार असल्याने चर्चा सकारात्मक होईल अशी अपेक्षा आहे. त्यातूनच आज शेअर बाजाराने उसळी घेतली. मात्र इस्त्रायलने अजूनही लेबनॉनवर हल्ले सुरूच राहतील असे जाहीर केले आहे.**



**गेले** सुमारे चाळीस दिवस संपूर्ण जगाला भेडसावणारी इंधन तुटवड्याची समस्या युद्धबंदीमुळे आता दूर होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे इराणविरुद्ध युद्धाला सुरुवातीपासून विरोध करणाऱ्या अमेरिकेतील खासदारांनी युद्धविरामाची घोषणा होताच ट्रम्प यांच्या विरोधात महाभियोग चालवण्याची आग्रही मागणी करून ट्रम्प यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला आहे.

दोन आठवड्यांचा युद्धविराम घोषित करताना ट्रम्प यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या मध्यस्थीमुळे आपण हा प्रस्ताव मान्य केला असे सांगत शरीफ यांचे जाहीर आभार मानले. आजचा दिवस विश्वशांतीसाठी अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे, असे ट्रुथ सोशलवर पोस्ट करीत ट्रम्प यांनी या निर्णयाची भलामण केली. दुसरीकडे इराणने युद्धविराम म्हणजे इराणचा विजय आहे, अशी जाहीर भूमिका घेतली. इराणच्या जनतेनेदेखील युद्धविरामाचे जल्लोषात स्वागत केले. इराणची राजधानी तेहरानमध्ये हजारोंच्या संख्येने लोक रस्त्यावर उतरले. हातात देशाचा राष्ट्रध्वज घेतलेल्या इराणी नागरिकांनी विजयाचा जल्लोष साजरा केला. तेहरानमधील या जल्लोषाचे फोटो आणि व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाले. इराणचे सरकार आणि सरकारी प्रसारमाध्यमांनी हा इराणचा ऐतिहासिक विजय असल्याचे म्हटले आहे. इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेने यासंदर्भात एक निवेदन जारी केले आहे. इराणने आपली सर्व उद्दिष्टे साध्य केली असून, शत्रूला घोर अपयशाचा सामना करावा लागत आहे, असे या निवेदनात म्हटले आहे. इराण प्रमाणे इस्त्रायलमध्येही नागरिकांनी जल्लोष केला. होर्मुजची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी ट्रम्प यांनी इराणला दिलेली मुदत मंगळवारी रात्री अमेरिकेत आठ वाजता संपत होती. तोपर्यंत जर पान ७ वर

### युद्धविरामानंतर काही तासांतच हल्ले

अमेरिका आणि इराण यांनी युद्धविराम करण्यास सहमती दर्शवल्यानंतर काही तासांतच संयुक्त अरब अमिरात, कुवेत व बहारिनवर इराणने क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केले. या हल्ल्यांनंतर अबु धाबीमधील एका गॅस प्रक्रिया केंद्राला आग लागली. तर इस्त्रायलने इराणच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पावर आणि लेबनॉनमध्ये हल्ले चढवले. या हल्ल्यांमुळे युद्धविराम टिकणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### शेअर बाजारात तेजीची लाट सेन्सेक्स व निफ्टी वधारले

इराण-अमेरिका युद्धविरामाचा भारतीय शेअर बाजारावर सकारात्मक परिणाम झाला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स तब्बल २,९४६.३२ अंकांनी तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी ८७३.७० अंकांनी उसळला. युद्धविरामाच्या वृत्तामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली. प्रति पिंप ११० डॉलरच्या पुढे गेलेल्या कच्च्या तेलाच्या किमती प्रति पिंप ९५ डॉलरपर्यंत घसरल्या. त्याचा फायदा शेअर बाजारातील व्यवहारांमध्ये दिसून आला. दुसरीकडे रिझर्व्ह बँकेच्या पत धोरण समितीच्या आज झालेल्या बैठकीत रेपो रेट ५.२५ वर कायम ठेवण्यात आला. त्याचाही सकारात्मक परिणाम शेअर बाजारावर झाला. सेन्सेक्स आणि निफ्टीने अनुक्रमे ३.७८ आणि ३.९५ टक्क्यांची मोठी वाढ नोंदवली. सेन्सेक्स ७७,५६२.९० अंकांवर तर निफ्टी २३,९९७.३५ अंकांवर स्थिरावला.

पोटातील गॅसचा बाजार उठवण्यासाठी धौती-योग® चूर्ण व टॅबलेट्स आजच रात्री घ्या, सकाळी OK! डॉ. अभिजीत 9422011723

## संजय शिरसाटांच्या मुलाच्या हॉटेल खरेदीची चौकशी पूर्ण

■ मुंबई

**सामाजिक** न्याय मंत्री संजय शिरसाट यांचे पुत्र सिद्धांत शिरसाट याच्या छत्रपती संभाजीनगर विटस हॉटेल खरेदी प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली असून, संबंधित अहवाल राज्य सरकारकडे सादर करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील रेल्वे स्टेशन रोडवरील धनदा कॉर्पोरेशनच्या मालकीचे या हॉटेलच्या लिलावावरून वाद निर्माण झाला होता.

सिद्धांत शिरसाट यांच्या कंपनीने सुमारे ६४ कोटी ८३ लाख रुपयांची बोली लावून हॉटेल आणि जागा खरेदी केली होती. मात्र, या मालमत्तेचे बाजारमूल्य सुमारे १५० कोटी रुपये असल्याचा दावा करत विरोधकांनी कमी

### अहवाल राज्य सरकारकडे सादर

किमतीत व्यवहार झाल्याचा आरोप केला होता. तसेच दबाव टाकून लिलाव प्रक्रिया पार पाडल्याचीही टीका करण्यात आली होती. त्यानंतर सिद्धार्थ शिरसाट यांनी आपली बोली मागे घेतली होती.

## शिखर बँक घोटाळा! रोहित पवारांच्या याचिकेवर गुणवत्तेनुसार निर्णय घ्या

■ मुंबई

**कथित** शिखर बँक घोटाळा प्रकरणी शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्यासह इतर आरोपींनी दाखल केलेल्या दोषमुक्ततेच्या अर्जांवर गुणवत्तेच्या आधारे निर्णय घेण्यात यावा, अशी विनंती ईडीच्या वतीने मुंबई सत्र न्यायालयातील विशेष न्यायालयाला करण्यात आली. शिखर बँक घोटाळा प्रकरणी दाखल केलेला 'क्लोजर रिपोर्ट' न्यायालयाने स्वीकारल्यानंतर ईडीने कोर्टात ही भूमिका मांडली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणावरील सुनावणी १३ एप्रिलपर्यंत तहकूब केली आहे.



### ईडीची कोर्टात मागणी

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (शिखर बँक) घोटाळा प्रकरणी २००५ ते २०१० या कालावधीत मोठ्या प्रमाणात सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, कारखाने आणि इतर कंपन्यांना कर्ज देण्यात आले होते. मात्र, ही सर्व कर्ज पुढे बुडीत निघाली होती. नंतर हे कारखाने बँकेने संचालकांच्या निकटवर्तीयांना स्वस्तात विकले. या बँकेचे तत्कालीन संचालक असलेल्या माजी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार रोहित पवार यांच्यासह अन्य ७० जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले पान ७ वर

## भोंदूबाबा खरातला दुसऱ्या गुन्ह्यात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

■ नाशिक

**राज्यभरात** खळबळ उडवून देणाऱ्या नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातला नाशिक न्यायालयाने दुसऱ्या गुन्ह्यात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तसेच आरोपीला उद्या तिसऱ्या गुन्ह्यात पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे.

न्यायालयाने यापूर्वी खरातला ८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी दिली होती. ती मुदत संपल्यानंतर आज त्याला पुन्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आले. सुरक्षेच्या कारणास्तव यावेळीही त्याला प्रत्यक्ष न्यायालयात न आणता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारेच हजर करण्यात आले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने त्याची ओळख पटवण्यासाठी थेट त्याचे नाव विचारले आणि त्यानंतर दुसऱ्या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडी देण्याचा निर्णय दिला. आजच्या सुनावणीत आरोपीचे वकील सचिन भाटे, सरकारी बाजू मांडण्यासाठी शैलेंद्र बागडे आणि तपास अधिकारी किरण कुमार सूर्यवंशी उपस्थित होते. यावेळी पुढील गुन्ह्यांमध्ये आरोपीचा ताबा पान ७ वर

## भाजपा पाठीशी राहणार फडणवीसांचा सुनेत्रा यांना शब्द

**मुंबई -** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभेसाठीची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. सध्या या पोटनिवडणुकीचे वारे वाहत आहे. या पोटनिवडणुकीसाठी महायुतीकडून अजित पवारांच्या पत्नी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांना संधी देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची



वर्षा या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत फडणवीस यांनी सुनेत्रा पवार यांना भाजपा मोठा भाऊ म्हणून पाठीशी उभा राहील, असा विश्वास दिला आहे. सुनेत्रा पवार आज सकाळी वर्षा बंगल्यावर दाखल झाल्या. त्यांच्यासोबत पार्थ पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे व मंत्री हसन मुश्रीफ उपस्थित होते. एक तास चाललेल्या या बैठकीत बारामतीतील सध्याची राजकीय परिस्थिती, निवडणूक रणनीती व महायुतीतील समन्वय यावर चर्चा झाल्याची माहिती आहे.

## बारामती व राहुरीत अर्ज माघारीचा आज शेवटचा दिवस

**मुंबई -** राज्यातील बारामती आणि राहुरी या दोन विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकांसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होणार असून, ४ मे रोजी मतमोजणी पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच राहुरीचे आमदार शिवाजी भानुदास कर्डिले यांच्या निधनामुळे या दोन्ही जागा रिक्त झाल्या होत्या. बारामती पोटनिवडणुकीत एकूण ५५ उमेदवारांनी ६८ अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ५३ अर्ज वैध ठरले, तर १५ अर्ज बाद करण्यात आले. त्यातील १३ अर्ज दुहेरी असल्यामुळे रद्द करण्यात आले, तर २ अर्ज तांत्रिक कारणांमुळे बाद झाले. राहुरी पोटनिवडणुकीसाठी ३० उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. छाननीत ७ अर्ज बाद करण्यात आले. त्यानंतर एका उमेदवाराने तत्काळ माघार घेतली. सध्या २२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव यांनी दिली.

## रिझर्व्ह बँकेकडून रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम



■ मुंबई

**भारतीय** रिझर्व्ह बँकेचे बाजाराच्या अपेक्षांनुसार रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवला आहे. सहा सदस्यीय चलनविषयक धोरण समितीने दोन दिवस चर्चा केल्यानंतर हा निर्णय एकमताने घेतला.

विशेष म्हणजे, रेपो दराची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत दोन्ही बाजूचा युद्धविराम जाहीर केल्यानंतर काही तासांतच करण्यात आली. या दोन आठवड्यांच्या युद्धविरामामुळे जागतिक बाजारात तेजी आली आहे. चलनविषयक धोरण समिती दर दोन महिन्यांनी महत्त्वाच्या आर्थिक निर्देशकांचा आढावा घेते आणि धोरणात्मक निर्णय घेते. रिझर्व्ह बँकेने ऑगस्ट, ऑक्टोबर २०२५ आणि फेब्रुवारी २०२६ च्या धोरणांमध्येही दर कायम ठेवले होते. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी याविषयी बोलताना म्हणाले की, मौद्रिक धोरण समितीने तटस्थ भूमिका कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. देशांतर्गत महागाईच्या आघाडीवर आकडेवारी उत्साहवर्धक आहे. महागाई नियंत्रणात असून, विकासाचा दृष्टिकोन सकारात्मक आहे. मात्र, अन्नधान्याच्या किमती किंचित वाढल्या आहेत.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## शिवरायांचा पुतळा हटवण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

■ पणजी

**मुंबई** उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने वास्कोत बेकायदेशीरपणे उभारण्यात आलेला शिवाजी महाराजांचा पुतळा हटवण्याचे आदेश गोवा सरकारला दिले आहे. हा पुतळा बेकायदेशीर असल्याच्या तक्रारी येऊनदेखील काहीही कारवाई न केल्याबद्दल न्यायालयाने गोवा सरकारला खडे बोलही सुनावले.

मडगाव बंदर प्राधिकरणाच्या (एमपीए) जमिनीवर शिवाजी महाराजांचा हा पुतळा उभारण्यात आला होता. याबद्दल बंदर प्राधिकरणाने वारंवार बोगडा पोलीस ठाण्यात तक्रारी केल्या.तसेच अन्य संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या. मात्र कोणीही तक्रारींची दखल घेतली नाही. त्यामुळे अखेर प्राधिकरणाने मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात याचिका दाखल केली.

## पालिकेचा २०० कोटींचा भूखंड ५ कोटींमध्ये जिंदाल कंपनीला



■ मुंबई

**वांद्रे** पश्चिम येथील आर. के. पाटकर मार्गावरील महापालिकेच्या भूखंडाबाबत वाद निर्माण झाला आहे. नर्सिंग कॉलेज उभारण्यासाठी राखीव असलेला हा भूखंड पालिकेने जिंदाल कंपनीला (जेएसडब्ल्यू) ३० वर्षांच्या भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय घेतल्याचा आरोप मनसे नेते संदीप देशपांडे यांनी केला आहे. सुमारे २०० ते २५० कोटींच्या या भूखंडाच्या बदल्यात महापालिकेला अत्यल्प मोबदला मिळणार असल्याचेही त्यांनी पत्रकार परिषदेत म्हटले आहे.

संदीप देशपांडे म्हणाले की, वांद्रे पश्चिम येथील

### संदीप देशपांडेंचा आरोप

आर. के. पाटकर मार्गावर २३३६ स्क्वेअर मीटरचा एक भूखंड आहे. हा भूखंड महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यासाठी राखीव असून, त्यावर नर्सिंग कॉलेज उभारण्याचा महापालिकेचा प्रस्ताव होता. केईएम, सायन, नायर यांसारख्या महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये काम करणाऱ्या नर्स आणि पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी अशी महाविद्यालये उभारली जातात. त्यानंतर त्यांना रुग्णालयांमध्ये नियुक्त केले जाते. या महाविद्यालयातून आरोग्य खात्यासाठी आवश्यक असलेला नर्स आणि पॅरामेडिकल स्टाफ उपलब्ध होणार होता. पान ७ वर

## सोने-चांदी दरात मोठी उसळी २४ कॅरेट सोने १.५२ लाखांवर

■ नवी दिल्ली

**अमेरिका** आणि इराण यांच्यातील दोन आठवड्यांच्या युद्धविरामानंतर सुरक्षित गुंतवणुकीकडे वाढलेल्या कलामुळे सोन्याच्या किमतीत झपाट्याने वाढ झाली आहे.आज १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा भाव तब्बल ४ हजार रुपयांनी वाढून १.५२ लाख रुपयांवर पोहोचला आहे. यापूर्वी ७ एप्रिल रोजी हा दर १.४८ लाख रुपये होता. त्याचप्रमाणे, चांदीच्या किमतीतही मोठी वाढ झाली असून, एक किलो चांदीचा भाव १३ हजार रुपयांनी वाढून २.४४ लाख रुपयांवर गेला आहे. यापूर्वी तो २.३१ लाख रुपये प्रति किलो होता. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या माहितीनुसार, १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा दर १,५२,०६८ रुपये, तर २२ कॅरेट सोन्याचा दर १,३९,२५४ रुपये नोंदवला गेला आहे.


## देशाच्या ग्रामीण भागात १० टक्के श्रीमंतांकडे ४४ टक्के जमीन!

### तब्बल ४६ टक्के कुटुंबे पूर्णपणे भूमिहीन

**भारतातील ग्रामीण भागात जमिनीच्या मालकीमध्ये मोठी विषमता दिसत असून, अवघ्या १० टक्के श्रीमंत कुटुंबांच्या ताब्यात एकूण शेतजमिनीपैकी ४४ टक्के जमीन आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील तब्बल ४६ टक्के कुटुंबे पूर्णपणे भूमिहीन आहेत, अशी माहिती 'वर्ल्ड इनइक्वॅलिटी लॅब' अर्थात जागतिक असमानता लॅबच्या अहवालातून समोर आली आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील आर्थिक असमानता उघड होत आहे.**

■ नवी दिल्ली

**या अहवालासाठी** ६५ कोटी लोकसंख्या आणि २.७० लाख गावांमधील डेटाचा अभ्यास करण्यात आला आहे. नितीन कुमार भारती, डेव्हिड ब्लेक्सली आणि समरीन मलिक यांनी हा शोधनिबंध संयुक्तपणे लिहिला आहे. भारतातील जमिनीच्या मालकी हक्काबाबतच्या आतापर्यंतच्या सर्वांत मोठ्या डेटासेटवर हा अभ्यास आधारित आहे. यामध्ये सरासरी एका गावात सर्वात मोठ्या जमीनदाराकडे गावातील सुमारे १२ टक्के जमीन असते, तर काही गावांमध्ये एकाच मालकाकडे ५० टक्क्यांहून अधिक



शेतजमीन आहे. नितीन कुमार भारती, डेव्हिड ब्लेक्सली आणि समरीन मलिक यांनी हा शोधनिबंध संयुक्तपणे लिहिला आहे.

## निवासी डॉक्टरांच्या महागाई भत्त्याबाबत आज मुंबई महापालिकेत महत्त्वाची बैठक

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिकेच्या रुग्णालयांमधील निवासी डॉक्टरांच्या वाढीव महागाई भत्त्याच्या प्रलंबित मागणीसंदर्भात उद्या पालिका उपायुक्तांनी महत्त्वाची बैठक बोलावली आहे. या बैठकीत वाढीव महागाई भत्ता लागू करण्याचा निर्णय न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा निवासी डॉक्टरांची संघटना 'मार्ड'ने दिला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या केईएम, नायर, सायन आणि कूपर रुग्णालयांमध्ये कार्यरत निवासी डॉक्टरांचे प्रतिनिधित्व महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडंट डॉक्टर्स अर्थात 'मार्ड' ही संघटना करते. राज्य सरकारने निवासी डॉक्टरांना १ जुलै २०२४, १ जानेवारी २०२५ आणि १ जुलै २०२५ पासून लागू होणाऱ्या वाढीव महागाई भत्त्याबाबत शासन निर्णय (जीआर) जारी केला आहे. मात्र हा जीआर काढल्यानंतरही निवासी डॉक्टरांना वाढीव महागाई भत्ता अद्याप लागू करण्यात आलेला नाही. सध्या निवासी डॉक्टरांना सुमारे ४४३ टक्के दराने महागाई भत्ता मिळतो. शासनाने हा दर वाढवून ४७४ टक्के केला आहे. त्यामुळे सुमारे ३१ टक्के एवढा फरक निर्माण झाला आहे. मागील २१ महिन्यांपासून ही फरकाची रक्कम राज्य सरकारकडे थकित आहे.

नवाकाळ

Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

मुंबईमध्ये पेशंटसाठी 12/24 तास आया, वॉर्डबॉय पाहिजेत. पगार (30,000-90,000) **9820628009** {NC254722}

पाहिजेत हेल्पर-११,०००/-, वेल्डर-१८,०००/-, फायबर मोल्डर- १८,०००/-, संपर्कः- **9869050766** {NC260042}

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार+ जेवण + निवास मोफत) घरकुल केअर सेंटर : **9819426634/ 9969529162** {NC260054}

सिक्युरिटी गार्ड पाहिजे- वांद्रे, वरळी रेस्टॉरंटसाठी. पगार-१८,०००+ PF, ESIC, जेवण, दोन सुट्टी. संपर्कः- **8291856090 / 8291107497** {NC260043}

अंधेरी येथील एका नामांकित हॉस्पिटलकरिता अनुभवी वॉर्डबॉय आणि आयाबाई पाहिजेत. 8 तास ड्युटी पगार 15000 व 12 तास ड्युटी पगार 21000 + इतर सुविधा संपर्कः **9321278125/ 8369185580** {NC260070}

फोरकलर कोमोरी मशीनसाठी बॉयलर आणि फिडरमन पाहिजेत. महापे, नवीमुंबई. **9820614018** {NC260066}

घरून ग्राफीक डिझाइनचे कोरलड्रॉ फोटोशॉप काम करणारे पाहिजे **9324069701** {NC260060}

शॉप १०, साई वर्ल्ड एम्पायर, सेक्टर ३६, खारघर येथील के के वाघ कब्स प्रीस्कुलच्या कामासाठी दिदी/मावशी/ जेन्टस हेल्पर/ सिक्युरिटी गार्ड पाहिजे. वय मर्यादा-५०वर्ष, वॉक इन इंटरव्युव्ह दिनांक- ८,९,१०,११ एप्रिल २०२६ वेळ- सकाळी ९ ते सायं. ४ {NC260057}

हेडलबर्ग 2 Col. SORMZ ऑफसेट मशीन प्रिंटर आणि फिडरमेन पाहिजेत. पार्टटाईम आणि फुलटाईम. संपर्क लुखाडिया प्रिंटर्स माझगांव **7977794971** {NC260002}

## पाहिजेत

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर/ जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत. पगार 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007/ 9892575886** दादर वेस्ट {NC254740}

वसई ईस्ट सातिवली येथे पंचिंग मशीन (पेपर) ऑपरेटर पाहिजे, अनुभव कमीत कमी ३ वर्ष, **9820858346** {NC260026}

अंबरनाथ स्टेशनजवळ प्रिन्टिग प्रेसमध्ये ऑफसेट GTO प्रिंटर पाहिजे. संपर्कः **9819853443/ 9321020846/ 9820892324** {NC260019}

दादरला मेनपावर ऑफीसमध्ये फोन अटेन्ड करण्यासाठी मुली पाहिजेत. पगार 15,000/- -18,000/- **(9920270431)** {NC260051}

पेस्ट कंट्रोल कामासाठी बोरिवली/ वसई ऑफीस टेक्निशियन/ सेल्ससाठी मुले/मुली पाहिजे. **9819660542** {NC260055}

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला फवारणी करणारी माणसे पाहिजे. पगार- 12,000 + गाडी भाडे + कमिशन **8356824867** {NC260049}

शिवडीयेथे स्टेशनजवळ कोमोरी न्यु लिथरॉन ५ कलर सेमी ऑटोप्लेट मशीनसाठी अनुभवी बॉयलर पाहिजे. त्वरित संपर्क करा- **9082517355** {NC260096}

पाहिजेत ऑफसेट मशीन ऑपरेटर प्रिंटर आणि हेल्पर पाहिजेत Mr. saleem **9820100757** {NC260097}

ड्रायफ्रूट पॅकींगसाठी मुले/मुली पाहिजेत पगार- २२,००० - २४,००० संपर्क- **9702078469** {NC260099}

वाशी, नवीमुंबई- फ्रेशर मुलगी पर्सनल असिस्टंट पाहिजे. वय 19 ते 25 वर्ष.-**9326583110** {NC260100}

## पाहिजेत

बोरिवली येथे ऑफीस बॉय त्वरित पाहिजेत. ऑफीस नं.१२, अनुराधा अनुजा बिल्डिंग, मानेकनगर, बोरीवली (प). फोन- **7021564823** {NC260098}

## Situation Vacant

Need office girl for admin/ back office work in santacruz (w) No.: **7710058797** {NC260053}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260031}


### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

**-मॅनेजर, 'नवाकाळ'**


### CHANGE OF NAME

I **Mrs. Shamshad Rashid Kazi,** HN 8 Patil House Madh Kaskar Wadi Vanela Tank Jetty Malad West Mumbai 400061. Changed My Name to **Mrs. Shweta Sanjay Phatak** As Per Affidavit dto. 23rd March 2026.
**Mrs. Shamshad Rashid Kazi**
**(Signature by old name)**


# गोव्यात 'ओंकार' हत्तीचा धुमाकूळ काजू, केळी बागायती केल्या फस्त

## सरकारने हस्तक्षेप करण्याची मागणी

■ पेडणे

**उत्तर** गोवा जिल्ह्यातील पेडणे तालुक्यातील मोपा परिसरात सध्या ओंकार हत्तीने धुमाकूळ घातला आहे.कडशी भागात ओंकार हत्तीने प्रवेश केला आहे. या ठिकाणी या हत्तीने शेतातील संरक्षण भिंती पाडल्या असून, काजू, केळी बागायती फस्त केल्या आहेत.विशेषतः कडशी येथील उमेश गाड यांच्या उभ्या चारचाकी वाहनावर हल्ला करत हत्तीने त्याचे नुकसान केले. तसेच एक दुचाकीही फोडली आहे.



'ओंकार' हत्तीच्या या आक्रमक रूपामुळे स्थानिक शेतकरी धास्तावले आहेत. याआधी सप्टेंबर महिन्यात ओंकार हत्तीने पेडणे तालुक्यातील तांबोसे, उगवे, तोरसे आणि वारखंड भागात मोठ्या प्रमाणावर नुकसान केले होते. त्यावेळी महाराष्ट्र वन विभागाने त्याला दोडामार्ग परिसरात त्याच्या मूळ कळपात सोडले होते.

मात्र, काही दिवसांपासून तो पुन्हा सीमाभागात सक्रिय झाला आहे. वनकर्मचारी ओंकारला मोपातून नेतार्डेच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, सीमेवर महाराष्ट्राचे अधिकारी आणि शेतकरी तैनात असून त्यांनी हत्तीला रोखून धरले आहे. या सीमावादामुळे हत्तीचा बंदोबस्त करणे कठीण झाले असून, राज्य सरकारने तातडीने यात हस्तक्षेप करून तोडगा काढावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अन्यथा, या वादाचे गंभीर पडसाद उमटण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# बैसाखीनिमित्त पाकिस्तानकडून २,८०० भारतीयांना प्रवेश परवाने

■ नवी दिल्ली

**पाकिस्तानने** बैसाखी उत्सवाच्या निमित्ताने भारतातील २,८०० हून अधिक शीख यात्रेकरूंना प्रवेश परवाने दिले आहेत. भारत-पाकिस्तान संबंध तणावपूर्ण असताना पाकिस्तानी उच्चायुक्तालयाने यात्रेकरूंना व्हिसा जारी केला आहे. हे यात्रेकरू १० ते १९ एप्रिल दरम्यान पाकिस्तानात जाऊन बैसाखी सण साजरा करणार आहेत.

या काळात ते गुरुद्वारा पंजा साहिब, गुरुद्वारा नानकाना साहिब आणि गुरुद्वारा कर्तारपूर साहिब यांसारख्या पवित्र स्थळांना भेट देतील. हा निर्णय १९७४ मध्ये झालेल्या भारत-पाकिस्तान करारानुसार घेतला आहे.

या करारामुळे दोन्ही देशांतील धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी यात्रेकरूंना सुलभता मिळते. त्यामुळे दरवर्षी बैसाखी, गुरुनानक जयंती यांसारख्या महत्त्वाच्या सणांवेळी मोठ्या संख्येने भाविकांना परवानगी दिली जाते.

## देश विदेश

# ईडी प्रकरणात सुकेशला जामीन इतर आरोपात तुरुंगातच राहणार

■ नवी दिल्ली

**विशेष** न्यायाधीश विशाल गोगणे यांनी काल कथित फसवणूक करणारा सुकेश चंद्रशेखर याला ईडी प्रकरणात जामीन मंजूर केला. हे प्रकरण एआयएडीएमकेच्या टू लीव्हस या निवडणूक चिन्हाशी संबंधित आहे. न्यायालयाने नमूद केले की, प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉंड्रिंग अॅक्ट अंतर्गत निर्धारित कमाल सात वर्षांच्या शिक्षेपैकी निम्म्याहून अधिक काळ तो कोठडीत राहिला आहे. चंद्रशेखर १ एप्रिल २०२२ पासून या प्रकरणात तुरुंगात आहे. मात्र, त्याच्याविरोधात इतर प्रलंबित प्रकरणे असल्यामुळे तो सध्या तुरुंगातच राहणार आहे. त्याच्यावर दाखल असलेल्या ३१ प्रकरणांपैकी २६ प्रकरणांत त्याला जामीन मिळाला आहे. ईडी प्रकरण २०१७ मधील दिल्ली पोलिसांच्या एफआयआरवर आधारित आहे. या एफआयआरमध्ये असा आरोप आहे की, चंद्रशेखरने एआयएडीएमकेचे नेते टीटीव्ही दिनाकरन यांच्यासाठी मध्यस्थाची भूमिका बजावली आणि पक्षाचे टू लीव्हस चिन्ह मिळवण्यासाठी भारताच्या निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्याला लाच देण्याचा प्रयत्न केला.

# व्हिएतनाममध्ये कम्युनिस्ट पक्षप्रमुख लाम अध्यक्षपदी

■ हनोई



**व्हिएतनाममध्ये** महत्त्वाचा राजकीय बदल झाला आहे. कम्युनिस्ट पक्षाचे नेते तो लाम यांची राष्ट्राध्यक्षपदी निवड झाली आहे. या निर्णयामुळे पक्ष आणि सरकार या दोन्ही सत्ताकेंद्रांवर एकाच नेत्याचे नियंत्रण आल्यामुळे देशातील सत्तेचे केंद्रीकरण बळकट झाले आहे. व्हिएतनाममध्ये वेगवेगळी महत्त्वाची पदे वेगवेगळ्या नेत्यांकडे असतात. मात्र, यावेळी तो लाम यांच्याकडे दोन मोठी पदे एकत्र देण्यात आली आहेत. त्यामुळे त्यांच्या सत्तेची ताकद आणखी वाढली आहे. हा निर्णय काही अंशी चीनच्या पद्धतीसारखा मानला जात आहे. कारण शी जिनपिंग यांच्याकडेही पक्ष आणि देश दोन्हींचे नेतृत्व आहे. त्यामुळे व्हिएतनामनेही तशीच सत्ता रचना स्वीकारल्याचे मानले जात आहे. शपथ घेतल्यानंतर तो लाम म्हणाले की, देशात शांतता आणि स्थैर्य राखणे हे त्यांचे पहिले उद्दिष्ट असेल. त्यांनी लोकांचे जीवनमान सुधारण्यावरही भर दिला. देशाचा विकास सर्वांपर्यंत पोहोचला पाहिजे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

तो लाम आधी सुरक्षा विभागात काम करत होते आणि नंतर राजकारणात येऊन त्यांनी महत्त्वाची पदे भूषवली. भ्रष्टाचारविरोधी मोहिमेमुळे त्यांची प्रतिमा मजबूत झाली आणि त्यामुळेच त्यांना सर्वोच्च पद मिळवणे सोपे झाले.

# नेपाळने भारतासह ६ देशांतील राजदूतांना परत बोलावले

■ काठमांडू

**नेपाळने** भारतासह सहा देशांमधील आपल्या राजदूतांना माघारी बोलावले आहे. हे सर्व राजदूत माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात नियुक्त करण्यात आले होते.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार भारत, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, डेन्मार्क, दक्षिण कोरिया आणि दक्षिण आफ्रिका या देशांमधील राजदूतांना परत बोलावण्यात आले आहे. याबाबतची माहिती नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लोक बहादूर छेत्री यांनी दिली. माघारी बोलावण्यात आलेल्या राजदूतांमध्ये शंकर प्रसाद शर्मा (भारत), चित्रलेखा यादव (ऑस्ट्रेलिया), सुम्निमा तुलाधर (डेन्मार्क), पूर्ण बहादूर नेपाळी (श्रीलंका), शिवमाया तुम्बाहाम्फे (दक्षिण कोरिया) आणि कपिलमान श्रेष्ठ (दक्षिण आफ्रिका) यांचा समावेश आहे. या निर्णयामुळे नेपाळच्या परराष्ट्र धोरणात बदलाचे संकेत मानले जात असून, नव्या राजदूतांच्या नियुक्तीकडे आता लक्ष लागले आहे.

# शांततेसाठी तैवानच्या विरोधी पक्षनेत्या वुन चीन दौऱ्यावर

**बीजिंग-** तैवानच्या राजकारणात महत्त्वाची घडामोड घडली असून, विरोधी पक्षाच्या नेत्या चेंग ली-वुन या चीन दौऱ्यावर गेल्या आहेत. हा दौरा चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या निमंत्रणावर होत आहे. गेल्या अनेक वर्षांत तैवानच्या विरोधी पक्षनेत्याचा हा पहिलाच दौरा असल्याने त्याला विशेष महत्त्व मिळाले आहे. या दौऱ्यात दोन्ही देशांत शांतता प्रस्थापित करण्यासाठी बोलणी होणार आहे. चीनमधील बीजिंग येथे पोहोचल्यानंतर चेंग ली-वुन यांनी स्पष्ट केले की, या दौऱ्याचा उद्देश तणाव कमी करून शांततेचा मार्ग शोधणे आहे.



# एमपीएससी परीक्षेचा निकाल जाहीर सोलापूरचा विजय लामकाने प्रथम

■ मुंबई

**महाराष्ट्र** लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२४ चा अंतिम निकाल आज जाहीर करण्यात आला. २७ ते २९ मे २०२५ दरम्यान झालेल्या या परीक्षेच्या निकालात सोलापूर जिल्ह्याने ठसा उमटवला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील विजय नागनाथ लामकाने सर्वसाधारण तसेच मागासवर्ग गटातून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर आरती परमेश्वर जाधवने महिलांमधून राज्यात अव्वल स्थान मिळवले आहे. आयोगाच्या संकेतस्थळावर आज हा निकाल प्रसिद्ध करण्यात आला असून, विविध २० संवर्गातील एकूण ४६१ पदांसाठी उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. उमेदवारांच्या माहितीसाठी अंतिम निकालासह प्रत्येक प्रवर्गातील शेवटच्या शिफारसपात्र उमेदवारांचे सीमांकन गुण (कट-ऑफ) देखील जाहीर करण्यात आले आहेत. मात्र, या शिफारशी उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेल्या माहितीनुसार पात्रता तपासणीच्या अधीन राहणार आहेत.

# महाराष्ट्र सहकारी संघाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आ. दरेकरांची सहकार मंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा

पान ८ वरून

शिक्षण निधी बंद झाला. आता संघ फक्त प्रशिक्षण शुल्कावर अवलंबून असल्याने १८ कोटी रुपयांची तूट आहे. १८८ कर्मचाऱ्यांचे २६ महिन्याचे वेतन थकीत आहे. डॉक्टर तोष्णीवाल समितीने शिक्षण व प्रशिक्षणाचे काम अव्याहतपणे सुरू ठेवण्यासाठी संघाला सहकारी संस्थांकडून दरवर्षी शिक्षण निधी मिळाला पाहिजे, अशी शिफारस केली होती. त्यानुसार शिक्षण निधी पूर्ववत करण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करावी. राज्यसंघीय संस्था म्हणून संघाची अधिसूचना काढावी, सहकारी संस्थांनी द्यावयाच्या शिक्षण निधी अंशदानाचे दर तातडीने निश्चित करावेत, २०१३ ला शिक्षण निधी बंद करण्यात आला त्यापूर्वीचा १८ कोटी थकीत शिक्षण निधी संघाला येणे बाकी आहे हा निधी राज्य लिक्विडेशन निधीतून संघाला देण्यात यावा, सहकार प्रशिक्षणात संघाचा ८५ टक्के वाटा आहे. संघाच्या मालमत्तांची देखभाल व दुरुस्ती भाडेतत्त्वावरील इमारती कर्मचाऱ्यांचे पगार हा खर्च केवळ फी मधून निघत नाही. त्यासाठी शासनाच्या अनुदानाची आवश्यकता आहे. संघाला तुटीची ११ कोटी १० लाख रुपयांचे अनुदान मंजूर करावे व यापुढे प्रतिवर्षी तुटीच्या अनुदान देण्यात यावे. धनंजयराव गाडगीळ प्रबंध संस्थांची निर्मिती १९७२ मध्ये झाली ५०-५० टक्के प्रमाणे केंद्र व राज्य सरकारकडून या संस्थानाला अनुदान देण्यात येत होतं. संस्थांच्या ताळेबंदात १ कोटी १२ लाख २४ हजार २०८ एवढी रक्कम संघास देय असल्याचे दिसते. शासनाने प्रबंध संस्थांची देय रक्कम अदा केली तर संस्थांकडून कपात केलेले रक्कम संघाला परत मिळू शकेल. त्यामुळे धनंजयराव गाडगीळ प्रबंध संस्थांची रक्कम शासनाने द्यावी.

# लोकलची म्हशीला धडक! डहाणूची सेवा विस्कळीत

**मुंबई-** डहाणूकडे जाणाऱ्या उपनगरीय रेल्वे मार्गावर रेल्वे रूळावर आलेल्या म्हशीला लोकलची धडक बसल्याने वाहतूक विस्कळीत झाली. या घटनेमुळे उपनगरीय गाड्या सुमारे १५ मिनिटे उशिराने धावत होत्या.

या अपघातानंतर सुरक्षिततेच्या कारणास्तव रेल्वे वाहतूक काही काळ थांबवण्यात आली होती. घटनेनंतर रेल्वे प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी पथक पाठवून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे काम सुरू केले. रूळावर अडथळा निर्माण झाल्याने काही गाड्या थांबवाव्या लागल्या, तर काही गाड्यांचे वेळापत्रक विस्कळीत झाले.

# आजचे राशी भविष्य

गुरुवार ता. ९ एप्रिल २०२६

ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | आशा पल्लवित होतील. मन स्थिर असल्याने योग्य निर्णय घेता येतील. |
| वृषभ | परिस्थिती हाताबाहेर जाण्याचा संभव आहे. प्रवासात खिसापाकीट सांभाळा. कामे विलंबाने होतील. |
| मिथुन | प्रगतीकारक दिवस राहील. थोड्या प्रयत्नातही सफलता मिळेल. कर्तबगारी सिद्ध करता येईल. |
| कर्क | दिवस उत्पादक राहील. नवा उत्साह जाणवेल. नवीन उपक्रमाचा प्रारंभ लाभदायक ठरेल. |
| सिंह | दैनंदिन कामे करणेच योग्य राहील. आध्यात्मिक गोष्टी दिलासा देतील. जोडीदाराबरोबर गैरसमज होण्याची शक्यता आहे. |
| कन्या | नियोजनपूर्वक कामे करणे हिताचे ठरेल. दगदग संभवते. वाढत्या खर्चाची चिंता राहील. |
| तूळ | महत्त्वाचे निर्णय घेण्यास अनुकूल दिवस आहे. पैशाचा ओघ चांगला राहील. उत्तम कामगिरीने वरिष्ठांची प्रशंसा लाभेल. |
| वृश्चिक | अस्वस्थता व चिंता राहील. भावनिक संतुलन सांभाळा. पूजापाठ दिलासा देईल. |
| धनु | तणाव दूर करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. आक्रमकता, वादविवाद टाळा. समजूतदारपणा उपयोगी ठरेल. |
| मकर | आज अडथळ्यांची शर्यत पार करायची आहे. दृढ निश्चयाने यश साध्य करता येईल. प्रियजनांशी सुसंवाद ठेवा. |
| कुंभ | इच्छापूर्तीसाठी अनुकूल दिवस आहे. फार ताण घेणे टाळा. मित्रांच्या गाठीभेटी होतील. |
| मीन | प्रवासाचे योग आहेत. लोकसंपर्काची चांगली संधी मिळेल. नवीन ओळखी फायद्याच्या ठरतील. |

# शुभ राशी ता.०९/४/२०२६

| | | |
|---|---|---|
| ३ | ० | ५ |
| ३१ | ०१ | ५१ |
| ३६ | ०६ | ५६ |
| १२० | १३६ | ४५६ |
| ४९० | ५६९ | ३५७ |

# लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

सोडत दर बुधवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 14 | सोडत दिनांक 08/04/2026

| | |
|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | AK-04 : 4182 |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 4182 — श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 9981 — चिराग एन्टरप्रायझेस - नाशिक; श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1691 | 2150 | 2927 | 3222 | 3891 | 4277 | 8041 | 8123 | 8252 | 8636 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0742 | 0771 | 1032 | 2949 | 4032 | 5376 | 7375 | 7559 | 7993 | 8350 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2663 | 2765 | 3124 | 4411 | 5204 | 5976 | 7565 | 7718 | 7890 | 9768 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1302 | 1357 | 1866 | 2259 | 3175 | 3258 | 3863 | 4280 | 5700 | 7626 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1165 | 1964 | 2766 | 3375 | 4145 | 4944 | 5685 | 6408 | 6980 | 7730 | 8592 | 9386 |
| | | 1231 | 1969 | 2776 | 3378 | 4164 | 4984 | 5701 | 6448 | 7029 | 7733 | 8605 | 9389 |
| | | 1284 | 1975 | 2777 | 3387 | 4205 | 5005 | 5707 | 6450 | 7037 | 7734 | 8616 | 9395 |
| | | 1312 | 1977 | 2781 | 3411 | 4227 | 5006 | 5754 | 6451 | 7068 | 7737 | 8638 | 9399 |
| | | 1313 | 2002 | 2785 | 3431 | 4238 | 5030 | 5759 | 6462 | 7084 | 7760 | 8672 | 9412 |
| 0010 | 0473 | 1319 | 2020 | 2827 | 3434 | 4255 | 5079 | 5802 | 6465 | 7102 | 7773 | 8685 | 9484 |
| 0018 | 0498 | 1339 | 2023 | 2830 | 3438 | 4269 | 5114 | 5807 | 6488 | 7127 | 7788 | 8737 | 9493 |
| 0023 | 0505 | 1341 | 2063 | 2900 | 3454 | 4304 | 5117 | 5844 | 6509 | 7146 | 7817 | 8752 | 9514 |
| 0029 | 0508 | 1351 | 2074 | 2920 | 3469 | 4344 | 5138 | 5845 | 6514 | 7147 | 7827 | 8765 | 9518 |
| 0037 | 0513 | 1370 | 2076 | 2924 | 3473 | 4348 | 5159 | 5856 | 6546 | 7149 | 7875 | 8778 | 9592 |
| 0041 | 0522 | 1371 | 2109 | 2926 | 3480 | 4360 | 5182 | 5879 | 6556 | 7179 | 7876 | 8788 | 9639 |
| 0056 | 0523 | 1381 | 2172 | 2938 | 3500 | 4379 | 5187 | 5890 | 6563 | 7207 | 7890 | 8813 | 9646 |
| 0059 | 0527 | 1386 | 2188 | 3017 | 3537 | 4391 | 5205 | 5934 | 6569 | 7209 | 7894 | 8832 | 9694 |
| 0060 | 0550 | 1394 | 2207 | 3032 | 3554 | 4392 | 5222 | 5938 | 6576 | 7211 | 7905 | 8840 | 9695 |
| 0070 | 0579 | 1401 | 2229 | 3053 | 3560 | 4406 | 5226 | 5947 | 6583 | 7237 | 7936 | 8843 | 9709 |
| 0075 | 0580 | 1433 | 2239 | 3056 | 3573 | 4443 | 5240 | 5948 | 6600 | 7278 | 8019 | 8844 | 9723 |
| 0080 | 0591 | 1441 | 2242 | 3083 | 3580 | 4449 | 5243 | 5950 | 6602 | 7282 | 8094 | 8860 | 9735 |
| 0091 | 0612 | 1483 | 2247 | 3136 | 3581 | 4474 | 5255 | 5952 | 6607 | 7311 | 8128 | 8881 | 9740 |
| 0096 | 0622 | 1486 | 2261 | 3151 | 3582 | 4489 | 5258 | 6000 | 6609 | 7367 | 8138 | 8883 | 9743 |
| 0100 | 0648 | 1503 | 2270 | 3180 | 3583 | 4494 | 5264 | 6050 | 6612 | 7368 | 8177 | 8910 | 9753 |
| 0129 | 0669 | 1525 | 2286 | 3182 | 3590 | 4499 | 5285 | 6061 | 6631 | 7375 | 8178 | 8958 | 9763 |
| 0170 | 0683 | 1561 | 2314 | 3211 | 3622 | 4540 | 5288 | 6081 | 6638 | 7379 | 8191 | 8973 | 9779 |
| 0195 | 0685 | 1615 | 2320 | 3224 | 3669 | 4553 | 5351 | 6104 | 6640 | 7380 | 8212 | 8985 | 9791 |
| 0201 | 0689 | 1645 | 2328 | 3238 | 3712 | 4554 | 5382 | 6114 | 6662 | 7391 | 8229 | 9018 | 9798 |
| 0284 | 0705 | 1658 | 2351 | 3243 | 3783 | 4600 | 5385 | 6154 | 6663 | 7417 | 8240 | 9080 | 9893 |
| 0292 | 0710 | 1677 | 2352 | 3255 | 3832 | 4694 | 5500 | 6172 | 6669 | 7431 | 8249 | 9099 | 9900 |
| 0308 | 0729 | 1691 | 2365 | 3257 | 3869 | 4701 | 5504 | 6179 | 6671 | 7474 | 8253 | 9126 | 9902 |
| 0340 | 0779 | 1698 | 2417 | 3263 | 3872 | 4705 | 5508 | 6199 | 6681 | 7501 | 8271 | 9129 | 9904 |
| 0349 | 0890 | 1710 | 2472 | 3297 | 3883 | 4710 | 5510 | 6212 | 6754 | 7517 | 8275 | 9171 | 9913 |
| 0358 | 0917 | 1730 | 2508 | 3302 | 3925 | 4716 | 5525 | 6218 | 6764 | 7559 | 8280 | 9173 | 9922 |
| 0360 | 0923 | 1736 | 2522 | 3307 | 3939 | 4749 | 5530 | 6232 | 6774 | 7572 | 8300 | 9178 | 9925 |
| 0370 | 0991 | 1757 | 2527 | 3312 | 3950 | 4764 | 5535 | 6239 | 6792 | 7577 | 8380 | 9182 | 9940 |
| 0390 | 1003 | 1801 | 2597 | 3313 | 3960 | 4798 | 5547 | 6261 | 6827 | 7587 | 8381 | 9194 | 9944 |
| 0397 | 1018 | 1818 | 2601 | 3324 | 3983 | 4801 | 5550 | 6266 | 6869 | 7653 | 8382 | 9224 | 9958 |
| 0402 | 1084 | 1871 | 2614 | 3328 | 4014 | 4802 | 5552 | 6269 | 6889 | 7662 | 8404 | 9233 | 9966 |
| 0405 | 1091 | 1902 | 2623 | 3329 | 4040 | 4827 | 5560 | 6283 | 6906 | 7667 | 8415 | 9239 | 9974 |
| 0422 | 1104 | 1905 | 2624 | 3331 | 4072 | 4881 | 5578 | 6338 | 6938 | 7690 | 8416 | 9309 | 9976 |
| 0465 | 1115 | 1919 | 2660 | 3338 | 4124 | 4908 | 5591 | 6345 | 6961 | 7693 | 8505 | 9331 | 9986 |
| 0468 | 1116 | 1933 | 2687 | 3344 | 4140 | 4929 | 5654 | 6362 | 6965 | 7700 | 8509 | 9367 | 9992 |
| 0470 | 1119 | 1963 | 2715 | 3363 | 4143 | 4940 | 5657 | 6364 | 6967 | 7724 | 8537 | 9373 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 14 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 08/04/2026

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-08 : 8854 |

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 7396 | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 6568 | | | | | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1479 | 2391 | 2594 | 2779 | 3323 | 4178 | 5079 | 7072 | 7993 | 8742 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0761 | 3601 | 4041 | 4495 | 5160 | 5528 | 6511 | 7321 | 8486 | 9478 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0988 | 1159 | 2801 | 3098 | 3157 | 4736 | 5870 | 6324 | 7944 | 9926 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1462 | 2625 | 3356 | 4087 | 4956 | 5645 | 6613 | 8019 | 8867 |
| | | 1471 | 2758 | 3386 | 4194 | 4972 | 5649 | 6671 | 8085 | 8889 |
| | | 1484 | 2772 | 3432 | 4334 | 4979 | 5650 | 6680 | 8103 | 8896 |
| 0021 | 0986 | 1563 | 2816 | 3437 | 4422 | 5044 | 5730 | 6962 | 8129 | 8909 |
| 0064 | 1028 | 1655 | 2849 | 3578 | 4440 | 5150 | 5775 | 6966 | 8188 | 9039 |
| 0156 | 1039 | 1814 | 2904 | 3639 | 4441 | 5155 | 5815 | 7049 | 8207 | 9105 |
| 0183 | 1068 | 1877 | 2982 | 3651 | 4454 | 5157 | 5817 | 7176 | 8220 | 9198 |
| 0244 | 1089 | 1898 | 3014 | 3688 | 4471 | 5164 | 5858 | 7220 | 8261 | 9305 |
| 0278 | 1107 | 2102 | 3030 | 3693 | 4544 | 5227 | 5869 | 7348 | 8303 | 9395 |
| 0290 | 1124 | 2110 | 3057 | 3702 | 4554 | 5338 | 5899 | 7432 | 8427 | 9440 |
| 0298 | 1138 | 2143 | 3101 | 3746 | 4634 | 5352 | 5914 | 7481 | 8507 | 9517 |
| 0407 | 1144 | 2222 | 3134 | 3755 | 4714 | 5354 | 5928 | 7622 | 8508 | 9566 |
| 0485 | 1157 | 2249 | 3155 | 3760 | 4753 | 5413 | 5951 | 7714 | 8522 | 9660 |
| 0607 | 1162 | 2292 | 3203 | 3770 | 4805 | 5459 | 6036 | 7725 | 8548 | 9751 |
| 0629 | 1174 | 2320 | 3226 | 3803 | 4824 | 5528 | 6082 | 7784 | 8608 | 9892 |
| 0669 | 1218 | 2358 | 3230 | 3895 | 4834 | 5530 | 6156 | 7794 | 8689 | 9921 |
| 0879 | 1242 | 2502 | 3237 | 3934 | 4860 | 5547 | 6246 | 7859 | 8714 | 9963 |
| 0898 | 1271 | 2534 | 3265 | 3963 | 4866 | 5582 | 6437 | 7921 | 8802 | 9985 |
| 0900 | 1281 | 2541 | 3284 | 4035 | 4895 | 5583 | 6468 | 7926 | 8813 | 9986 |
| 0902 | 1316 | 2555 | 3293 | 4037 | 4918 | 5591 | 6496 | 7932 | 8826 | 9990 |
| 0948 | 1349 | 2611 | 3329 | 4042 | 4939 | 5592 | 6568 | 7983 | 8834 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • विजयालक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 14 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 08/04/2026

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SV-06 : 2259 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0988 | 3433 (प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स, कल्याण) | 3558 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 5319 | 5448 | 5777 | 6558 | 9451 | 9491 | 9995 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0679 | 3609 | 3890 | 6499 | 7572 | 8096 | 9412 | 9749 | 9860 | 9927 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0258 | 0843 | 2347 | 3203 | 4763 | 5023 | 6203 | 6301 | 6890 | 9146 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 300/- | 1251 | 2237 | 3263 | 4265 | 4885 | 5830 | 7525 | 8498 |
| | 1350 | 2247 | 3333 | 4304 | 4949 | 5959 | 7696 | 8568 |
| 0010 | 1369 | 2322 | 3395 | 4344 | 5155 | 6170 | 7703 | 8792 |
| 0023 | 1380 | 2440 | 3431 | 4431 | 5261 | 6212 | 7900 | 8848 |
| 0030 | 1388 | 2516 | 3436 | 4448 | 5365 | 6275 | 7999 | 8880 |
| 0073 | 1561 | 2675 | 3459 | 4481 | 5412 | 6292 | 8085 | 8977 |
| 0209 | 1583 | 2729 | 3675 | 4495 | 5438 | 6344 | 8115 | 8978 |
| 0255 | 1611 | 2751 | 3717 | 4510 | 5525 | 6650 | 8186 | 8986 |
| 0342 | 1715 | 2863 | 3831 | 4648 | 5542 | 6662 | 8234 | 9025 |
| 0831 | 1811 | 2925 | 4044 | 4653 | 5596 | 6667 | 8283 | 9071 |
| 0943 | 1993 | 3003 | 4140 | 4684 | 5639 | 6685 | 8328 | 9274 |
| 1118 | 2120 | 3036 | 4148 | 4739 | 5698 | 7348 | 8436 | 9641 |
| 1131 | 2229 | 3133 | 4154 | 4776 | 5753 | 7448 | 8454 | 9696 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 14 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 08/04/2026

| | |
|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-03 : 1012 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2138 | 2468 | 3001 | 3336 (श्री अष्टविनायक लॉटरी, औरंगाबाद) | 3656 (ओम गं गणपतये नमः लॉटरी - पुणे) | 4831 (प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण) | 6255 | 9684 | 9939 | 9980 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0269 | 1413 | 2325 | 2767 | 6491 | 6908 | 7791 | 8367 | 8594 | 9539 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0109 | 0134 | 2717 | 3965 | 5054 | 5244 | 5587 | 7502 | 8316 | 9212 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 2118 | 3634 | 4495 | 4837 | 5004 | 5310 | 6746 | 7516 | 8137 | 8539 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहावे बक्षिस रु. 100/- | | 1912 | 2497 | 3221 | 4080 | 4772 | 5824 | 6667 | 7521 | 8358 | 9047 |
| | | 2008 | 2504 | 3303 | 4245 | 4866 | 5885 | 6668 | 7535 | 8389 | 9084 |
| 0000 | 0921 | 2012 | 2558 | 3323 | 4257 | 4891 | 6136 | 6696 | 7598 | 8416 | 9094 |
| 0068 | 0996 | 2024 | 2580 | 3335 | 4275 | 4947 | 6156 | 6727 | 7637 | 8501 | 9166 |
| 0076 | 1017 | 2025 | 2581 | 3343 | 4313 | 4949 | 6219 | 6770 | 7673 | 8521 | 9169 |
| 0092 | 1134 | 2026 | 2584 | 3364 | 4384 | 5009 | 6246 | 6779 | 7692 | 8578 | 9180 |
| 0100 | 1148 | 2162 | 2653 | 3381 | 4404 | 5032 | 6256 | 6807 | 7711 | 8587 | 9196 |
| 0146 | 1156 | 2184 | 2683 | 3539 | 4424 | 5097 | 6276 | 6834 | 7733 | 8612 | 9469 |
| 0148 | 1293 | 2228 | 2732 | 3541 | 4430 | 5114 | 6366 | 6936 | 7739 | 8664 | 9486 |
| 0232 | 1351 | 2272 | 2749 | 3555 | 4459 | 5173 | 6368 | 6942 | 7768 | 8686 | 9501 |
| 0252 | 1403 | 2286 | 2872 | 3574 | 4469 | 5205 | 6402 | 6959 | 7776 | 8708 | 9574 |
| 0285 | 1411 | 2287 | 2962 | 3724 | 4508 | 5253 | 6417 | 6961 | 7780 | 8760 | 9595 |
| 0304 | 1449 | 2295 | 2968 | 3730 | 4520 | 5356 | 6436 | 6963 | 7792 | 8824 | 9618 |
| 0336 | 1455 | 2310 | 3017 | 3743 | 4541 | 5528 | 6439 | 7074 | 7876 | 8835 | 9696 |
| 0352 | 1496 | 2324 | 3028 | 3773 | 4587 | 5539 | 6469 | 7102 | 7916 | 8841 | 9742 |
| 0455 | 1510 | 2328 | 3030 | 3852 | 4607 | 5544 | 6513 | 7117 | 7972 | 8859 | 9774 |
| 0470 | 1668 | 2367 | 3043 | 3900 | 4644 | 5553 | 6521 | 7131 | 7998 | 8875 | 9788 |
| 0639 | 1711 | 2399 | 3060 | 3964 | 4649 | 5562 | 6526 | 7262 | 8026 | 8903 | 9799 |
| 0660 | 1721 | 2429 | 3062 | 4012 | 4669 | 5672 | 6532 | 7449 | 8038 | 8928 | 9801 |
| 0794 | 1754 | 2432 | 3132 | 4013 | 4702 | 5715 | 6576 | 7470 | 8124 | 8988 | 9859 |
| 0807 | 1771 | 2452 | 3155 | 4026 | 4724 | 5716 | 6604 | 7498 | 8260 | 9035 | 9892 |
| 0857 | 1823 | 2455 | 3207 | 4054 | 4740 | 5802 | 6650 | 7511 | 8279 | 9038 | 9980 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# सुषमा अंधारे यांची प्रकृती बिघडली



■ मुंबई

**उबाठाच्या** उपनेत्या सुषमा अंधारे यांची प्रकृती आज अचानक बिघडल्याने त्यांना तातडीने मुंबईतील ग्लोबल हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

सध्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सुषमा अंधारे उद्या गुरुवारी विधिमंडळ हक्क समितीच्या बैठकीला उपस्थित राहणार होत्या. मात्र प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना या बैठकीला उपस्थित राहता येणार नाही. याबाबतची माहिती रुग्णालय प्रशासनाकडून विधिमंडळ सचिवालयाला पत्राद्वारे कळवण्यात आली आहे.

# पटेल-तटकरेंच्या कार्यक्रमातून अजित पवारांचा फोटो गायब

## पक्ष ताब्यात घेण्याचा आरोप

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेसच्या अजित पवार गटात अंतर्गत मतभेद वाढत असल्याच्या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले आहे. पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर पक्षफोडीचे आरोप होत असून, अलीकडील दोन कार्यक्रमांतील बॅनरवरून चक्क दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे फोटो लावण्यात आले नाहीत.

रायगडमधील एका पक्षीय कार्यक्रमात सुनील तटकरे उपस्थित होते. व्यासपीठावरील बॅनरवर अजित पवार, सुनेत्रा पवार यांसह इतर वरिष्ठ नेत्यांचे फोटो नसल्याचे दिसून आले. त्या ठिकाणी केवळ सुनील तटकरे, आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे आणि काही स्थानिक नेत्यांचेच फोटो झळकले. त्यानंतर विदर्भातील तिरोडा येथे झालेल्या पक्षाच्या अधिकृत बैठकीतही अशाच प्रकारची



बाब समोर आली. या कार्यक्रमाच्या बॅनरवर प्रफुल्ल पटेल यांचा मोठा फोटो झळकत होता, तर सुनेत्रा पवार आणि स्थानिक नेत्यांचे फोटो लहान स्वरूपात दिसून आले. विशेष म्हणजे, या दोन्ही कार्यक्रमांमध्ये अजित पवार यांचा फोटो नसल्याने चर्चांना अधिकच उधाण आले आहे. शरद पवार गटाचे नेते विलास लवांडे यांनी या प्रकरणावर टीका करत एक्स पोस्ट केली आहे. ते म्हणाले की, रायगडमध्ये सुनील तटकरे यांना जशी अजित पवार यांची अडचण दिसली, तशीच परिस्थिती आता विदर्भात प्रफुल्ल पटेल यांच्या कार्यक्रमातही दिसून आली. दोन्ही नेत्यांनी स्वतःचे फोटो लावून आम्ही स्वतंत्र आहोत, हे दाखवून दिले आहे. या दोघांच्या कृतीतून पक्ष ताब्यात घेण्याचे मनसुबे दिसत आहेत. अजित पवार यांचे समर्थक असल्याचा दावा करणारे आमदार आणि पदाधिकारी गप्प बसत असतील, तर ते खरे समर्थक नसून ढोंगी किंवा गुलाम आहेत.

# जिजाऊंची समाधी असलेल्या पाचाडमध्ये तीव्र पाणीटंचाई

■ रायगड

**ऐतिहासिक** रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या आणि राजमाता जिजाऊंचे समाधी स्थळ असलेल्या पाचाड गावात सध्या तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर झालेल्या ४० कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचे काम गेल्या दीड वर्षापासून बंद असल्याचा फटका ग्रामस्थ आणि पर्यटकांना बसत आहे. या भागात आठ दिवसांतून एकदा पाणीपुरवठा केला जात आहे.

मागील अनेक वर्षांपासून पाचाड गाव टंचाईग्रस्त असून या ठिकाणी नळ पाणीपुरवठा योजना, तलाव अशा योजना राबवूनही येथील पाणीप्रश्न सुटलेला नाही. दरवर्षी जानेवारी आणि फेब्रुवारीपासूनच पाणीटंचाई निर्माण होते. सध्या पाचाड गाव, पाचाडनाका, मोहल्ला, बौद्धवाडी, सर्व इतर वाड्यांना चौखंडी तलावातून पाणीपुरवठा करण्यात येतो. मात्र, पाचाड गाव येथील हॉटेल व्यावसायिक आणि पर्यटकांना हे पाणी पुरत नाही. यावर उपाय म्हणून मागील वर्षी पाचाड व इतर वाड्यांसाठी ४० कोटींची नळ पाणीपुरवठा योजना जलजीवनमधून मंजूर करण्यात आली होती. परंतु दीड वर्षांपासून या योजनेचे काम ठप्प आहे.

# चिमुकला सुखरूप घरी परतला मुख्यमंत्र्यांनी केला उपचाराचा खर्च

## रुग्णालयानेही दिली २० टक्के सवलत

■ वसई

**एका** विकृत इसमाच्या अमानुष मारहाणीत जखमी झालेला वसईतील ४ वर्षांचा विघ्नेश कोंडारे हा चिमुकला बुधवारी संध्याकाळी रुग्णालयातून सुखरूप घरी परतला. ३० मार्च रोजी झालेल्या मारहाणीनंतर त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते.

३० मार्च रोजी वसईच्या अनुपम घर संकुल या इमारतीत राहणाऱ्या विघ्नेश कोंडारे (४) या चिमुकल्या मुलाला संदीप पवार (५७) या रिक्षाचालकाने उचलून जमिनीवर आपटले आणि अमानुष मारहाण केली होती. त्याला मारहाण करणारे चित्रफित पाहून काळजाचा थरकाप उडाला होता. या घटनेमुळे सर्वत्र संताप पसरला होता. विघ्नेशवर मिरा रोडच्या वोक्हार्ड रुग्णालयात उपचार सुरू होते. त्याच्यावर छोटी शस्त्रक्रिया करण्यात आली. त्याच्या उपचारासाठी ३ लाखांचा खर्च आला. वसईच्या आमदार स्नेहा दुबे-पंडित यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून २ लाख रुपयांची मदत मिळवून दिली होती. रुग्णालयानेही बिलात २० टक्के सवलत दिली. त्याच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याने बुधवारी संध्याकाळी त्याला घरी सोडण्यात आले. हे दहा दिवस आमच्यासाठी नरकासारखे होते. मात्र माझा मुलगा सुखरूप घरी आला हा सर्वात मोठा आनंद आहे, अशी प्रतिक्रिया विघ्नेशच्या वडिलांनी दिली.

# माजलगावमध्ये पोलिसाची आत्महत्या

■ बीड

**माजलगाव** शहर पोलीस ठाण्यात अंमलदार म्हणून कार्यरत असलेल्या बाळकृष्ण जायभाय या पोलीस कर्मचाऱ्याने स्वतःच्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण पोलीस दलात खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

बाळकृष्ण जायभाय हे माजलगाव येथील एका बेपत्ता मुलीच्या शोधासाठी पुणे येथे गेले होते. संबंधित तपास पूर्ण करून ते रात्री उशिरा आपल्या घरी परतले. मात्र घरी आल्यानंतर काही वेळातच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून, मृतदेह पुढील तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला. या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# नाशिकच्या बहुराष्ट्रीय कंपनीत महिला कर्मचाऱ्यांवर अत्याचार

## ६ जण अटकेत

■ नाशिक

**नाशिकमध्ये** महिला अत्याचाराच्या घटना उघडकीस येण्याचे सत्र सुरूच असून, एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, लैंगिक व मानसिक अत्याचार तसेच धार्मिक भावना दुखावल्याचे गंभीर प्रकरण उघड झाले आहे. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात एकूण ९ गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलिसांनी ६ आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी नाशिक पोलिसांनी एसआयटी स्थापन केली आहे.

संबंधित बहुराष्ट्रीय कंपनीतील काही पुरुष कर्मचाऱ्यांकडून महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, लैंगिक छळ आणि मानसिक अत्याचार करण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. तसेच काही घटनांमध्ये धार्मिक भावना दुखावल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या सर्व तक्रारींच्या आधारे गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. या संवेदनशील प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत नाशिक पोलीस आयुक्तालयाने सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे.

हे पथक आर्थिक गुन्हे विभागाच्या सहाय्याने तपास करणार आहे. पोलिसांनी पीडित महिलांना पुढे येऊन तक्रार नोंदवण्याचे आवाहन केले आहे.

# कोल्हापुरात हॉकी खेळाडूची गळफास घेऊन आत्महत्या

■ कोल्हापूर

**शहराजवळ** असलेल्या कसबाबावडा रेणूकानगर येथील शिवम कृष्णात पाटील (२३) या तरुण हॉकी खेळाडूने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. काल सकाळी हा प्रकार उघडकीला आला.

शिवम पुण्यात शिक्षण घेत होता. १५ दिवसांपूर्वी तो घरी आला होता. सोमवारी रात्री उशिरापर्यंत कुटुंबीय, मित्रांशी गप्पा मारून तो खोलीत झोपण्यासाठी गेला. सकाळी लवकर न उठल्याने कुटुंबियांनी खोलीचा दरवाजा ठोठावला. त्यावेळी प्रतिसाद मिळाला नाही. नातेवाईकांनी दरवाजा उचकटून काढल्यानंतर त्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. बेशुद्ध अवस्थेत त्यास शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. शिवमने हे टोकाचे पाऊल उचलल्याने कुटुंबीय, नातेवाईकांसह मित्रांना धक्का बसला आहे. त्याच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही.

# तुम्ही कायद्याचे तज्ज्ञ, धर्माचे नाही

## शबरीमला प्रकरणी सरकारचा युक्तिवाद



■ तिरुवनंतपूरम

**शबरीमला** मंदिरात महिलांच्या प्रवेश प्रकरणात केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, एखादी धार्मिक प्रथा अंधश्रद्धा आहे की नाही हे धर्मनिरपेक्ष न्यायालय ठरवू शकत नाही. कारण हे ठरवण्याचे कौशल्य न्यायालयाकडे नसते.

केरळमधील शबरीमला मंदिरात पूर्वी मासिक पाळी आलेल्या महिलांना मंदिरात प्रवेश करण्यास मनाई होती. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ही मनाई रद्द करून सर्वच महिलांना मंदिरात प्रवेशाची परवानगी दिली. यानंतर अनेक पुनर्विचार याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत.

या याचिकांच्या सुनावणीचा सर्वोच्च न्यायालयाचा आज दुसरा दिवस होता. केंद्र सरकारच्या वतीने बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, धर्मनिरपेक्ष न्यायालय एखाद्या धार्मिक प्रथेला सहजपणे अंधश्रद्धा ठरवू शकत नाही. नागालँडमधील एखाद्या समुदायासाठी जी गोष्ट धार्मिक मानली जाते, ती मला अंधश्रद्धा वाटू शकते.

आपला समाज खूप वैविध्यपूर्ण आहे, ज्यात विविध लोक, धर्म आणि श्रद्धा आहेत. अशा परिस्थितीत, न्यायालयासाठी असा निर्णय घेणे धोकादायक ठरू शकते. यावर प्रतिक्रिया देताना न्यायमूर्ती अमानुल्ला म्हणाले की, तुम्ही हे प्रकरण खूप सोपे करून सांगितले आहे. अंधश्रद्धा कशाला म्हणतात हे ठरवण्यासाठी न्यायालयाकडे न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार आहे.

# वैभववाडीत मध्यरात्री गोळीबार एकाचा मृत्यू! एक गंभीर जखमी

■ सिंधुदुर्ग

**सिंधुदुर्गातील** वैभववाडी तालुक्यातील आचिर्णे गावात मध्यरात्री गोळीबार झाला. यात सागर पोटळे (२६) याचा मृत्यू झाला असून कृष्णा कातकर (२५) गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

आचिर्णे परिसरात काही जण मध्यरात्री शिकारीसाठी गेले होते. त्यावेळी अचानक गोळीबार झाला. या गोळीबारात सागर पोटळे याचा जागीच मृत्यू झाला, तर कृष्णा कातकर हा गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून पुढील तपास सुरू केला आहे. दरम्यान, हा गोळीबार नेमका कशामुळे झाला, तो अपघाती होता की अन्य कोणत्या कारणातून घडला, याचा तपास पोलीस करत आहेत.

गृह मंत्रालय
MINISTRY OF HOME AFFAIRS
सत्यमेव जयते

National Forensic Sciences University
राष्ट्रीय न्यायालयिक विज्ञान विश्वविद्यालय
An Institution of National Importance under Ministry of Home Affairs, Government of India
राष्ट्रीय महत्व का संस्थान, गृह मंत्रालय, भारत सरकार

NFSU
विद्यया अमृतं अश्नुते

Admissions Open for Academic Year 2026-27

NFSU campuses at Gandhinagar, Delhi, Goa, Tripura, Bhopal, Dharwad, Guwahati, Bhubaneswar, Chennai, Raipur, Jaipur, Nagpur and Varanasi

School of Forensic Science
M.Sc. Forensic Science
Gandhinagar, Delhi, Goa, Tripura, Bhopal, Guwahati, Bhubaneswar, Raipur, Nagpur, Chennai, Jaipur, Dharwad, Varanasi
M.Sc. Forensic Biotechnology
Gandhinagar
M.Sc. Multimedia Forensics
Gandhinagar
M.A. Mass Communication & Forensic Journalism
Gandhinagar
B.Sc.-M.Sc. Forensic Science
Gandhinagar, Delhi, Goa, Tripura, Bhopal, Dharwad, Varanasi
M.Sc. Nanotechnology (Specialization in Forensic Nanotechnology)
Gandhinagar

School of Medico-Legal Studies
M.Sc. Toxicology
Gandhinagar

School of Cyber Security & Digital Forensics
M.Tech. Cyber Security
Gandhinagar, Dharwad
M.Tech. in Artificial Intelligence and Data Science
Gandhinagar, Goa
M.Sc. Cyber Security
Gandhinagar, Goa, Bhopal, Nagpur, Chennai
M.Sc. Digital Forensics & Information Security
Gandhinagar, Delhi, Goa, Bhopal, Bhubaneswar, Raipur, Jaipur
B.Tech.-M.Tech. Computer Science and Engineering (Cyber Security)
Gandhinagar, Delhi, Tripura, Dharwad, Guwahati

Follow us

School of Engineering & Technology
M.Tech. Civil Engineering
(Specialization in Forensic Structural Engineering)
Gandhinagar
M.Sc. Environmental Sciences (Environmental Forensics)
Gandhinagar
B.Tech. Civil Engineering
Gandhinagar

School of Police Science & Security Studies
M.Sc. (Homeland Security)
Gandhinagar
M.A. (Police & Security Studies)
Gandhinagar

School of Behavioural Forensics
M.Sc. Neuropsychology
Gandhinagar
M.Sc. Forensic Psychology
Gandhinagar, Delhi
M.A. Criminology
Gandhinagar, Delhi
M.A. Clinical Psychology
Gandhinagar, Delhi
B.Sc. Criminology and Forensic Science
Gandhinagar, Delhi, Chennai

School of Management Studies
MBA Forensic Accounting & Fraud Investigation
Gandhinagar

For eligibility criteria and related information visit https://nfsu.ac.in/admission

Scan to Apply

MBA Cyber Security Management
Gandhinagar
MBA Hospital & Healthcare Management
Gandhinagar
MBA Business Analytics & Intelligence
Gandhinagar
BBA-MBA (Five Year Integrated)
Gandhinagar, Delhi
MBA Fintech Forensics
Gandhinagar

School of Law, Forensic Justice & Policy Studies
LL.M. (Cyber Law & Cyber Crime Investigation)
Gandhinagar, Bhubaneswar
LL.M. (Criminal Law & Criminal Justice Administration)
Gandhinagar, Delhi
LL.B. (Hons.)
Gandhinagar
B.Sc. LL.B. (Hons.)
Gandhinagar
BBA-LL.B. (Hons.)
Delhi

School of Pharmacy
M.Pharm. Forensic Pharmacy
Gandhinagar, Dharwad
M.Pharm. (Pharmaceutical Quality Assurance) (PCI Approved)
Gandhinagar
M.Sc. Chemistry (Forensic Analytical Chemistry)
Gandhinagar
M.Sc. Pharmaceutical Chemistry
Gandhinagar
M.Sc. Food Technology (Specialization in Forensic Food Analysis)
Gandhinagar

For Admission in Online Certification Courses visit : nfsu.mha.gov.in
Online Admission commences from 9th April 2026

Affiliated Institutes details for Admission of Academic Year 2026-27*

School of Forensic Science
B.Sc. - M.Sc. Forensic Science
• College of Traffic Management & Forensic Science, Faridabad (CTMFS)
• Lloyd Institute of Forensic Science, Greater Noida (LIFS)
• Uttar Pradesh State Institute of Forensic Sciences, Lucknow (UPSIFS)
• Narnarayan Shastri Institute of Technology - Institute of Forensic Sciences and Cyber Security, Ahmedabad (NSIT)
M.Sc. Forensic Science
• College of Traffic Management & Forensic Science, Faridabad (CTMFS)
• Lloyd Institute of Forensic Science, Greater Noida (LIFS)
• Uttar Pradesh State Institute of Forensic Sciences, Lucknow (UPSIFS)
• Narnarayan Shastri Institute of Technology - Institute of Forensic Sciences and Cyber Security, Ahmedabad (NSIT)

School of Cyber Security & Digital Forensics
B.Tech. - M.Tech. Compuer Science & Engineering (Cyber Security)
• Uttar Pradesh State Institute of Forensic Sciences, Lucknow (UPSIFS)
• Narnarayan Shastri Institute of Technology - Institute of Forensic Sciences and Cyber Security, Ahmedabad (NSIT)
M.Sc. Cyber Security
• Narnarayan Shastri Institute of Technology - Institute of Forensic Sciences and Cyber Security, Ahmedabad (NSIT)
• National Institute of Electronics and Information Technology, Kolkata (NIELIT)
M.Sc. Digital Forensics & Information Security
• Narnarayan Shastri Institute of Technology - Institute of Forensic Sciences and Cyber Security, Ahmedabad (NSIT)

School of Management Studies
BBA – MBA with specialization in Forensic Accounting and Fraud Investigation
• Narnarayan Shastri Institute of Technology - Institute of Forensic Sciences and Cyber Security, Ahmedabad (NSIT)

School of Law, Forensic Justice & Policy Studies
LL.M. (Cyber Law & Cyber Crime Investigation)
• Uttar Pradesh State Institute of Forensic Sciences, Lucknow (UPSIFS)
LL.M. (Criminal Law & Criminal Justice Administration)
• Uttar Pradesh State Institute of Forensic Sciences, Lucknow (UPSIFS)
B.Sc. LL.B. (Hons.)
• Uttar Pradesh State Institute of Forensic Sciences, Lucknow (UPSIFS)

*Subject to renewal of the extension of provisional affiliation for the Academic Year 2026–27.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# विक्रमी साखर उत्पादनाचा गोड संदेश

भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि गेल्या काही वर्षांपासून भारतातील अन्नधान्य उत्पादन विक्रमी पद्धतीने वाढते आहे. एकेकाळी भारत अनेक गोष्टींसाठी जगावर अवलंबून असायचा, अन्नधान्यापासून ते साखरेपर्यंतसुद्धा भारताला इतर देशातून आयात करावी लागत होती. आज मात्र ती परिस्थिती राहिलेली नाही केवळ जागतिक व्यापार संबंध टिकवण्यासाठी काही देशांकडून काही गोष्टी आयात कराव्या लागतात आणि काही गोष्टी निर्यातही कराव्या लागतात. परंतु आज भारताच्या या कृषिप्रधान देशाने अनेक शेती उत्पादनांमध्ये खरोखर आत्मनिर्भरता प्राप्त केलेली आहे. आज देशाकडे पुरेसा अन्नधान्य साठा आहे, स्वतःचा अन्नधान्य साठा आरक्षित ठेवून देशातील जवळपास ८० कोटी लोकांना दर महिन्याला दहा किलो मोफत अन्नधान्य देण्याची भारताची क्षमता आहे. म्हणजे आरक्षित धान्यसाठा बाजूला ठेवून जर इतक्या मोठ्या प्रमाणावर मोफत अन्नधान्य देण्याची क्षमता भारताकडे असेल तर भारत हा अन्नधान्याच्या बाबतीत निश्चितच आत्मनिर्भर झालाय असे म्हणता येईल. एवढेच नव्हे तर आजच्या या युद्धजन्य परिस्थितीमध्ये सुद्धा अनेक वस्तूंची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. तरीसुद्धा भारताने आपली अन्नधान्य उत्पादनक्षमता मजबूत ठेवल्याने भारताला कोणत्याही मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागले नाही. ही अन्नधान्य निर्यात क्षमता इतर देशांकडून अनेक वस्तू मिळवण्यासाठी सुद्धा उपयोगी पडलेली आहे. विशेषतः आखाती देशांना आवश्यक असलेला अन्नधान्य साठा देऊन त्यांच्याकडून तेल खरेदी करण्याचा प्रकार भारताने नेहमीच अवलंबलेला आहे. आता या अन्नधान्य साठ्यामध्ये साखरेसारख्या उत्पादनाने देखील मोठी छलांग मारलेली आहे किंवा एका विक्रमाकडे भारतीय साखर उत्पादन आगेकूच करते आहे. यावर्षी संपूर्ण देशामध्ये जवळपास २७१.२० लाख टन साखरेची निर्मिती झालेली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये २४८.६५ लाख टन साखरेची निर्मिती झाली होती, म्हणजेच यंदा देशांमध्ये जवळपास ३३ टक्क्यांनी साखरेची अधिक निर्मिती झालेली आहे आणि त्यात महाराष्ट्राचा वाटा सर्वाधिक आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने या उत्पादनाची माहिती देताना भारतातील हे साखर उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत जवळपास ३३ टक्क्यांनी वाढले असल्याचे म्हटले आहे. यात महाराष्ट्र पहिला क्रमांकावर आला आहे. राज्यात ९८.९५ तर उत्तर प्रदेशमध्ये ४७.४३ महाराष्ट्राचा साखर उत्पादनातला हा पहिला क्रमांक निश्चितच शेती उद्योगाला दिलासा देणारा आणि महाराष्ट्राच्या साखर उत्पादनातला गोडवा सगळ्या देशाला समृद्ध करणारा ठरू शकतो.

**महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक**

साखर उत्पादनातला हा राष्ट्रीय पातळीवरचा उच्चांक महाराष्ट्राने अधिक चांगल्या पद्धतीने साजरा केला पाहिजे. देशाची साखरेची गरज पूर्ण करण्याची क्षमता महाराष्ट्राकडे आहे हे यातून नकळतपणे अधोरेखित होते महाराष्ट्रात असलेले सर्वाधिक साखर कारखाने आणि महाराष्ट्रातल्या शेतीतून उत्पादित होणारा चांगला दर्जाचा ऊस हा अधिकाधिक साखर निर्मिती करणारा आहे. हेही यातून सिद्ध होते. साखर उद्योगाला महाराष्ट्र सरकारने नेहमीच वेगवेगळ्या पद्धतीने मदत केलेली आहे. अनेक साखर कारखान्यांना आर्थिक कोंडीतून बाहेर काढलेले आहे आणि विशेष म्हणजे ऊस उत्पादक शेतकऱ्याला त्याच्या अपेक्षेप्रमाणे भाव देण्याबाबत सरकारने विचारपूर्वक निर्णय घेतलेले आहेत. भविष्य काळामध्ये साखर उत्पादनाचा हाच विक्रमी आलेख चालू राहील अशी अपेक्षा ठेवायला हरकत नाही. मात्र एकीकडे हा विक्रम निर्माण करत असताना साखर कारखान्यांनी आणि महाराष्ट्र सरकारने देखील या विक्रमी साखर उत्पादनातून साखर उद्योगाला मिळणारा नफा लक्षात घेता तो शेतकऱ्यांच्याही वाट्याला त्याच प्रमाणामध्ये पोहोचवता आला पाहिजे. साखर उत्पादनातला हा नफा ऊस उत्पादकांना जादा ऊस दरवाढ देऊन व्यक्त करता येऊ शकतो. जे शेतकरी परिश्रमपूर्वक सातत्याने ऊस उत्पादन करीत आहेत त्यांना आणि विशेष म्हणजे हा ऊस तोडण्याकरता जे ऊसतोडणी कामगार अक्षरशः बारा-बारा तास राबत असतात त्या सगळ्या ऊस तोडणी कामगारांनादेखील या विक्रमी साखर उत्पादनाची योग्य ती भेट देता आली पाहिजे. आज भारतात ऊस तोडणी कामगार मोठ्या संख्येने आहेत.

**ऊसतोडणी कामगारांचे हित**

महाराष्ट्रात ऊसतोडणी कामगार पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत आणि महाराष्ट्रातल्या अनेक शेतकऱ्यांना- साखर कारखान्यांना हे ऊसतोडणी कामगार अन्य राज्यांमधून मागवावे लागतात. विशेषतः उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश इथून मोठ्या प्रमाणावर ऊसतोडणी कामगार महाराष्ट्रात येतात. शिवाय महाराष्ट्राचे ऊसतोडणी कामगार आहेत त्या त्या जिल्ह्यांमध्ये परंपरेने हा व्यवसाय करीत आलेले आहेत परंतु त्यांच्या वाट्याला येणारा रोजगार हा पुरेसा ठरत नाही. त्या ऊसतोडणी कामगारांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवून आणण्याची किमया साखर उद्योग करू शकतो. किंबहुना ऊसतोडणी कामगारांना दत्तक घेऊन त्यांच्या परिवाराची साक्षरता वाढवणे आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे यासारखे उपक्रम साखर उद्योगांना शेतकऱ्यांच्या मदतीने राबवता येऊ शकतात. वाढणारे साखर उत्पादन हे ऊस तोडणी कामगारांच्या जीवनात परिवर्तन करणारे ठरले पाहिजे तरच या साखर उत्पादनाचा महाराष्ट्रासारख्या सुधारणावादी राज्याने अधिक विधायक आणि सकारात्मक विचार केलेला आहे. हे देशालाही सांगता येऊ शकेल. त्याच्या बरोबरीने येणारा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ज्या वेळेला अशा प्रकारचे विक्रमी धान्य उत्पादन होते त्यावेळेला अन्नधान्याचे दर हे स्थिर राहतात. त्यात अत्यल्प स्वरूपाची दरवाढ होते. साखरेचे हे महाराष्ट्रातील विक्रमी उत्पादन लक्षात घेतले तर साखरेचे दर हे नियंत्रित ठेवण्याचाही केंद्र आणि राज्य सरकारने विचार केला पाहिजे. जगातल्या अन्य देशांना साखर निर्यात करत असताना भारतातील साखरेची गरज पूर्णपणे भागवली जाते. मात्र ती भागवत असताना साखरेचे दर वाढणार नाहीत. उलट ते कमी कसे होतील याचा देखील विचार या निमित्ताने करता येऊ शकतो. नफा आणि योग्य पद्धतीने साखरेची विक्री करून संतुलन साधता येऊ शकते. आज महाराष्ट्राने साखर उत्पादनातून निर्माण केलेला हा विक्रम गोड संदेश देणारा आहे आणि त्याचा योग्य अर्थ महाराष्ट्राने समजून घेतला पाहिजे. हीच विक्रमी वाटचाल भविष्यकाळातही चालू राहील याचा देखील विचार केला पाहिजे.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

आयुष्य पण एक अनोळखी पुस्तकासारखे आहे.
पुढच्या पानावर काय लिहिले आहे हे कोणालाच माहीत नाही.

## पंचांग

**गुरुवार ९ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** चैत्र कृष्ण सप्तमी**
**नक्षत्र - मूळ**
**जन्मराशी :- ००-०१ ते २४-०० धनु**

रवी उदय- ०६-२८,
रवी अस्त- १८-५३



**जलसंधारण दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### सातूची लस्सी



★**साहित्य :** दही - १ कप, सातू- २ चमचे, पीनट बटर - १ १/२ टीस्पून (ऐच्छिक), किसलेला गूळ - २ चमचे, वेलची पावडर - १/२ टीस्पून, थंड पाणी - १ कप .

★**कृती :** सातू लस्सी बनवण्यासाठी प्रथम मिक्सरमध्ये दही घाला. नंतर सातू घाला. यानंतर किसलेला गूळ घाला. चव आणि सुगंधासाठी वेलची पावडर घाला. तसेच पीनट बटर आणि थंड पाणी मिक्स करावे. मिक्सर ग्राइंडरने सर्वकाही चांगले मिसळा. लक्षात ठेवा की, तुम्हाला ते दोन ते तीन वेळा ढवळावे लागेल. जेणेकरून सर्व घटक चांगले मिसळतील. नंतर चमच्याने किंवा चाकूच्या मदतीने काचेच्या भोवती थोडे पीनट बटर लावा. असे केल्याने ते खूप छान दिसेल. यानंतर त्यात सातूपासून तयार केलेली लस्सी आणि दही घाला.
सजवण्यासाठी वरती तुमच्या आवडीचे ड्रायफ्रुट्स टाका. तुमची सातू लस्सी तयार होईल.




# शेवटच्या चेंडूवर गुजरातचा १ धावेने विजय

## दिल्लीच्या राहुल, मिलरची वादळी खेळी वाया

■ नवी दिल्ली

**दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर आज शेवटच्या चेंडूपर्यंत आलेल्या आयपीएलच्या १४ व्या सामन्यात गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सला १ धावेने नमवले. गुजरातचा हा स्पर्धेतील पहिला विजय आहे. गुजरात टायटन्सने ४ बाद २१० धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात के. एल. राहूलने ९२ धावा आणि मिलरने ४२ धावांची वादळी खेळी करूनही दिल्ली कॅपिटल्सला ८ बाद २०९ धावांपर्यंत मजल मारता आल्याने पहिला पराभव पत्करावा लागला.**



**दिल्लीने** नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. गुजरातकडून गिलने ४५ चेंडूंत ५ षटकार आणि ३ चौकारांसह सर्वाधिक ७० धावा केल्या. वॉशिंग्टन सुंदरने ३२ चेंडूत ५५ धावा केल्याने दिल्लीने ४ बाद २१० धावांपर्यंत मजल मारली. या धावसंख्येचा पाठलाग करताना दिल्लीचे सलामीवीर पाथुम निस्संका आणि के एल. राहुल यांनी अतिशय चांगली सुरूवात केली. त्यांनी आपल्या संघासाठी ८ षटकांत बिनबाद ७६ धावा ठोकल्या. मग प्रसिद्ध कृष्णाच्या ९ षटकांच्या पहिल्या चेंडूवर निस्संका २४ चेंडूत ४१ धावा करून झेलबाद झाला. नितीश राणा (५) आणि समीर रिझवी (०) झटपट बाद झाले. मात्र राहुल दुसऱ्या बाजूने फटकेबाजी करुन संघाचा डाव पुढे नेत होता. त्यात डेव्हिड मिलरला दुखापत झाल्यामुळे तो मैदानाच्या बाहेर गेला. मग रशीद खानच्या गोलंदाजीवर अक्षर फक्त २ धावा करुन झेलबाद झाला. ट्रिस्टन स्टब्स ७ धावांवर धावचित झाला. लगेच मोहम्मद सिराजने राहुलला मोक्याच्या क्षणी बाद केले. राहुलने ५२ चेंडूत ९२ धावा केल्या. विप्रज निगमला साथ देण्यासाठी मिलर पुन्हा मैदानावर उतरला. विजयासाठी १२ चेंडूंत ३६ धावांची गरज असताना सिरजच्या १९ व्या षटकांच्या पहिल्या चेंडूवर मिलरने खणखणीत षटकार ठोकला. त्याने दुसऱ्या चेंडूवर चौकार, तिसऱ्या चेंडूवर पुन्हा षटकार, चौथ्या चेंडूवर १ धाव काढली. त्यानंतर विप्रजने पाचव्या चेंडूवर चौकार आणि सहाव्या चेंडूवर एक धाव घेतली. या जोडीसमोर विजयासाठी शेवटच्या ६ चेंडूवर १३ धावांची आवश्यकता होती. प्रसिद्ध कृष्णाच्या २० व्या षटकांच्या पहिल्या चेंडूवर विप्रजने चौकार ठोकला. मग दुसऱ्या चेंडूवर विप्रज झेलबाद झाला. तिसऱ्या चेंडूवर कुलदिप यादवने एक धाव घेतली. चौथ्या चेंडूवर मिलरने षटकार ठोकला. पाचव्या चेंडूवर फटका मारल्यानंतर मिलर धाव घेतलीच नाही. शेवटच्या चेंडूवर मिलरचा फटका चुकला व कुलदीप धावचित झाला व दिल्लीचा १ धावेने पराभव झाला.

## राज्य कॅरम स्पर्धेसाठी मुंबईचे नेतृत्व प्रशांत आणि ऐशाकडे

■ नवी मुंबई

**नवी** मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने आणि महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व ठाणे डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने १३ ते १६ एप्रिलदरम्यान वाशीमध्ये संपन्न होणाऱ्या ६० व्या वरिष्ठ राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी मुंबईचा संघ जाहीर करण्यात आला. मुंबईचा माजी विश्वविजेता प्रशांत मोरे आणि मुंबईची आंतरराष्ट्रीय कॅरमपटू ऐशा महम्मद साजिद मुंबईच्या संघाचे नेतृत्व करणार आहेत. मुंबईच्या पुरुष संघात प्रशांत मोरे, सिद्धांत वाडवलकर, विकास धारिया, नीरज कांबळे, निलांश चिपळूणकर व गिरीश तांबे यांची निवड करण्यात आली. तर महिला संघात ऐशा साजिद खानसहित मिताली पाठक, सोनाली कुमारी, अंबिका हरिथ, अंजली सिरीपुरम, व सिमरन शिंदेची निवड करण्यात आली आहे.

## कोलकाता आज विजयाचे खाते उघडणार

■ कोलकाता

**कोलकाताच्या** ईडन गार्डनवर उद्या होणाऱ्या आयपीएलच्या १५ व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनौ सुपर जायंट्स आमनेसामने येणार आहेत. आयपीएलच्या गुणतालिकेत १ गुणासह आठव्या स्थानावर असलेला कोलकाताचा संघ विजयाचे खाते उघडण्यासाठी मैदानावर उतरणार आहे. मात्र कोलकाताला फार्मात असलेल्या लखनौच्या मोहम्मद शमीचा सर्वाधिक धोका असणार आहे. आतापर्यंत दोन सामने खेळलेला लखनौचा संघ सुद्धा गुणतालिकेत २ गुणांसह सहाव्या स्थानावर विराजमान होणार आहे. हा संघ आता या स्पर्धेतील दुसरा विजय मिळवण्यासाठी सज्ज झाला आहे.

गेला सामना पावसामुळे रद्द झाल्याने कोलकाताला नशिबाने एक गुण मिळाला. पहिल्या तीन सामन्यांमध्ये कोलकाताच्या फलंदाज आणि गोलंदाजांनी चांगली कामगिरी केलेली नाही. मात्र कोलकाता लखनौविरुद्ध प्रभावी कामगिरी करून विजय मिळवण्याचा प्रयत्न करेल. लखनौचा मोहम्मद शमी कोलकाताविरुद्ध सर्वात मोठा धोका ठरू शकतो. कोलकाताने आतापर्यंत अजिंक्य रहाणे आणि फिन लन या सलामीच्या जोडीला संधी दिली आहे. परंतु त्यांना अपेक्षित यश मिळालेले नाही. संघ लनसोबत टिम सायफर्टला संधी देऊ शकतो.

## अजय कडू टागोर नगर श्रीचा मानकरी

■ मुंबई

**ताडदेव** जिमच्या अजय कडूने टागोर नगर मित्रमंडळाच्या व्यायाम शाळा विभागाने




आयोजित केलेल्या स्पर्धेत टागोर नगर श्री चा किताब पटकाविला. पेतीत जिमचा विजय गोडसे बेस्ट पोझर ठरला. ॲम्युचर बॉडी बिल्डिंग असोसिएशनच्या मान्यतेने टागोर नगरने कबड्डी स्पर्धेनंतर या राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन केले होते. विक्रोळी (पूर्व) येथील साईबाबा मंदिराशेजारील मैदानात झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून शरीर सौष्ठव स्पर्धकांनी भाग घेतला होता. शॉर्ट ग्रुप (१६५ से.मी. खालील)मध्ये संजीवनी जिमच्या कौस्तुभ राणेने अव्वल, अल्फा जिमच्या सुरेंद्र डांगवळने दुसरा, अविनाश राजपूतने तिसरा क्रमांक पटकाविला. मेडीयम ग्रुप (१६५ ते १७० से.मी.) मध्ये संजीवनी जिमचा मुकुंद मांजरेकर अव्वल, प्रेरणा जिमचा निहाल भुवड दुसरा, प्रेरणा जिमचा अविनाश गोरीवले तिसरा ठरला. टॉल ग्रुप (१७० ते १७५ से.मी.) मध्ये हनुमान सेवा मंडळाच्या शार्दूल हरियानने पहिला, रेंडोल्फ डिसोझाने दुसरा, अमित निकम तिसरा क्रमांकावर राहिला. सुपर टॉल ग्रुप (१७५ से. मी. पेक्षा अधिक) मध्ये ताडदेव जिमच्या अजय कडूने अव्वल, शेटय़ेज जिमच्या प्रशांत कांबळेने दुसरा, हनुमान सेवा मंडळाच्या कार्तिक शेलटकरने तिसरे स्थान पटकाविले.

## विरारमध्ये १२ एप्रिलला जांगलेश्वर क्रिकेट स्पर्धा

■ विरार

**विरार** पूर्वच्या मनवेल पाडा, महापालिका मैदानावर रविवारी १२ एप्रिलला सकाळी ७.३० वाजल्यापासून जांगलेश्वर क्रिकेट चषक स्पर्धा होणार आहे. गुहागरमधील उमराठ, डागवाडी, जांगलेश्वर क्रिकेट संघाच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत क्रिकेटप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, अशी विनंती जांगलेश्वर क्रिकेट संघाने केली आहे. सचिन गावणंग, सागर गावणंग, महेंद्र गावणंग ही स्पर्धा आयोजन करण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत.

## भारतीय महिला हॉकी संघ जाहीर

■ नवी दिल्ली

**हॉकी** इंडियाने आज अर्जेंटिना दौऱ्यासाठी २४ सदस्यीय भारतीय महिला हॉकी संघाची घोषणा केली. १३ ते १७ एप्रिल या कालावधीत ब्युनोस आयर्स येथे यजमान अर्जेंटिनाविरुद्ध ४ सामन्यांची मालिका खेळवली जाईल. सलिमा टेटेच्या नेतृत्वाखालील या संघात अनुभवी गोलकिपर सविता पुनिया आणि फॉरवर्ड दीपिकाचे पुनरागमन झाले.

**भारतीय महिला संघ**

गोलकिपर: सविता, बिचू देवी खरिबाम. डिफेंडर: निक्की प्रधान, इशिता चौधरी, सुशीला चानू पुखरामबम, मनीषा चौहान, लालथांटलुंगी, ज्योती, उदिता. मिडफिल्डर: वैष्णवी विठ्ठल फाळके, साक्षी राणा, सुनेलिता टोप्पो, सलिमा टेटे, नेहा, दीपिका सोरेंग, ऋतुजा दादासो पिसाळ, इशिता.

फॉर्म ए
जाहीर घोषणा
(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ६ अन्वये)

ग्रेव्हेक इन्व्हेस्टमेंट अँण्ड फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशिल

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | ग्रेव्हेक इन्व्हेस्टमेंट अँण्ड फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | ०६ जानेवारी १९९३ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | आरओसी मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U65990MH1993PTC070326 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | १३, ३रा मजला खेतान भवन १९८, जे टाटा रोड चर्चगेट मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००२० |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | ०७ एप्रिल २०२६ |
| ७. | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | ०४ ऑक्टोबर २०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | राजेंद्र दत्तात्रय आफळे IBBI/IPA-002/IP-N01002/2020-2021/13258 |
| ९. | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | सी २०३, सरोवर दर्शन टॉवर, अल्मेडा रोड, पाचपाखडी, टीएमसी जवळ, ठाणे, महाराष्ट्र, ४००६०१ rajaphale.ip@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल | cirp.grevekinvestment@gmail.com सी २०३, सरोवर दर्शन टॉवर, अल्मेडा रोड, पाचपाखडी, टीएमसी जवळ, ठाणे, महाराष्ट्र, ४००६०१ |
| ११. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | २१ एप्रिल २०२६ |
| १२. | कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग | लागू नाही |
| १३. | वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित फॉर्म आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत: | https://ibbi.gov.in/home/downloads किंवा आम्हाला cirp.grevekinvestment@gmail.com वर ईमेल करा. |

याद्वारे सूचना देण्यात येते की राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने **०७ एप्रिल २०२६** रोजी ग्रेव्हेक इन्व्हेस्टमेंट अँण्ड फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडच्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
ग्रेव्हेक इन्व्हेस्टमेंट अँण्ड फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना येथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यांसह २१ एप्रिल २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी बाब क्र.१० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत.
वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात.
दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.
अंतरिम ठराव व्यावसायिकाचे नाव आणि स्वाक्षरी : राजेंद्र दत्तात्रय आफळे
IBBI/IPA-002/IP-N01002/2020-2021/13258
दिनांक आणि ठिकाण : ९ एप्रिल, २०२६, मुंबई

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे.
याद्वारे सूचित करण्यात येते की, कॅस्टर लखनौ १ लॉजिस्टिक्स पार्क प्रायव्हेट लिमिटेड हे मुंबई शहर, वरळी, मुंबई-४०००१८च्या नोंदणीकरण उप-जिल्हा आणि जिल्ह्यामधील लोअर परेल विभाग, वरळीचा सीएस क्र. २/९१४, ४/९१४, ९१४, ३/९१४, १/९१४, ९१५, १ए/९१३(पी), ९१३(पी) आणि २८६(पी) धारण केलेल्या मोजमाप अदमासे १४,५०१.९३ चौरस मीटर्स जमिनीवर उभ्या असलेल्या सर्व खंड आणि तुकड्यावर बांधलेल्या "ओमकार १९७३ टॉवर "ए" को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि." या संस्थेमधील 'ओमकार १९७३ वरळी' या प्रकल्पाच्या 'टॉवर ए' (टॉवर १ असेही ओळखल्या जाणाऱ्या) या इमारतीच्या ४४ व्या मजल्यावर स्थित सदनिका क्र. ए-४४०४ मोजमाप अदमासे १३३.२० चौरस मीटर्स रेरा कार्पेट क्षेत्रफळ समतूल्य १४३३.७६ चौरस फूट रेरा कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह अनन्य मंजूर डेक क्षेत्रफळ ४४.१८ चौरस मीटर्स कार्पेट क्षेत्रफळ समतूल्य ४७५.५५ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ एकूण मोजमाप १७७.३८ चौरस मीटर्स कार्पेट क्षेत्रफळ समतूल्य १९०९.३२ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ चे संपूर्ण मालक आहेत.
सदर संबंधित मालमत्ता कॅस्टर लखनौ १ लॉजिस्टिक्स पार्क प्रायव्हेट लि.यांनी नोंदणी क्र. एमबीआय-३१-१९१५३ वर्ष २०२५ धारण केलेल्या, मुंबई-३१च्या उप-निबंधक कार्यालय येथे योग्यरित्या शिक्काबद्ध आणि नोंदणी केलेली दिनांक २९ जुलै, २०२५ रोजीच्या नोंदणीकृत हस्तांतरण करारनाम्याद्वारे खरेदी केली होती आणि विस्त्रा आयटीसीएल (इंडिया) लिमिटेडच्या प्रभाराच्या अधीन आहे.
संबंधित मालमत्ता, किंवा तिच्या कोणत्याही भागा/गांमध्ये किंवा करिता विक्री, देवाणघेवाण, भेट, भाडेपट्टी, भाडेकरू, परवाना, गहाणवट, प्रभार, धारणाधिकार, न्यास, वारसा, मृत्युपत्र, वहिवाट, ताबा, लागवड, भोगवटा, देखभाल, सामंजस्य करार, विकास अधिकार, विक्री करारपत्र या मार्गे किंवा अन्यथा कशाहीप्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, हितसंबंध, लाभ, दावा, किंवा कोणत्याही स्वरुपाची मागणी असणाऱ्या सर्व व्यक्तींनी त्याबाबत त्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना, पी.ओ. क्र. व्ही. पत्के ऑण्ड कं. ॲडव्होकेट्स, एफ-१, १ला मजला, शाह आर्केड, राणी सती मार्ग, पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळ, मालाड (पू), मुंबई - ४०० ०९७ येथे सदर दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे, अन्यथा असे समजण्यात येईल की, अशा सर्व व्यक्तींनी त्यांचे संबंधित मालमत्तेमधील कोणत्याही आणि सर्व स्वरुपाचे सर्व दावे, हक्क, हितसंबंध आणि शीर्षक समर्पित केले आणि सोडून दिले आहेत आणि त्यांच्याकडे संबंधित मालमत्तेमध्ये कोणत्याही स्वरुपाचा कोणताही दावा, हक्क, शीर्षक किंवा हितसंबंध शिल्लक नाही.
दिनांक ९ एप्रिल, २०२६
**व्ही. पत्के ऑण्ड कं. - ॲडव्होकेट्स**
एफ-१, १ला मजला, शाह आर्केड,
राणी सती मार्ग, पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळ,
मालाड (पू), मुंबई - ४०० ०९७

# भोंदूबाबा खरातच्या व्हिडिओत कोणती बाई बेशुद्ध दिसते?

■ मुंबई

**नाशिकमध्ये** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने राज्यभरात खळबळ उडवली असताना, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सवाल केला की, व्हिडिओमध्ये कोणती बाई बेशुद्ध दिसते? आपला समाज कोणत्या दिशेला चालला आहे?

**शर्मिला ठाकरेंचा सवाल**

व्हायरल व्हिडिओंमध्ये काही महिला खरातसोबत स्वेच्छेने वावरताना दिसत असल्याचा उल्लेखही शर्मिला ठाकरे यांनी केला आहे. यापूर्वी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अरुणा सबाणे यांनीही या प्रकरणावर भाष्य करत, काही महिला स्वतःहून अशा भोंदूबाबांकडे जात असल्याचे मत व्यक्त केले होते. त्यानंतर आता शर्मिला ठाकरे यांनीही तसेच मत व्यक्त करताना म्हटले की, महिलांनी सर्वप्रथम भोंदूबाबांकडे जाणे बंद केले पाहिजे. हे भोंदूबाबा स्वतः ला ब्रह्मा, विष्णू, महेश, लक्ष्मी, पार्वती अशा विविध रूपांत सादर करतात. पण आम्ही कुणाच्याही पाया पडत नाही. काहीजण आमच्यासोबत फोटो काढून आम्ही त्यांचे भक्त आहोत, असे दाखवण्याचा प्रयत्न करतात. असे कोणी केले, तर आम्ही तिथे जाऊन त्यांना जाब विचारू. त्यामुळे आमच्याकडे असे प्रकार होत नाहीत. तुम्हीही ते व्हिडिओ पाहिले असतील. त्यात कोणती महिला बेशुद्ध दिसते? मग फसवणूक म्हणायची कशी? हे सगळे काय चालले आहे?

# कांदिवलीत गुजराती फलक मनसेकडून ७ दिवसांची मुदत

■ मुंबई

**मुंबईतील** कांदिवली परिसरात एका दुकानावर केवळ गुजराती भाषेतील नामफलक लावल्यामुळे वाद निर्माण झाला आहे. मनसे कार्यकर्त्यांनी यावर आक्षेप घेत संबंधित दुकानधारकाला मराठीत नामफलक लावण्याबाबत निवेदन दिले आहे. या घटनेमुळे भाषाविषयक प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. कांदिवलीतील एका व्यावसायिक आस्थापनाने दुकानावर केवळ गुजराती भाषेतच नामफलक लावला होता. ही बाब लक्षात येताच मनसेच्या कार्यकर्त्यांनी त्या दुकानावर धडक देत महाराष्ट्रातील स्थानिक भाषा म्हणून मराठीला प्राधान्य देण्याची मागणी केली. तसेच राज्य शासनाच्या नियमांनुसार दुकाने व आस्थापनांवरील फलक मराठीत असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# पार्थ पवारांचा आज शपथविधी

**नवी दिल्ली** - दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र पार्थ पवार उद्या राज्यसभा खासदार म्हणून शपथ घेणार आहेत. या शपथविधीमुळे पवार कुटुंबातील आणखी एक चेहरा राष्ट्रीय पातळीवर सक्रिय होणार आहे. या सोहळ्याला सुनेत्रा पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे.


## महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ मर्यादित

एम एम आर डी ए MMRDA | Maha Mumbai Metro

(महाराष्ट्र सरकारचा उपक्रम)

४ था मजला, नामट्री इमारत, प्राधिकरणाच्या नवीन इमारतीजवळ, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
वेबसाईट: https://mahatenders.gov.in./www.mmmocl.co.in

### ई-निविदा सूचना

महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ मर्यादित (MMMOCL) द्वारे खालील नमुद निविदेकरिता पात्र निविदाकारांकडून खुल्या ई-निविदा मागविण्यात येत आहेतः

| | |
|---|---|
| निविदा/ बीडचे नाव | एमएमएमओसीएलच्या विद्यमान आणि आगामी मेट्रो मार्गांसाठी अग्निशामक पर्यवेक्षक, कनिष्ठ सुरक्षा पर्यवेक्षक आणि पॉईंट्समन यांचे मनुष्यबळ प्रदान करणे. |
| संपर्क ई-मेल | dp@mmmocl.co.in |
| ई-निविदा डाउनलोड करण्याचा कालावधी | ०७.०४.२०२६ (१८:०० वाजल्यापासून) ते ०७.०५.२०२६ (१६:०० वाजेपर्यंत) |
| निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख | ०७.०५.२०२६ (१६:०० वाजेपर्यंत) |

निविदा दस्ताऐवज प्राधिकरणाच्या https://mahatenders.gov.in/nicgep/app या ई-पोर्टलवरुनच उपलब्ध होतील. विस्तृत माहितीकरीता तसेच त्यानंतरच्या परिशिष्ट / शुध्दिपत्रकाकरिता (जर असल्यास), कृपया वरील नमूद ई-पोर्टलवर भेट द्यावी.
अतिरिक्त माहितीकरिता ई-निविदा २४x७ मदत कक्षास खालील क्रमांकावर संपर्क साधावा: support-eproc@nic.in अथवा दूरध्वनी क्र. ०१२०-४००१००२/००५ आणि ०१२०-६२७७७८७

दिनांक : ०७.०४.२०२६
स्थळ: मुंबई

स्वाक्षरी/-
व्यवस्थापकीय संचालक,
म. मुं. मे. सं. म. म.



## बृहन्मुंबई महानगरपालिका

### ई - निविदा जाहिरात

| | | | |
|---|---|---|---|
| खाते | | : | **जल अभियंता विभाग** |
| उपविभाग | | : | **उपजल अभियंता भांडुप संकुल** |
| महाटेंडर निविदा क्रमांक | | : | 2026_MCGM_1270528_1 |
| विषय | | : | **११० के. व्हि. विद्युत उपकेंद्र भांडुप संकुल येथील स्काडा प्रणालीची दुरुस्ती करणे** |
| निविदा विक्री | | : | दि. ०९.०४.२०२६ वेळ ०९.०० पासून दि. २२.०४.२०२६ वेळ १६.०० पर्यंत |
| संकेतस्थळ | | : | https://mahatenders.gov.in https://portal.mcgm.gov.in |
| संपर्क अधिकारी | | : | सहाय्यक अभियंता ( ११० केव्ही उपकेंद्र) भां.सं. |
| अ) | नाव | : | श्री. राजेंद्र पी. धनवडे |
| ब) | दूरध्वनी (कार्या.) | : | 022-25658539 |
| क) | भ्रमणध्वनी क्रमांक | : | 9930260383 |
| क. | ई-मेल पत्ता | : | aesubstnbc.he@mcgm.gov.in |

सही/-
कार्यकारी अभियंता (उ. उ. उ. स्का.)
भांडुप संकुल

पीआरओ/४६/जाहि./२०२६-२७

**जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.**


# जितेंद्र आव्हाडांच्या मुलीची प्रदेश सरचिटणीसपदी निवड

■ मुंबई

**राष्ट्रवादी** शरदचंद्र पवार गटाच्या युवा आघाडी आमदार जितेंद्र



आव्हाड यांची मुलगी नताशा आव्हाड यांची महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे नताशा आव्हाड यांच्या सक्रिय राजकीय प्रवासाची सुरुवात झाली आहे.

नताशा आव्हाड यांनी एम.टेकपर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे. तसेच त्यांनी स्पेनमध्येही शिक्षण घेतले आहे. त्या गेल्या काही काळापासून सामाजिक आणि राजकीय घडामोडींमध्ये सक्रिय दिसत होत्या. ठाण्यातील कळवा परिसरातील पाणी प्रश्नावर राष्ट्रवादी काँग्रेसने काढलेल्या मोर्चात त्यांनी सहभाग घेतला होता. तसेच विविध स्थानिक मुद्यांवर त्या आपली भूमिका मांडत असतात.

# बीडमध्ये ट्रकची धडक बँक अधिकाऱ्याचा मृत्यू

**बीड** - जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे आज सकाळी अपघातात एका बँक अधिकाऱ्याचा जागीच मृत्यू झाला. रिंग रोडवरील मानव लोक कार्यालयाजवळ घडलेल्या या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मृत अधिकाऱ्याचे नाव सुदर्शन टाक असे असून, ते सकाळी दुचाकीवरून कामावर जात होते. चौकाजवळून पुढे रिंग रोडवरून जात असताना एका ट्रकने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

# पुण्यात हिंदू जनआक्रोश मोर्चा रोखल्याने तणाव

**पुणे** - पुण्यात सासवड ते कोंढवा दरम्यान आज हिंदू जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. पुरंदर तालुक्यातील भिवरी गावाजवळील बापदेव घाट परिसरात घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ भाजपा आमदार गोपीचंद पडळकर, संग्राम जगताप आणि माजी आमदार संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला होता. मात्र हा मोर्चा पोलिसांनी मध्येच रोखल्याने परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. मोर्चात मोठ्या संख्येने तरुण आणि नागरिक सहभागी झाले होते. कोंढव्यातील संशयितांवर तातडीने गुन्हे दाखल करून अटक करावी, तसेच भिवरी ग्रामस्थांवर दाखल कथित खोटे गुन्हे मागे घ्यावेत, अशी आक्रमक मागणी करण्यात आली.


## महावितरण — पाचवी मुदतवाढ ई-निविदा सूचना

म.रा.वि.वि.कं.मर्या., कोल्हापूर ग्रामीण-२, विभागीय कार्यालयाअंतर्गत हुपरी उपविभाग करिता (बोलेरो, टाटा सुमो तत्सम) ई निविदा क्रं. T-२४/२०२५-२६ (रक्कम रुपये ११.४८४ लाख) महावितरणाच्या http://works.mahadiscom.in/e/Tender/etender या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदा भरणेचा कालावधी दिनांक १३.०४.२०२६ रोजी दुपारी ०४.०० वा. पर्यंत वाढविणेत येत आहे. तरी संबधितांनी नोंद घ्यावी. (संपर्क क्रमांक ७८७५७६९२०१)

पीआरओ-PRO/KOPZ/०६/२०२६-२७

कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग -२, कोल्हापूर.



## बृहन्मुंबई महानगरपालिका

### स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात

**विषय :** एन विभागातील स्मशानभुमीच्या दैनंदिन रखरखाव व साफसफाईच्या कामकाजाकरीता बहुउद्देशीय कामगारांची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्याबाबत.

एन विभागात बर्वे नगर व वर्षा नगर स्मशानभूमीतील दैनंदिन रखरखाव व साफसफाईच्या कामकाजाकरीता बहुउद्देशीय कामगारांची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता बृहन्मुंबई म.न.पा स्मशानभूमीतील कंत्राटी तत्वावर बहुउद्देशीय कामगार पुरविण्याबाबत कामाचा १ वर्षाचा अनुभव असलेल्या सेवाभावी संस्थांनीच/ कंपनींनीच अर्ज करावेत. इच्छुक सेवाभावीसंस्था/ कंपनी भविष्य निर्वाह निधी राज्य व कर्मचारी विमा योजनेमध्ये नोंदणीकृत सेवाभावी संस्था/ मालकी हक्क/ भागीदारी/ प्रायव्हेट लिमिटेड कंपनी (या संस्थांचा/ कंपनींचा स्थापनेचा उद्देश त्यांच्या सभासदांना रोजगार मिळविणे हा असावा) इ. सेवाभावी संस्थाकडून/ कंपनींकडून त्यांची पात्रता यादी तयार करून सोडत पद्धतीने निवड करून काम करण्यासाठी अर्ज मागवित आहोत.

अनामत रक्कम रू. 18,000/- व निविदा शुल्क रु.3,630 /- + 18% जीएस. टी = रू. 4,284/- प्रत्येक युनिटच्या कामाकरिता स्वतंत्र सोडत काढली जाईल.

अर्जाचा नमुना एन विभागातील घन कचरा व्यवस्थापन खाते कार्यालयात दि. ०९.०४.२०२६ ते दि.१५.०४.२०२६ वेळ १०.३० ते ५.०० या वेळेत मिळू शकेल. इच्छुक सेवा भावी संस्थांनी/ कंपनींनी अधिक तपशीलाकरीता, अर्ज व शपथ पत्राच्या नमुन्यासाठी एन विभाग घन कचरा व्यवस्थापन खाते कार्यालयात संपर्क करावा. सेवाभावी संस्थेने/ कंपनींनी अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. १६.०४.२०२६ वेळ १.०० PM नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-
पीआरओ/४८/जाहि./२०२६-२७ — सहाय्यक आयुक्त एन

**शक्यतो घरी केलेले व ताजे अन्न पदार्थ खावे.**



## महावितरण — ई-निविदा सूचना

सातारा विभागाअंतर्गत मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारांकडून लघुदाब, उच्चदाब व रोहित्रांच्या प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्ती कामासाठी ई निविदा क्र. T-०१/२०२६-२७ ते T-०३/२०२६-२७ करिता १२५.०० लक्ष रुपये निविदा मागविण्यात येत आहेत. वरील निविदा ई टेंडर पध्दतीनेच भरता येतील. त्याकरिता निविदा भरु इच्छिणाऱ्या ठेकेदाराचे महावितरणचे ई टेंडरचे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. संकेत स्थळावरुन निविदा भरण्याची अंतिम मुदत १६.०४.२०२६ पर्यंत राहिल. निविदा उघडण्याची तारीख १७.०४.२०२६ राहिल. आधिक माहिती व निविदा https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेत स्थळावर दिनांक ०७.०४.२०२६ पासून दि. १५.०४.२०२६ पर्यंत उपलब्ध आहेत. वरील सर्व निविदा अथवा एखादी निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार खालील निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

PRO No. : PRO/BMTZ/89/2026 — कार्यकारी अभियंता, सातारा



## महावितरण — निविदा सूचना

मान्यताप्राप्त व महावितरणच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन सातारा मंडलांतर्गत सातारा, कराड, वाई व वडुज विभागामध्ये बाह्यस्रोत कंत्राटी कामगार पुरविणेकरीता निविदा मागविण्यात येत आहेत (सातारा विभाग-निविदा क्र. ११/२०२५-२६, रक्कम रु. ७९२.७९ लक्ष), (कराड विभाग-निविदा क्र. १२ / २०२५-२६, रक्कम रु.७९२.४४ लक्ष ), (वाई विभाग-निविदा क्र. १३/२०२५-२६, रक्कम रु.५६६.४९ लक्ष), (वडुज विभाग - निविदा क्र. १४/२०२५-२६, रक्कम रु.५२७.२२ लक्ष) (GST वगळता) सदर निविदा ई-टेंडरिंग पद्धतीनेच भरता येतील. त्याकरीता निविदा भरु इच्छिणाऱ्या पुरवठादारांचे महावितरणकडे ई-टेंडरिंग नोंदणी असणे आवश्यक आहे. निविदेबाबतचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील. अधिक माहिती व निविदा प्रत www.mahadiscom.in या संकेतस्थळावर दि. १९.०४.२०२६ रात्री १२.०० पर्यंत उपलब्ध राहील.

मुख्य कार्यालय, मुंबई
पी. आर.ओ. क्र. ९४/२६

अधीक्षक अभियंता,
महावितरण, मंडल कार्यालय, सातारा.



## महावितरण — ई-निविदा सूचना

दि.०९.०४.२०२६ पासून महावितरण सिंधुदुर्ग मंडळ कार्यालयाअंतर्गत कंपनी मटेरिअल वाहतुक, लोडींग व अनलोडींग करण्यासाठी पात्र असणाऱ्या वाहतुकदाराकडुन एकुण १० लाखाचे ई-निविदा खालीलप्रमाणे मागविण्यात येत आहे.

SE/SC/LOADING & UNLOADING / MAT / 2026-27/T-01

सदर निविदांकरीता कार्यप्रदर्शन बयाना रक्कम (EMD) हे १०,०००/- रुपये निश्चित करण्यात आलेली आहे. सविस्तर ई-निविदा http://works.mahadiscom.in/eTender/etender संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहेत. ई-निविदा भरण्याची अंतिम मुदत दि. **२३.०४.२०२६** वेळ **१७:३५** अशी आहे. सदर निविदेचे शुल्क व लागू असणारे बयाणा शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील. अधिक माहितीसाठी मंडल कार्यालय, सिंधुदूर्ग कुडाळ फोन नं.७८७५७६५०७० यांचेशी संपर्क साधावा.

PRO / KZR / 03 / 2026-27 dt. 08.04.2026

अधिक्षक अभियंता, सिंधुदुर्ग मंडळ



## महावितरण — ई निविदा सूचना

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता, ठाणे विभाग-१ अंतर्गत, HT OH/UG Line Preventive Maintenance LT OH/UG Line Preventive Maintenance व DTC Preventive Maintenance साठी Empanelled Agency साठी (एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीसाठी) HT OH/UG Line Preventive Maintenance LT OH/UG Line Preventive Maintenance व DTC Preventive Maintenance कामे करण्यासाठी कंत्राटदाराकडून निविदा क्रमांक EE/THN-१/E-Tender/T-०१/२०२६-२७ , EE/THN-१/E-Tender/T-०२/ २०२६-२७ , EE/THN-१/E-Tender/T-०३/ २०२६-२७, साठी ऑनलाईन निविदा क्रमांक मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर etender.mahadiscom.in दि. ०६.०४.२०२६ ते दि. १३.०४.२०२६ (सकाळी ११.००) पर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा दिनांक १३.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि. १३.०४.२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. शक्य असल्यास उघडण्यात येतील. निविदा संदर्भात अधिक माहितीसाठी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, ठाणे विभाग-१, भ्रमणध्वनी क्र. ९९३०२६९४७० वर संपर्क साधावा. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्विकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरणच्या संकेतस्थळावर आपली नोंदणी करुन घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुध्दी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Announcements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
कार्यकारी अभियंता सं व सु विभाग ठाणे-१



## जाहीर सूचना

**तमाम जनतेस** याद्वारे सूचना देण्यात येते की, आमचे अशील (१) **श्री. परमानंद चुन्नीलाल गोकलगांधी आणि (२) सौ. मीता परमानंद गोकलगांधी निम्नउल्लेखित मालमत्ता खरेदी करण्यास इच्छुक आहेत** आणि त्या संबंधात निम्न उल्लेखित मालमत्तेकरिता (१) **श्री. नितिन मणीकांत कोठारी आणि (२) सौ. सोनाली नितिन कोठारी** यांच्या शीर्षकाची तपासणी करण्यास इच्छुक आहेत.

कोणा व्यक्तीचा सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये, वर किंवा विरुद्ध विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, भेट, वारसा, ताबा, भाडेपट्टी, परवाना, धारणाधिकार, प्रभार, न्यास, तडजोड, देखभाल, वहिवाट या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, हितसंबंध, दावा किंवा मागणी असल्यास, त्यांनी त्याबाबत अशा दाव्याचे समर्थन करणाऱ्या दस्तऐवजांच्या, जर असल्यास, प्रमाणित सत्य प्रतींसह लेखी स्वरुपात आम्हाला आमच्या **२०२, इलाईट स्क्वेअर, पेरीन नरिमन स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथील कार्यालयात** येथील दिनांकापासून **०७ (सात) दिवसांमध्ये** सूचित करणे आवश्यक आहे, असे न केल्यास आमचे अशील अशा दावा/मागणीच्या संदर्भाशिवाय प्रक्रिया सुरू करतील आणि ते सोडून दिले/त्याग केले असे समजण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन**

मुंबई शहर आणि मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील आणि मुंबई उपनगरच्या जिल्ह्यामधील जांबळी गल्ली, बोरीवली पश्चिम, मुंबई-४०००९२ येथील गाव कान्हेरीच्या सीटीएस क्र. ९९, ९९/१ ते १० येथे स्थित, जमिनीचे सर्व खंड किंवा तुकडे व त्यासह त्यावर उभ्या **सदनिका क्र. ७०२, ७वा मजला, विंग ए, भक्ती को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड**, गाव कान्हेरी, जांबळी गल्ली, एस. व्ही. रोड, बोरीवली, पश्चिम, मुंबई ४०००९२, मोजमाप **७२० चौ.फू. कार्पेट** क्षेत्रफळ व त्यासह **फर्निचर आणि फिक्स्चर्स (बाल्कनी इ. सह)** आणि "**भक्ती को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड**"मधील एक पार्किंग जागा या संरचना.

ठिकाणः मुंबई
दिनांकः ०९.४.२०२६

सही/-
लॉफोर्ट ॲडव्होकेट्स
धवल वेद (भागीदार)
ddved87@gmail.com



## महावितरण — ई निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कंपनीच्या संचलन व सुव्यवस्था विभाग, ईश्वरपूर कार्यालय अंतर्गत सन २०२६-२७ करिता लघुदाब, उच्चदाब व रोहित्र यासाठी प्रतिबंधात्मक देखभाल (Preventive Maintanance) करणेकरीता मान्यता प्राप्त ठेकेदारांच्याकडून निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा ई-निविदा पध्दतीनेच भरता येतील. त्याकरिता निविदा भरू इच्छिणा-या ठेकेदाराचे महावितरणचे ई-निविदा नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
**निवेदेचा तपशील खालीलप्रमाणे.**

| अ. क्र. | निविदा क्रमांक | निविदा तपशील | निविदा शुल्क |
|---|---|---|---|
| १ | EE/ISH/PM-LT-HT-DTC/T-05/2026-27 | Tender for Preventive Maintenance of HT, LT overhead lines and underground cables and Distribution Transformer Centre under ISHWARPUR Division of Sangli Circle. | रु.४८ लाख |

संकेत स्थळावरुन निविदा भरण्याची अंतिम मुदत दिनांक.१९.०४.२०२६ रोजी २३.५५ वाजेपर्यंत राहील. अधिक माहिती व ई-निविदा https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेतस्थळावर दिनांक. ०९.०४.२०२६ पासून उपलब्ध आहेत. वरील सर्व निविदा अथवा एखादी निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार खाली सही करणा-यांनी राखून ठेवला आहे. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक. ७८७५७६९५८४

PRO/KOPZ/०७/२०२६-२७ — कार्यकारी अभियंता (संवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., विभागीय कार्यालय, ईश्वरपूर



## महावितरण — 'ई' निविदा सूचना

मान्यताप्राप्त अनुभवी कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता निविदा मागवण्यात येत आहेत. इतर सर्व निविदा माहिती https://tender.mahadiscom.in/eatApp या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निम्नस्वाक्षरीधारकांकडे कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेबाबत अधिकार राखून ठेवले आहेत.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम | अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | EE/PPR/T-03/2026-27 | पंढरपूर विभागाअंतर्गत उच्चदाब ओव्हरहेड लाईन व अंडरग्राउंड केबलचा Preventive मेंटेनन्स करणेबाबत. | 125 लाख | 18.04.2026 |
| ०२ | EE/PPR/T-02/2026-27 | पंढरपूर विभागाअंतर्गत लघुदाब ओव्हरहेड लाईन व अंडरग्राउंड केबलचा Preventive मेंटेनन्स करणेबाबत | 125 लाख | 18.04.2026 |
| ०३ | EE/PPR/T-04/2026-27 | पंढरपूर विभागाअंतर्गत रोहित्र Preventive मेंटेनन्स करणे | 125 लाख | 18.04.2026 |

ई निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशीलासह व विहित नमुन्यात सादर करावी.
**ऑफिसचा पत्ता :-** कार्यकारी अभियंता, पोल फॅक्टरी जवळ, लिंक रोड, पंढरपूर, ता. पंढरपूर जि. सोलापूर

HO / PRO / 92 / 2026-27 — कार्यकारी अभियंता, महावितरण (संवसु) विभाग पंढरपूर



## MAHAGENCO — e-TENDER NOTICE – 141/2025–26

Maharashtra State Power Generation Co. Ltd.

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website https://eprocurement.mahagenco.in.

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| TN1026 CHP1 Refloated | 3000067276 | DESIGN, SUPPLY, INSTALLATION, COMMISSIONING AND TESTING OF HIGH PERFORMANCE ENERGY CHAIN SYSTEM FOR LONG TRAVEL SYSTEM OF STACKER/RECLAIMER NO. 1 & 2, PADDLE FEEDER NO. 3 & 4 AND SHUTTLE CONVEYOR 1 TO 6 IN CHP-I (4 X 210MW), TPS KHAPERKHEDA. | 78379964.00 | 500000.00 |
| TN1029 FF1 | 3000067318 | WORK OF REVAMPING, MODIFICATION AND UP-GRADATION OF FIRE DETECTION & ALARM SYSTEM INCLUDING SUPPLY OF THE MATERIAL FOR UNIT-5 BTG AREA AT 500MW KHAPERKHEDA TPS. | 42276420.00 | 426264.20 |

Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.

Sd /-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, TPS Khaperkheda



## महावितरण — ई-निविदा सूचना

महावितरण महावितरण कंपनीच्या रत्नागिरी विभागांतर्गत, लघुदाब आणि उच्चदाब वाहिनीच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाकरिता, महावितरण कंपनीच्या नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. विविध उपविभागांत खालीलप्रमाणे निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | उपविभाग | निविदा क्र. | निविदा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी शहर | EE/RTN/T/PM LT RTN U/T-01/2026-27 | १०.०० लाख |
| २ | रत्नागिरी ग्रामीण १ | EE/RTN/T/PM LT RTN R1/T-02/2026-27 | १०.०० लाख |
| ३ | रत्नागिरी ग्रामीण २ | EE/RTN/T/PM LT RTNR2/T-03/2026-27 | १०.०० लाख |
| ४ | संगमेश्वर | EE/RTN/T/PM LT SGM/T-04/2026-27 | १०.०० लाख |
| ५ | लांजा | EE/RTN/T/PM LT LNJ/T-05/2026-27 | १०.०० लाख |
| ६ | देवरुख | EE/RTN/T/PM LT DVK/T-06/2026-27 | १०.०० लाख |
| ७ | राजापूर १ | EE/RTN/T/PM LT RJP1/T-07/2026-27 | १०.०० लाख |
| ८ | राजापूर २ | EE/RTN/T/PM LT RJP2/T-08/2026-27 | १०.०० लाख |
| ९ | रत्नागिरी शहर | EE/RTN/T/PM HT RTN U/T-09/2026-27 | १०.०० लाख |
| १० | रत्नागिरी ग्रामीण १ | EE/RTN/T/PM HT RTN R1/T-10/2026-27 | १०.०० लाख |
| ११ | रत्नागिरी ग्रामीण २ | EE/RTN/T/PM HT RTNR2/T-11/2026-27 | १०.०० लाख |
| १२ | संगमेश्वर | EE/RTN/T/PM HT SGM/T-12/2026-27 | १०.०० लाख |
| १३ | लांजा | EE/RTN/T/PM HT LNJ/T-13/2026-27 | १०.०० लाख |
| १४ | देवरुख | EE/RTN/T/PM HT DVK/T-14/2026-27 | १०.०० लाख |
| १५ | राजापूर १ | EE/RTN/T/PM HT RJP1/T-15/2026-27 | १०.०० लाख |
| १६ | राजापूर २ | EE/RTN/T/PM HT RJP2/T-16/2026-27 | १०.०० लाख |

निविदा फी - रु.५९०/- बयाणा रक्कम रु १०,०००/- ई - निविदा भरणेची मुदत १७.०४.२०२६ पर्यंत आहे. निविदा दिनांक ०६.०४.२०२६ पासून कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

PRO NO PRO/KZR/ 02 /2026-27 — कार्यकारी अभियंता, रत्नागिरी विभाग



## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

क्र. झोपुप्रा,बृ/अभि/ओडी/अधिसूचना/न्यू बसेरा सह.गृह.संस्था (नियो)/३क(१)/विलेपार्ले(प)/के-प/२०२६/१४७४६ — दिनांकः ६ एप्रिल २०२६

**अधिसूचना**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ब च्या पोट कलम (३) अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करुन दिनांक ९ एप्रिल १९९८ रोजी राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ (क) उप-कलम (१) अनुसार ''झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'' घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपुप्रा, बृहन्मुंबई) यांना आहेत.

त्याअर्थी उक्त कलम ३ (क) चे उपकलम (१) मधील अधिकाराचा वापर करुन मी, खालीलप्रमाणे अनुसूचीमध्ये दर्शविलेले क्षेत्र ''झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'' म्हणून याद्वारे घोषित करीत आहे. सदरचे क्षेत्र बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ चे नियमन ३३(१०) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल करण्यास पात्र आहे.

**अनुसूची**

मौजे - विलेपार्ले (प), तालुका- अंधेरी
**स्थळ** - जुन्त नगर, समता नगर, खजूरवाडी, सी.डी.बर्फीवाला मार्ग, अंधेरी(प), मुंबई, **प्रभाग** - के/प
अर्जदार - न्यू बसेरा सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो)

| अ. क्र. | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र(चौ.मी.) | झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र (चौ.मी.) | एकत्रित चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| १ | ४८४/अ | १८४९४.१० | ५९६.२२ | न.भू.क्र. ५१२/अ, ५१२/ब, ५१२/क, ५१४, ५१७ | न.भू.क्र. ४८४/अ पै, ४८४/अ/१, ४८४/अ/२, ४८४/अ/३ | न.भू.क्र. ४८५, ५१२/अ, ५१२/ब, ५१२/१, ५१४ | न.भू.क्र. ४८४/अ पै, ५१७, ५१८/४, ५१८/५ |
| २ | ५१५ | १०८६९.६० | १०८६९.६० | | | | |
| ३ | ५१६ | २८०५.७० | २८०५.७० | | | | |
| एकूण | | ३२१६९.४० | १४२७१.५२ | | | | |

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई
प्रशासकीय इमारत, प्रा. अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

SRA/PRO/49/2026

स्वाक्षरी/-
(डॉ. महेंद्र कल्याणकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : ०२२-२६५६ ५८००, ६९१२ ५८०० ● फॅक्सः ०२२-२६५९ ०४५७ ● ई-मेलः info@sra.gov.in

चंदेरी च्वींगम

मुंबई | गुरुवार
९ एप्रिल, २०२६

नवा काळ

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

# अल्लू अर्जुन आणि अ‍ॅटलीचा ‘राका’

चित्रपटसृष्टीतील दोन दिग्गज शक्तींनी, म्हणजेच ‘आयकॉन स्टार’ अल्लू अर्जुन आणि ब्लॉकबस्टर दिग्दर्शक अ‍ॅटली यांनी त्यांच्या ‘राका’ या आगामी चित्रपटाची अधिकृतपणे घोषणा केली आहे. ती करत असताना एक गूढ स्वरूपाचे पोस्टर प्रदर्शित केले असून, त्यात चित्रपटाची एक छोटी, पण प्रभावी झलक पाहायला मिळते. हा चित्रपट जागतिक स्तरावरील प्रेक्षकांना डोळ्यासमोर ठेवून तयार केला जात आहे.

चित्रपटातील व्हिज्युअल्स आणि पोस्टरमधील प्रतिमांमधून अतिशय तीव्र आणि काहीसे अमानवीय (क्रिएचर-लाईक) वातावरण सूचित होत आहे. त्यामुळे या चित्रपटाविषयी प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे.

अल्लू अर्जुन यामध्ये आजवर कधीही न दिसलेल्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. अ‍ॅटली यांनी या प्रकल्पाबद्दल भावना व्यक्त करताना सांगितले की, हा चित्रपट म्हणजे गेल्या १८ वर्षांपासून जोपासलेली एक कल्पना आहे, जिने मला आजवर अनेक अर्थांनी घडवले आहे.




# बडजात्यांचा ‘ये प्रेम मोल लिया’ पूर्णत्वाकडे...


राजश्री प्रॉडक्शनचे सर्वेसर्वा सूरज बडजात्या यांच्या आगामी ‘ये प्रेम मोल लिया’ या चित्रपटाचे चित्रीकरण आता पूर्णत्वाकडे सरकले असून, येत्या महिनाभरात या चित्रपटाचे काम पूर्ण होईल अशी चिन्हे आहेत. कौटुंबिक मूल्यांची जपणूक करणाऱ्या या चित्रपटात आयुष्मान खुराणा आणि शर्वरी वाघ ही नवी जोडी प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.



या चित्रपटाचे बहुतांश चित्रीकरण यशस्वीरित्या पार पडले आहे. आता केवळ एक आठवड्याचे चित्रीकरण शिल्लक असून, एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात किंवा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हे अखेरचे वेळापत्रक पूर्ण केले जाईल. मध्यंतरी आयुष्मान आणि शर्वरी या दोघांनी मुंबईतील गोरेगाव रेल्वे स्थानकावर चित्रपटाच्या काही महत्त्वाच्या दृश्यांचे चित्रीकरण केले होते. शाद रंधावा, अनुपम खेर, सीमा पाहवा आणि सुप्रिया पाठक यांसारख्या दिग्गज कलाकारांच्या यात महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. राजश्री प्रॉडक्शनच्या परंपरेला साजेसा असा हा चित्रपट प्रेक्षकांना किती भावतो हे पाहायचे.

# रजनीकांतच्या चित्रपटास शाहरुखचा नकार

बॉलिवूडचा बादशहा शाहरुख खान सध्या त्याच्या आगामी ‘किंग’ या चित्रपटावर पूर्ण लक्ष केंद्रित करत आहे. याच कारणामुळे त्याने रजनीकांत यांच्या बहुप्रतिक्षित ‘जेलर २’ चित्रपटातील विशेष भूमिकेसाठी (कॅमिओ) नम्रपणे नकार दिला आहे. ‘जेलर २’ च्या निर्मात्यांनी पाच दिवसांच्या भूमिकेसाठी शाहरुखशी संपर्क साधला होता. सुरुवातीला तो या प्रस्तावाबाबत सकारात्मक होता. मात्र वेळेचे नियोजन आणि आपल्या लुकची गुप्तता राखण्यासाठी त्याने या प्रकल्पातून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे.





शाहरुख खानसाठी ‘किंग’ हा चित्रपट अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. कारण या चित्रपटाद्वारे त्याची मुलगी सुहाना खान मोठ्या पडद्यावर पदार्पण करत आहे. या चित्रपटात शाहरुखचा एक विशिष्ट लुक असून, तो चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी इतर कोणत्याही माध्यमातून प्रेक्षकांसमोर येऊ नये, अशी त्याची इच्छा आहे. त्यामुळे ‘जेलर २’ चे प्रदर्शन ’किंग’ नंतर होऊ शकेल का, अशी विचारणा शाहरुखने केली होती. परंतु ‘जेलर २’ ऑगस्टमध्ये तर ‘किंग’ डिसेंबर २०२६ मध्ये प्रदर्शित होणार असल्याने हे तांत्रिकदृष्ट्या शक्य झाले नाही. भूमिका नाकारली असली तरी शाहरुख खान आणि रजनीकांत यांच्यातील वैयक्तिक संबंध अतिशय जिव्हाळ्याचे आहेत. शाहरुखने स्वत: रजनीकांत यांच्याशी संवाद साधून आपली भूमिका स्पष्ट केली आणि भविष्यात योग्य वेळी एकत्र काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

# अमिषाने सुनावले झाकीरला

हास्यकलाकार झाकीर खान याने ‘धुरंधर: द रिव्हेंज’ या चित्रपटाच्या यशावरून ‘बॉलिवूडला मत्सर वाटत आहे’ असे विधान केले होते. या विधानावर अभिनेत्री अमिषा पटेलने कडक शब्दांत प्रत्युत्तर दिले असून, चित्रपटसृष्टी नेहमीच मोठ्या यशाचा आनंद साजरा करते, असा दावा केला आहे. एका पुरस्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन करताना झाकीरने उपरोधाने म्हटले होते की, या चित्रपटाच्या अफाट कमाईमुळे उद्योगातील काही घटक अस्वस्थ झाले आहेत. झाकीरच्या या टिप्पणीवर प्रतिक्रिया देताना अमिषाने म्हटले की, नकारात्मकता पसरवणे थांबवा! चित्रपटसृष्टीने ‘धुरंधर’चा नेहमीच आदर केला आहे आणि त्याचे कौतुकही झाले आहे. अमिषाच्या मते, एखाद्या चित्रपटाचे यश हे संपूर्ण उद्योगासाठी अभिमानाची गोष्ट असते आणि त्यात कोणाचाही मत्सर असण्याचे कारण नाही. बॉलिवूडमधील सुपरस्टार्सच्या प्रदीर्घ वारशाचा उल्लेख करत अमिषा पुढे म्हणाली, शाहरुख खान, सलमान खान, सनी देओल, हृतिक रोशन आणि अजय देवगण यांसारख्या कलाकारांनी केवळ एकच नाही, तर प्रत्येकी २५ पेक्षा जास्त ब्लॉकबस्टर चित्रपट दिले आहेत आणि ते यापुढेही देत राहतील. यशाची चव या उद्योगासाठी नवीन नाही, हे सांगताना तिने ‘गदर’चा संदर्भ देत स्पष्ट केले की, अनेक दशकांपासून इथल्या कलाकारांनी प्रेक्षकांवर मोहिनी घातली आहे आणि ही परंपरा यापुढेही सुरू राहील.





# वैयक्तिक ओळख जपण्यासाठी कार्तिक न्यायालयात

अभिनेता कार्तिक आर्यनने आपल्या नावाचा, प्रतिमेचा आणि ओळखीचा ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर होणारा अनधिकृत व्यावसायिक वापर रोखण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. डिजिटल युगात सेलिब्रिटींच्या ओळखीचा चुकीच्या पद्धतीने वापर होत असल्याच्या पार्श्वभूमीवर कार्तिकने उचललेले हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

कार्तिकने दाखल केलेल्या या बौद्धिक संपदा (आयपी) दाव्यामध्ये त्याने स्पष्ट केले आहे की, विविध ऑनलाईन प्लॅटफॉर्म आणि काही अज्ञात व्यक्ती त्याच्या संमतीशिवाय त्याच्या प्रतिमेचा वापर व्यावसायिक फायद्यासाठी करत आहेत. या याचिकेत त्याने अशा संस्थांविरुद्ध कायमस्वरूपी मनाई हुकूम देण्याची मागणी केली आहे, जेणेकरून त्याचा फोटो किंवा नावाचा वापर जाहिराती, मर्चंडाईज किंवा डिजिटल कंटेंटमध्ये करता येणार नाही.



गेल्या काही महिन्यांपासून भारतीय न्यायालयांमध्ये अशा प्रकारच्या अनेक प्रकरणांची सुनावणी झाली आहे. विशेषतः ‘डीपफेक’, बनावट जाहिराती आणि डिजिटल कॉपीजच्या वाढत्या धोक्यामुळे अनेक बड्या कलाकारांनी आपल्या ‘पर्सनॅलिटी राईट्स’च्या (व्यक्तिमत्व अधिकार) रक्षणासाठी कायदेशीर मार्ग स्वीकारला आहे. कार्तिक आर्यनच्या या प्रकरणावर लवकरच सुनावणी होण्याची शक्यता असून, त्याला न्यायालयाकडून तातडीने दिलासा मिळतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कस्तुरबा गांधी मुलींच्या शाळेतील शिक्षकांना सेवा समाप्ती नोटीस

## आझाद मैदानात उपोषण

■ पालघर

**जव्हार** तालुक्यातील गोरठण येथील खास मुलींसाठी असलेल्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या शाळेतील १५ शिक्षक व शिक्षकेतर कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवा समाप्ती नोटीस बजावली आहे. त्यामुळे या शाळेतील २३० मुलींचे शैक्षणिक भवितव्य अंधारात आले आहे. तर या शिक्षकांवर बेरोजगारीची वेळ आली आहे. त्यामुळे आपल्याला न्याय मिळण्यासाठी या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी आझाद मैदानात उपोषण सुरू केले आहे.

जव्हार तालुक्यातील गरीब आणि गरजू विद्यार्थिनी या शाळांमध्ये ५ वी ते १० वी पर्यंतचे २३० वंचित, अनाथ आणि अल्प भूधारक शेतकरी, शेतमजुरांच्या मुली निवासी शिक्षण घेतात. या शाळांमध्ये १५ कर्मचारी कार्यरत आहेत. अभियान बंद झाल्यास या मुलींच्या निवासाची आणि शिक्षणाची सोय कोलमडणार असून, त्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. २००३ साली सर्व शिक्षा अभियान सुरू झाले, ज्याचे नंतर समग्र शिक्षा अभियान असे नामकरण झाले. या अभियानात डेटा एन्ट्री ऑपरेटर, विशेष शिक्षक, कनिष्ठ सहाय्यक, गृहपाल, लेखापाल आणि समन्वयक अशा विविध १५ पदांवर कर्मचारी कंत्राटी तत्त्वावर कार्यरत आहेत. अनेकांनी या विभागात सुमारे २० ते २३ वर्षे सेवा दिली आहे. दरवर्षी एक महिन्याचा सेवाखंड देऊन त्यांना पुनर्नियुक्ती दिली जात असे. मात्र, यंदा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या प्रकल्प संचालकांनी सेवा समाप्त करण्याबाबत पालघर जिल्हा परिषदेला पत्र दिले आहे.

# ठाण्यामध्ये कोस्टल रोडच्या कामावेळी क्रेन कोसळली

■ ठाणे

**ठाण्यातील** ज्ञानसाधना कॉलेजसमोर आज सायंकाळी कोस्टल रोड प्रकल्पाच्या कामादरम्यान क्रेन कोसळली. या अपघातामुळे परिसरात काही काळ गोंधळ उडाला असला. मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा कोणीही जखमी झाले नाही.

कोस्टल रोड प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर क्रेन बाजूला हलवण्याचे काम सुरू होते. याच वेळी अचानक क्रेन कोसळली.



अपघाताच्या वेळी परिसरात वाहनांची वर्दळ होती. या घटनेमुळे ठाण्यातून मुंबईकडे जाणारी वाहतूक मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली. विशेषतः कोपरी उड्डाणपुलावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. कोपरी उड्डाणपूल ते तीन हात जंक्शनपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

# मुंबईकरांसाठी जीवाचे रान करा

## आदित्य ठाकरेंचे नगरसेवकांना आवाहन

■ मुंबई

**मुंबई** आपलीच आहे, मुंबईकरांसाठी जीवाचे रान करा, असे आवाहन उबाठाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी नगरसेवकांना केले. उबाठाने नगरसेवकांसाठी शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिरात आदित्य ठाकरे म्हणाले की, मुंबई महानगरपालिका थोडक्यात हुकली असली तरी मुंबईवरील आपला हक्क कायम आहे. पुढील पाच वर्षे सक्षम विरोधी पक्ष म्हणून काम करताना सामान्य मुंबईकरांचे प्रश्न सोडवण्यावर भर द्यावा. नगरसेवकांनी केवळ आपल्या प्रभागापुरते मर्यादित न राहता संपूर्ण मुंबईतील नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे. तसेच हे प्रश्न सभागृहात प्रभावीपणे मांडावेत. आपण सक्षम विरोधी पक्ष म्हणून काम करू आणि भविष्यात पुन्हा महापौर आपलाच असेल. या मार्गदर्शन शिबिरात उबाठाचे नेते सुनील प्रभू, विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# १५ एप्रिलपासून एसटी महाग मुंबई-पुणे प्रवास ३१४ रुपये



■ मुंबई

**राज्य** परिवहन (एसटी) महामंडळाने उन्हाळी सुट्ट्यांचा हंगाम लक्षात घेऊन प्रवाशांसाठी १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यासोबतच प्रति तिकीट दोन रुपये स्वच्छता अधिभारही आकारला जाणार आहे. ही भाडेवाढ १५ एप्रिलपासून लागू होणार आहे.

ही हंगामी भाडेवाढ केवळ साध्या (नॉन-एसी) एसटी गाड्यांसाठी लागू राहणार असून, स्वच्छता अधिभार मात्र सर्व प्रकारच्या एसटी गाड्यांवर लागू असेल. सध्या मुंबई-पुणे मार्गावर साध्या एसटीसाठी २८१ रुपये भाडे आकारले जाते. नव्या दरानुसार १० टक्के वाढीनंतर हे भाडे ३१२ रुपये होईल. त्यावर दोन रुपयांचा स्वच्छता अधिभार मिळून प्रवाशांना एकूण ३१४ रुपये मोजावे लागतील. राज्य परिवहन प्राधिकरणाने (एसटीए) एसटी महामंडळाला यात्रा, उन्हाळी सुट्टी आणि सणासुदीच्या काळात ३० टक्क्यांपर्यंत भाडेवाढ करण्यास पूर्वीच मंजुरी दिली आहे. त्यानुसार २०२६ च्या उन्हाळी हंगामासाठी १० टक्के भाडेवाढ निश्चित करण्यात आली आहे.

ही वाढ तात्पुरती असून, पुढील दोन महिन्यांसाठीच लागू असेल. मात्र, स्वच्छता अधिभार कायमस्वरूपी राहणार आहे. एसटी महामंडळाकडे सफाई कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने बसस्थानके, आगार आणि गाड्यांची स्वच्छता राखण्यासाठी कंत्राटी पद्धतीने कामे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# कराडच्या नीलम शिंदेची अमेरिकेत मृत्यूशी झुंज संपली

■ सातारा

कराड तालुक्यातील वडगाव (उंब्रज) येथून अमेरिकेत शिक्षणासाठी गेलेल्या लाडक्या लेकीची तब्बल १४ महिन्यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली.

भारतीय वेळेनुसार काल रात्री साडेअकरा वाजता अमेरिकेत नीलमचा अंत्यविधी पार पडला. हा विधी व्हिडीओ कॉलिंगद्वारे पाहूनच वडील तानाजी शिंदे, मामा संजय कदम, कुटुंबीय आणि गावकरी तिचे अंतिम दर्शन घेतले. सातासमुद्रापार शिक्षणासाठी गेलेली आपली लेक आता कायमची दुरावली, या दुःखाने शिंदे कुटुंब शोकसागरात बुडाले असून, संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत आहे. नीलम तानाजी शिंदे ही तरुणी अमेरिकेत एमएसच्या शेवटच्या वर्षाचे शिक्षण घेत होती. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी योगा क्लासवरून सायकल बाइकवरून होस्टेलकडे परतत असताना भरधाव कारने तिला जोरदार धडक दिली. या अपघातात तिच्या डोक्याला तसेच हात-पायांना गंभीर दुखापत झाली आणि ती कोमात गेली.

# सुनेत्रा पवारांच्या सुरक्षेबाबत निनावी पत्र व्हायरल! प्रज्ञा खोसरेवर आरोप

■ बीड

**उपमुख्यमंत्री** सुनेत्रा पवार यांच्या जीवितास आणि प्रतिष्ठेस धोका असल्याचा दावा करणारे एक निनावी पत्र व्हायरल झाल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या पत्रात राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या बीड जिल्हाध्यक्षा प्रज्ञा खोसरे यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले असून, त्यांच्यामुळेच सुनेत्रा पवार यांना धोका असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

व्हायरल झालेल्या या पत्रात असेही लिहिले आहे की, प्रज्ञा खोसरे या भोंदूबाबा अशोक खरात यांच्या संपर्कात असून, त्या त्यांच्या हस्तक म्हणून काम करत आहेत. तसेच महिलांना त्यांच्याकडे नेण्याचे काम त्या करतात. प्रज्ञा खोसरे यांनी स्वतःच्या भावाच्या पत्नीचा हुंड्यासाठी छळ केला असून, त्याबाबत बीडच्या शिवाजी नगर पोलीस स्टेशन येथे २००९ मध्ये एफआयआर नोंदवण्यात आला आहे. याशिवाय त्यांनी स्वतः ४-५ वेळा गर्भलिंग निदान करून गर्भपात केले आहे. बीड जिल्ह्यातील इतर महिलांनाही पुत्रप्राप्तीसाठी किंवा गर्भलिंग निदानासाठी विविध डॉक्टरांकडे घेऊन गेल्या आहेत. या आरोपांनंतर प्रज्ञा खोसरे यांनी आक्रमक भूमिका घेत सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. प्रज्ञा खोसरे म्हणाल्या की, कोणताही ठोस पुरावा नसताना केवळ निनावी पत्र व्हायरल करून माझी बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यांच्या विरोधात लवकरच मानहानीचा दावा दाखल करणार आहे. मी अशोक खरात यांचा जाहीर निषेध करते आणि त्यांना कडक शिक्षा व्हावी, हीच माझी भूमिका आहे.

# अंजनगाव प्रकरणानंतर माढ्यात परवानगीशिवाय पुतळा बसवला

■ सोलापूर

**माढा** तालुक्यातील अंजनगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या वादाचे प्रकरण ताजे असतानाच, आता त्याच तालुक्यातील मोडनिंब गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा मध्यरात्री अनधिकृतरित्या बसवण्यात आल्याने नवीन वाद निर्माण झाला आहे.

मोडनिंब गावातील ग्रामपंचायत कार्यालयासमोरील ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेत हा पुतळा उभारण्यात आला. विशेष म्हणजे, हा प्रकार मध्यरात्री घडल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला असून, त्यामुळे प्रशासन आणि पोलीस यंत्रणाही सतर्क झाली आहे. कोणतीही अधिकृत परवानगी न घेता काही जणांनी रात्रीच्या वेळी हा पुतळा बसवला. सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर गावात चर्चांना उधाण आले. काही नागरिकांनी या कृतीचे समर्थन केले असले, तरी अनधिकृतपणे पुतळा बसवण्याच्या प्रकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. अंजनगावातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या वादानंतर ही घटना घडल्याने प्रशासनासाठी ही संवेदनशील परिस्थिती ठरत आहे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांकडून परिसरात बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

# रेल्वे यार्डसाठी माती भराव! वसईला पुराचा धोका

■ वसई

**वसई** येथे रेल्वे यार्ड तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर माती भराव करण्यात आल्याने परिसरात पुराचा धोका निर्माण झाला आहे. भराव करताना रेल्वेने नैसर्गिक नाले आणि पाण्याचा निचरा होण्याचा मार्ग बंद केल्याचे स्थानिकांनी सांगितले.

पश्चिम रेल्वेवरील विरार-बोरिवलीदरम्यान नव्याने ५ आणि ५ क्रमांकाची मार्गिका टाकली जाणार असून त्यासाठी नायगाव जवळ ३० ट्रॅकचे यार्ड तयार केले जाणार आहे. या कामासाठी भूसंपादन झाल्यानंतर रेल्वेने वसई आणि नायगाव दरम्यान मोठ्या प्रमाणावर माती भराव केला आहे. या माती भरावामुळे उमेळे, उमेळमान, दिवाणमान, माणिकपूर आणि नवघर तसेच वसई स्थानकाचा परिसर जलमय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे स्थानिकांनी या कामाला विरोध केला आहे. माती भराव केल्यामुळे पाणी जाण्याचे मार्ग बंद होऊन पुराचा धोका निर्माण झाला आहे, असे माजी महापौर नारायण मानकर यांनी सांगितले. या विरोधाच्या पार्श्वभूमीवर आज पश्चिम रेल्वेचे मुख्य प्रकल्प व्यवस्थापक आनंद कुलकर्णी यांनी भेट देऊन पाहणी केली. ज्या ठिकाणी पाणी जाण्याचे मार्ग आहेत ते मोकळे केले जातील. तसेच पाण्याचा निचरा होण्यासाठी बॉक्स कल्व्हर्ट तयार केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. १५ मे पर्यंत हे काम पूर्ण केले जाणार आहे. या प्रकल्पाचे काम २०२७ च्या अखेरीस पूर्ण होईल. पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेचे काम २०२८ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

# खलाशी दीक्षित सोलंकीच्या पार्थिवाची डीएनए चाचणी करा

## मुंबई हायकोर्टाचे निर्देश


■ मुंबई

**इराण-अमेरिका** युद्धादरम्यान ४ मार्च रोजी ओमानच्या किनाऱ्याजवळ ड्रोन हल्ल्यात मरण पावलेल्या खलाशी दीक्षित सोलंकी याच्या पार्थिवाची डीएनए चाचणी करण्यासाठी पार्थिव कलिनाच्या फोरेन्सिक लॅबकडे पाठवा, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने नौकानयन महासंचालकांना दिले.



दीक्षित सोलंकी हा एका जहाजावर खलाशी होता. ४ मार्च रोजी त्याचा ड्रोन हल्ल्यात मृत्यू झाला. त्यानंतर त्याचे पार्थिव ताब्यात देण्याच्या मागणीसाठी त्याच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार दीक्षित सोलंकीचा मृतदेह ओमानमधून भारतात पाठवण्यात आला. मात्र दीक्षितच्या मृत्यूबद्दल ओमानमधील अधिकाऱ्यांनी संभ्रमात टाकणारी उलटसुलट माहिती दिल्यामुळे दीक्षितच्या वडिलांनी सोमवारी पुन्हा न्यायालयात धाव घेत पार्थिवाची डीएनए चाचणी करण्याचे निर्देश संबंधितांना द्यावेत, अशी मागणी केली. त्यावरील सुनावणीप्रसंगी न्यायालयाने पार्थिवाची डीएनए चाचणी करून ओळख निश्चित करावी. फोरेन्सिक लॅबचा अहवाल आल्यानंतर तो अहवाल मयताच्या नातेवाईकांना द्यावा, असे निर्देश न्यायालयाने दिले.

# नवाकाळ शब्दकोडे– १५७०



**आडवे शब्द –**

३. अभिनेत्री ४. एखादी गोष्ट उघड करणे, बोलणे ६. अननुभवी ९. चीर, फट ११. वाऱ्याच्या सहाय्याने वीजनिर्मिती करणारे उपकरण १४. शिक्षक १५. शिक्का १७. प्रयत्नाने याचा 'नारायण' होतो १९. लठ्ठ, रुंद २०. तांबडी माती, काव २१. खुमखुमी २३. काम टाळणारा २५. कोकणात पिकणारे अतिउष्ण धान्य २७. पंगतीत वाढणारा २८. रमलेला ३०. दया ३१. शिखा ३२. टेकडी, चढण ३४. कट्टर ३७. लाकूड ३८. किमया ४०. ताबडतोब ४२. जिव्हा ४४. ग्राम, छोटे गाव ४६. मनाविरुद्ध कोणामागे जावे लागणे ४७. पारतंत्र्यात अडकलेला ४९. पक्षीसमूह ५१. शेवट, अंत ५२. प्रयोजन, हेतू ५४. चंगळ, विपुलता ५५. कमी टिकणारे ५७. लहान मूल ५९. अधोगती ६१. अनुरक्त ६२. चक्र ६३. उणे ६५. अर्धी ओंजळ ६७. वडील ६९. शर्विलक ७०. 'आला आला वारा संगे पावसाच्या धारा...' (हा खेळ सावल्यांचा चित्रपटातील आशा भोसले-अनुराधा पौडवाल यांच्या आवाजातील गाणे ) ७५. बाईपणाचे गुण ७६. कचरा ७७. मृत्युदेवता ७८. काचेची बांगडी ८०. पार्वतीचे एक नाव ८२. मत, मनाचा ग्रह ८४. देवाणघेवाण ८६. विजयी ८७. अर्थपूर्ण ८९. कक्ष ९०. मातीचे पात्र ९२. श्रीराम ९४. सलगी ९५. अंगवळणी पडलेली गोष्ट ९६. त्रिकोणी आकाराचा तिखट तळलेला पदार्थ ९८. नगारखान्यातील प्रमुख वाद्य ९९. गंध उगाळण्याचा दगड १०१. हुद्दा १०२. नुकसान १०४. मतभेद १०६. उजळणी १०७. नेहमी १०८. मरुत १०९. मुनी ११०. त्वचा १११. वस्ती, वास्तव्य

**उभे शब्द –**

१. पूर्वज २. मस्त, सुरेख ३. खात्रीने ४. अश्व ५. तडजोड न करणारा ७. अरण्य ८. कत्तल १०. दगाबाज १२. पारंब्या असलेले झाड १३. एक कडधान्य, याच्या पाल्याची भाजी लोकप्रिय १४. दत्ताचा वार १६. सासरी होणारा छळ १८. चोळी २१. भरपूर उत्पादन देणारी जमीन २२. कागदाचे चारशे ऐंशी ताव २४. कावळ्याचे ओरडणे २५. जुन्या तऱ्हेचे कर्णभूषण २६. दफनभूमीवरील स्मारक २९. उपाय ३१. मारूतीच्या मूर्तीवर याचा लेप करतात ३३. अडचणीच्या जागी साठलेली अडगळ ३५. भीती ३६. हेकट ३८. म्हशीची उत्तम जात ४०. खोटा, दिखाऊ ४१. सूट ४३. पती ४५. गवई ४८. झोप ५०. रस्ता ५१. पेटी ५३. राख, भस्म ५६. मिंधा ५८. शिवरात्रीला या फळाचा प्रसाद असतो ५९. अस्ताव्यस्त पडलेल्या वस्तू ६०. पलायन, पसार होणे ६४. अर्भकाचे केस ६५. नियंत्रण ६६. बेघर, कलंदर ६८. ज्ञानेश्वरीतील प्रार्थना ७०. अपमान ७१. कुर्निसात ७२. आकाशात हिंडताना पिल्लांवर लक्ष ठेवणारी ७३. कुसुम, पुष्प ७४. शर ७८. कंदर्प ७९. सोने ८१. अर्जुनाचे एक नाव ८२. सुखरूप ८३. निबर ८४. घर ८५. वैद्यकीय उपचाराआधी केलेले उपचार ८७. खोल बुडी मारणे ८८. व्याघ्र ८९. गुरांना बांधण्याचा लांब दोर ९१. लाडवाचा बसका प्रकार ९३. ढग ९५. आश्रय ९६अ. हाक ९७. दहावे नक्षत्र १००. टोपली १०३. बिशाद १०५. बारा वर्षे १०६. अब्रू, प्रतिष्ठा १०७. एक अधिक पाव •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५६९ चे उत्तर**

**आडवे शब्द** : ३. शाबास ५. अट ६. अमानुष छळ ९. तुकारामबीज १२. उग्र १३. पर्जन्य १५. लत १६. हात १७. उर्ध्व १८. रोख १९. नराधम २१. चैन २२. कडीपाट २४. वाढ २५. छान २६. यथा २८. ताजवा २९. तरबेज ३१. माया ३२. उणीव ३४. पेला ३५. डझन ३७. मामा ३८. ताल ३९. खुबा ४०. नफा ४२. नारद ४४. बट्टा ४५. घावन ४६. जलावरण ४८. डाव ४९. गहन ५०. सल ५२. तंगडतोड ५४. वणवा ५५. गोरा ५७. जन्म ५८. मतलबी ६०. तीर ६१. धणे ६२. लक्षणीय ६४. भेद ६६. रजत ६७. जरा ६९. तह ७१. खजील ७३. जाणीव ७४. वाजवी ७६. वात्रट ७८. लज्जत ७९. वळ ८०. राब ८१. तनू ८२. बटवा ८४. मशक ८६. रूपवान ८८. डेरा ९१. निरपेक्ष ९४. गवा ९६. केव्हा भेटसी केशवा ९७. अनवरत ९९. शर १००. रमल १०२. साव १०३. क्षमा १०४. वसन १०५. चकवा १०६. चालना १०७. साम्य

**उभे शब्द** : १. अतुलनीय २. कारा ३. शाबीत ४. बाज ५. अग्र ६. अर्ज ७. मान्यता ८. षडानन १०. कात ११. महानता १२. उर्ध्वपातन १३. पखवाज १४. श्रम १७. उडी २०. धरणी २२. कवाड २३. टर २५. छाया २७. थापेबाज ३०. बेकार ३१. मामा बनवणे ३२. उलघाल ३३. वदन ३६. झब्बा ४०. नव ४१. फारकत ४२. नावडती ४३. दगड ४७. लाल ४८. डाग ५०. सवालजवाब ५१. हजरजवाबी ५२. तंबी ५३. तोरणा ५५. गोणी ५६. रायते ५८. मदत ५९. लक्ष्मी ६१. धरणीकंप ६३. क्षतज ६५. शेजी ६८. रात्र ७०. हलवा ७१. खतम ७२. लवकर ७५. वीतराग ७७. टब ८०. रान ८३. टवटवी ८५. शनिवार ८६. रूक्ष ८७. वादन ८९. लाव्हारस ९०. सांकेतिक ९२. पेट्रोल ९३. भरवसा ९५. वारेमाप ९६. केशव ९७. अनल ९८. वसा १०१. मठ्ठ

# निवडणुकीतून माघार नाही भाजपा राष्ट्रवादीला फसवते

**हर्षवर्धन सपकाळ यांचे स्पष्टीकरण**

■ मुंबई

**काँग्रेसने** बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीतून माघार घेतली नाही. भाजपा या प्रकरणी मुद्दाम अफवा पसरवून राष्ट्रवादी काँग्रेसची फसवणूक करत आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले आहे.

बारामती विधानसभा मतदारसंघात येत्या २३ तारखेला पोटनिवडणूक होत आहे. ही जागा अजित पवारांच्या निधनानंतर रिक्त झाली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार येथून सत्ताधारी महायुतीतर्फे निवडणूक लढवत आहेत. त्यांना शरदचंद्र पवार पक्षाने पाठिंबा दिला आहे. मात्र काँग्रेसने ही जागा लढवण्याची घोषणा करत येथून आकाश मोरे यांना उमेदवारी दिली आहे. पण आज अचानक काँग्रेसने उमेदवारी अर्ज मागे घेतल्याची चर्चा सुरू झाली असताना काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी तातडीने स्पष्टीकरण दिले. सपकाळ म्हणाले की, बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेण्याबाबत भारतीय जनता पक्षाच्या कोणत्याही नेत्याने काँग्रेस पक्षाशी अद्याप संपर्क साधलेला नाही. या संदर्भात प्रसारित होत असलेल्या बातम्या पूर्णपणे खोट्या, दिशाभूल करणाऱ्या आणि निराधार आहेत. अशा अफवा मुद्दाम पसरवून भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसची फसवणूक करत आहे.

# खरातला दुसऱ्या गुन्ह्यात १४ दिवसांची कोठडी

पान १ वरून - मिळवण्यासाठी एसआयटीने अर्ज केला. तो न्यायालयाने मंजूर केला. सुनावणीनंतर सरकारी वकील शैलेंद्र बागडे म्हणाले की, आरोपीविरोधात दुसऱ्या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडी मिळाली असून तिसऱ्या गुन्ह्यात ताबा घेण्याचा अर्जही मंजूर झाला आहे. त्यामुळे उद्या पुन्हा अशोक खरातला न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. या प्रकरणात पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आणखी ११ पीडितांनी तक्रार दाखल केले आहेत. त्यांनी 'ऊर्जा व मन-शरीर शांती पूजा'च्या नावाखाली लैंगिक शोषण केल्याचा खरातवर आरोप केला आहे. खरातचे अश्लील व्हिडिओ समाज माध्यमांवर १५-२० रुपयांना विकले जात असल्याची माहिती आहे. त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे.

# पालिकेचा २०० कोटींचा भूखंड ५ कोटींमध्ये जिंदाल कंपनीला

पान १ वरून

देशपांडेंनी असा आरोप केला की, २३३६ स्क्वेअर मीटरच्या या भूखंडाची किंमत सुमारे २०० ते २५० कोटी रुपये आहे. मात्र, नव्या प्रस्तावानुसार हा भूखंड जिंदाल स्टील (जेएसडब्ल्यू) फाउंडेशनला देण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे आणि त्यासंदर्भात निविदा प्रक्रिया राबवण्यात आली आहे. एवढ्या मौल्यवान भूखंडाच्या बदल्यात महानगरपालिकेला केवळ ५ कोटी २९ लाख रुपये आणि वर्षाला फक्त ३ हजार रुपये लीज भाडे मिळणार आहे. हा भूखंड ३० वर्षांसाठी लीजवर देण्यात येणार असून, त्यावर जेएसडब्ल्यू फाउंडेशन बांधकाम करणार आहे. या प्रकल्पात एकूण १०० जागा असतील, त्यापैकी केवळ ४० जागा महानगरपालिकेला मिळणार आहेत. महानगरपालिकेची नर्सची वार्षिक गरज साधारण १,००० ते १,५०० इतकी असताना केवळ ४० जागांमुळे ही गरज पूर्ण होणार नाही. मग २५० कोटींचा भूखंड देऊन महानगरपालिकेला नेमके काय मिळणार? हा भूखंड नेमका कोणाच्या स्वार्थासाठी दिला जात आहे आणि या व्यवहारामागे काय करार झाले आहेत, याबाबत अनेक शंका उपस्थित होत आहेत. मात्र, या बाबींची सखोल चौकशी व्हावी, ही आमची मागणी आहे. या संदर्भात महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे. त्यांनी वेळ दिल्यास आम्ही आमची बाजू मांडणार आहोत.

**पाली नगरपंचायत**
**जि. रायगड**
**निविदा सूचना**
ई-मेल: palinagarpanchayat2021@gmail.com

मुख्याधिकारी, पाली नगरपंचायत, जि.रायगड यांच्या वतीने पाली नगरपंचायत हद्दीतील मराठा समाज हॉल ते शिक्षण सोसायटी टेंभी कडे जाणाऱ्या रस्त्यावर सोलर स्ट्रीट लाईट उभारणे या कामाची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सर्व इच्छुक निविदाधारकांनी ई-निविदा प्रणालीच्या http :// mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून निविदा प्रपत्र डाऊनलोड करून संचाची किंमत व बयाना रक्कम Net Banking द्वारा Online भरावेत. ई - निविदा Online सादर करावयाची दि. ०९/०४/२०२६ ते दि. १६/०४/२०२६ रोजी दुपारी ३.०० वा पर्यंत राहील.
जा.क्र. ०४५ दि. ०८/०४/२०२६

सही/-
(कोमल कराळे)
मुख्याधिकारी
पाली नगरपंचायत
जि. रायगड

# अमेरिकेची माघार! २ आठवडे युद्धबंदी

पान १ वरून

इराणने होर्मुज खुली केली नाही तर आजवर कोणीच कोणावर केला नसेल असा भीषण हल्ला करून संपूर्ण इराण बेचिराख करू, असा निर्वाणीचा इशारा ट्रम्प यांनी सोमवारी दिला होता. त्यामुळे मंगळवारी रात्री नेमके काय होते याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. ट्रम्प यांच्या या निर्वाणीच्या इशाऱ्यानंतरही इराण आपल्या भूमिकेवर ठाम राहिला होता. त्यामुळे युद्ध अधिक चिघळेल, अशी चिंता जगाला लागली होती. अशा प्रचंड तणावाच्या परिस्थितीत ट्रम्प यांनी आज थेट युद्धविरामाची घोषणा केल्याने जगाने सुटकेचा निःश्वास टाकला. अमेरिकेने पाकिस्तानचे शरीफ यांच्या मध्यस्थीने तर इराणने चीनच्या आग्रहामुळे युद्धविरामाचा प्रस्ताव स्वीकारला, असे सांगण्यात आले. मात्र इराणने हा प्रस्ताव स्वीकारताना ट्रम्प यांच्यासमोर दहा अटींचा प्रस्ताव ठेवला आहे. या अटी मान्य झाल्या तरच कायमस्वरुपी युद्ध बंद होईल, अशी ठाम भूमिका घेतली. आमचे सैन्य आजही लढण्यास सज्ज आहे, शत्रूने जराशी चूक केली तर त्याला ताकदीने उत्तर दिले जाईल, असा इशारा इराणने दिला. इराणच्या या ताठर भूमिकेसमोर नमते घेत ट्रम्प यांनी इराणचा अटींचा प्रस्ताव स्वीकारला. आता या प्रस्तावावर इस्लामाबादमध्ये १० एप्रिल रोजी इराण आणि अमेरिकेच्या प्रतिनिधींची एक बैठक होणार आहे. या बैठकीच्या यशापयशावर युद्धविरामाचे भवितव्य अवलंबून आहे.

होर्मुजवर इराण व ओमानचेच नियंत्रण राहील, युद्धामुळे झालेले प्रचंड नुकसान भरून काढण्यासाठी होर्मुजमधून जाणाऱ्या जहाजांकडून टोल वसूली करण्याचे इराणचे अधिकार मान्य करावेत, इराणची सुरक्षा, आर्थिक स्थैर्य आणि प्रादेशिक शांततेची हमी अमेरिकेने द्यावी, युरेनियम संवर्धनाला परवानगी द्यावी, अमेरिका व इस्त्रायलच्या सैन्याने माघार घ्यावी अशा अटी इराणने ठेवल्या आहेत. यावरील चर्चेवेळी तडजोड होईल अशी आशा आहे. त्यामुळे अखब्या जगाचे आता या बैठकीकडे लक्ष लागले आहे. भारताने यावर प्रतिक्रिया देताना म्हटले की आम्ही याचे स्वागत करतो, यामुळे पश्चिम आशियात दीर्घकाळ शांतता प्रस्थापित होईल व होर्मुजमधून वाहतूक व व्यापार सुरू होईल.

# सौदीमधील अरामको पेट्रोकेमिकल प्लांटवर इराणच्या लष्कराचे भीषण हल्ले

**तेहरान** - सौदी अरेबियातील अरामकोच्या एका मोठ्या पेट्रोकेमिकल प्लांटवर हल्ला झाल्याची माहिती हाती आली आहे. हा प्रकार प्रादेशिक युद्धातील आणखी एक धोकादायक टप्पा मानला जात आहे. इस्त्रायल व अमेरिकेच्या इराणविरोधातील कारवायांना प्रत्युत्तर म्हणून इराणी दलांनी गल्फमधील ऊर्जा पायाभूत सुविधांवर हल्ला केल्याचे वृत्त आहे. जुबैल येथील सॅबिक प्लांटमध्ये हल्ल्यामुळे आग लागली. स्फोटांचे आवाज खूप मोठे होते. जुबैल हे सौदी अरेबियाच्या पूर्व भागातील जगातील सर्वात मोठ्या औद्योगिक शहरांपैकी एक असून येथे स्टील, पेट्रोल, पेट्रोकेमिकल्स, ल्युब्रिकेटिंग ऑईल आणि रासायनिक खतांचे उत्पादन केले जाते. या औद्योगिक भागावरील हल्ल्याच्या वेळी सौदीच्या हवाई संरक्षण दलांनी पूर्वेकडील भागावर लक्ष्य केलेल्या क्षेपणास्त्रांच्या माऱ्याला प्रत्युत्तर दिले.

**लिलाव**
**सनपॉवर मेटॅलिक्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)**
नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ नुसार मालमत्तांची विक्री
इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (परिसमापन प्रक्रिया) रेग्युलेशन्स, २०१६ च्या नियम ३३ अंतर्गत अनुसूची १ नुसार

**सनपॉवर मेटॅलिक्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)** कंपनीच्या मालमत्तांच्या विक्रीबाबत याद्वारे सूचना देण्यात येत आहे. विक्रीची प्रक्रिया परिसमापक यांच्यामार्फत बोली/लिलावाद्वारे केली जाईल. खालील अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तांच्या विक्रीसाठी, अधोस्वाक्षरीकर्ता परिसमापकांकडून निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत.
**कॉर्पोरेट कर्जदाराच्या मालमत्तांची स्वतंत्रपणे विक्री केली जाईल.**
**ई-लिलावाची तारीख आणि वेळ: २३ एप्रिल २०२६, सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वा.**

मालमत्तेची अनुसूची

| अ. क्र. | मालमत्तेचा पत्ता | सर्वे क्र. | कार्यालय क्र./ फ्लॅट क्र./दुकान क्र. | कार्पेट क्षेत्र (एसएमटी) | राखीव मूल्य (रू.मध्ये) | इरठे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | फ्लॅट क्र.३०२ए काव्या हिल व्ह्यू, एस.क्र.४३/३, गाव बोरीवाडे, तालुका आणि जिल्हा ठाणे. | एस.क्र.४३/३ | फ्लॅट क्र.३०२ए | ४४६ चौफू | ६३,५२,६५०/- | ६,३५,२६५/- |
| २. | फ्लॅट क्र.३०३ए काव्या हिल व्ह्यू, एस.क्र.४३/३, गाव बोरीवाडे, तालुका आणि जिल्हा ठाणे. | एस.क्र.४३/३ | फ्लॅट क्र.३०३ए | ३८७ चौफू | ५७,५८,४२५/- | ५,७५,८४३/- |
| ३. | कार्यालय क्र.०१, १ल्या मजल्यावर, काव्या हिल व्ह्यू, एस.क्र.४३/३, गाव बोरीवाडे, तालुका आणि जिल्हा ठाणे. | एस.क्र.४३/३ | कार्यालय क्र.०१ | २,५१५ चौफू | २,४६,२१,८६३/ | २४,६२,१८६/- |
| ४. | फ्लॅट क्र.२०३/बी, अटलांटिस कोहौसो, एस.क्र.३२/१, गाव बोरीवाडे, तालुका आणि जिल्हा ठाणे. | एस.क्र.३२/१ | फ्लॅट क्र.२०३/बी | १००८ चौफू | ८७,०३,९००/- | ८,७०,३९०/- |

परिसमापकाला कोणतीही कारणे न देता सर्व किंवा कोणत्याही प्रस्तावांना स्वीकारण्याचा आणि/किंवा नाकारण्याचा अधिकार राखीव आहे. सदर मालमत्ता 'जशी आहे तशी' या तत्त्वावर विकली जात आहे.

| | |
|---|---|
| पात्रता कागदपत्रे सादर करण्याची अंतिम तारीख | २१.०४.२०२६ |
| कॉर्पोरेट कर्जदाराच्या मालमत्तेची तपासणी | १०.०४.२०२६ ते २०.०४.२०२६ |
| इसारा रक्कम ठेव जमा करण्याची अंतिम तारीख | २१.०४.२०२६ (स.११.००वा. पर्यंत) |
| पात्र बोलीदारांसाठी ई-लिलावाची तारीख आणि वेळ | २३.०४.२०२६, स.११.०० ते दु.२.०० |

**ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती:**
१. ही विक्री जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, जसे आहे जे काही आहे, कोणत्याही दाव्याशिवाय या तत्त्वावर केली जाईल.
२. ही विक्री अधोस्वाक्षरीकर्ता व्यक्तीद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित मुदतवाढीसह) केली जाईल.
३. ई-लिलाव विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तींसाठी, इच्छुक अर्जदार https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home येथे उपलब्ध असलेला 'संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवज' पाहू शकतात किंवा परिसमापकाला milind.kasodekar@kmdscs.com liq.sunpowermetalics@gmail.com या ईमेलवर ईमेल पाठवून तो मिळवू शकतात.
४. ई-लिलाव प्रक्रिया/हेल्पलाईन क्रमांकासाठी, दूर.क्र: +९१ ८२९१२२०२२०, ईमेल: support.ebkray@psballiance.com.
५. जागेची पाहणी आणि मालमत्तेशी संबंधित चौकशीसाठी, कृपया किमान एक दिवस आधी milind.kasodekar@kmdscs.com किंवा liq.sunpowermetalics@gmail.com या ईमेलवर पूर्वसूचना द्यावी.
६. पात्रतेच्या कागदपत्रांची तपासणी केवळ लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच केली जाईल, त्यामुळे सर्व बोलीदारांना पात्रतेची कागदपत्रे योग्यरित्या तपासून सादर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.
७. हे लक्षात घ्यावे की, बोलीदाराने राखीव किमतीपेक्षा कमी मूल्याची/किमतीची बोली लावू शकत नाहीत आणि त्यांनी प्रत्येक वस्तूसाठी स्वतंत्रपणे बोली लावावी.
८. सल्लागार समितीशी सल्लामसलत केल्यानंतर यशस्वी बोलीदाराची घोषणा केली जाईल.
९. बोली सादर करू इच्छिणाऱ्या पात्र बोलीदारांना सेवा प्रदात्याच्या https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home या वेबसाईटला भेट देण्याची विनंती आहे.
१०. संभाव्य बोलीदारांनी असे हमीपत्र सादर करावे की, त्यांना संहितेच्या कलम २९ए अंतर्गत लागू असलेल्या मर्यादेपर्यंत कोणतीही अपात्रता नाही आणि कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, जमा केलेली इसारा रक्कम जप्त केली जाईल.
११. परिसमापकाला ई-लिलावाच्या कोणत्याही अटी व शर्ती स्वीकारण्याचा, रद्द करण्याचा, वाढवण्याचा किंवा सुधारित करण्याचा अधिकार असेल.
१२. या लिलाव सूचनेतील विस्तार/शुद्धिपत्रके https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home या वेबसाईटवर सूचित केली जातील आणि कोणतेही स्वतंत्र कागदी प्रकाशन जारी केले जाणार नाही. इच्छुक बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी कृपया ibbi.baanknet.com या लिलाव वेबसाईटला/लिलाव आयडीला भेट द्यावी.
१३. लिलाव प्रक्रियेची सर्व कागदपत्रे बान्कनेट पोर्टलवर अपलोड केली आहेत आणि सहभागींनी ती डाउनलोड करून सर्व कागदपत्रे पोर्टलवर सादर करणे आवश्यक आहे.
१४. इसारा रक्कम ठेव (इरठे) जवळच्या पूर्णांकापर्यंत पूर्णांकित केली जात आहे.
१५. विक्री ही नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ आणि नियमांमधील तरतुदींच्या अधीन असेल.

**मिलिंद कासोडेकर**
**परिसमापक**
**सनपॉवर मेटॅलिक्स प्रायव्हेट लिमिटेड**
IBBI/IPA-002/IP-NO.0116/2017-18/10285
**पत्ता: ३रा मजला, सत्यगिरी अपार्टमेंट ७७, विजयानगर कॉलनी, २१४७, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०**
**दिनांक: ०९.०४.२०२६**
**ठिकाण: पुणे**

# शिखर बँक घोटाळा! रोहित पवारांच्या याचिकेवर गुणवत्तेनुसार निर्णय घ्या

पान १ वरून

होते. सुमारे २५ हजार कोटी रुपयांच्या कथित शिखर बँक घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने याप्रकरणी अतिरिक्त क्लोजर रिपोर्ट दाखल केला असून न्यायालयाने तो स्वीकारला आहे.

याप्रकरणी आमदार रोहित पवार आणि इतर ११ जणांनी या प्रकरणातून आपल्यालाही दोषमुक्त करावे, अशी मागणी करणारा अर्ज न्यायालयात केलेला आहे. यावर अतिरिक्त सत्र न्यायाधीश महेश जाधव यांच्यासमोर मंगळवारी सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत ईडीच्यावतीने वकील सुनील गोन्साल्विस यांनी युक्तिवाद करताना कोर्टाला सांगितले की, न्यायालयाने यात क्लोजर रिपोर्ट स्वीकारला असला तरी ईडीचा हस्तक्षेप अर्जाची फेटाळण्याची मागणी करणाऱ्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका २०११ पासून मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. युक्तिवाद ऐकल्यावर मुंबई सत्र न्यायालयातील विशेष कोर्टाने या प्रकरणाची सुनावणी १३ एप्रिलपर्यंत तहकूब केली.

कन्नड सहकारी साखर कारखाना हा रोहित पवार यांच्या मालकीच्या बारामती अॅग्रो लिमिटेडच्या मालकीचा आहे. या साखर कारखान्याचे ८०.५५ कोटी रुपयांचे थकीत कर्ज वसूल करण्यासाठी बँकेने त्यांच्या सर्व मालमत्ता ताब्यात घेतल्या होत्या. त्यानंतर अत्यंत कमी किमतीत या साखर कारखान्याचा लिलाव करण्यात आला. या लिलाव प्रक्रियेतही रोहित पवारांच्या जवळच्या व्यक्तींना झुकते माप देण्यात आल्याचा आरोप करत ईडीने आमदार रोहित पवार यांच्यासह अन्य काही जणांविरोधात पीएमएलए अंतर्गत पुरवणी आरोपपत्र दाखल केले आहे. यात रोहित पवार यांच्या बारामती अॅग्रोसह अन्य कंपन्यांनी या संशयास्पद व्यवहार केले आहेत, असा ठपका ठेवण्यात आला आहे.

# इच्छापत्र नोंदणीसाठी कस्टोडियन नियुक्त

पान ८ वरून

२०१८ मध्ये 'निष्क्रिय इच्छामरणा'ला मान्यता दिल्यानंतर, भारतात 'लिव्हिंग विल' किंवा 'अॅडव्हान्स मेडिकल डायरेक्टिव्ह' कायदेशीररित्या वैध ठरले आहे.

सुप्रीम कोर्टाने २०१९ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये संरक्षकांची नियुक्ती करण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले होते. तरीही या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी २०२४ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. संरक्षकांची नियुक्ती आणि प्रक्रिया निश्चित करण्याबरोबरच सरकारने mahaulb.in हा डिजिटल प्लॅटफॉर्म सुरू केला आहे. शासन निर्णयानुसार अर्जदार या प्लॅटफॉर्मवर जाऊन फॉर्म भरू शकतात आणि कायदेशीर तरतुदीनुसार तयार केलेली लिव्हिंग विल अपलोड करू शकतात. त्यानंतर अर्जदाराने संरक्षकांसोबत ऑनलाईन अपॉइंटमेंट घ्यावी लागते. ती सात दिवसांत दिली जाते. प्रत्यक्ष भेटीदरम्यान अपलोड केलेल्या विलची प्रत आणि ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**जाहीर नोटीस**
**भवन्स महाविद्यालय, चौपाटी,**
यांच्याकडून सर्व संबंधितांना कळविण्यात येते कि महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी संघ म्हणजेच Alumni Association स्थापन करण्यात येत आहे. तरी सर्व इच्छुक माजी विद्यार्थ्यांनी पुढील ठिकाणी संपर्क किंवा Whatsapp करावा:
**श्रमिक- 8356020215**
**Email: bhavansalumni2020@gmail.com**

**न्यु हरि ॐ सहकारी गृहनिर्माण संस्था (रजि.)**
रजि. नं. एम. यु. एम./ एम. एम. आर. डी. ए./ एच. एस. जी. (टी. सी.)/ २२५/२०१०-११
एम. एम. आर. डी. ए., कॉम्प्लेक्स, के-६/०२, स्टेशन रोड, कांजूरमार्ग (प.), मुंबई - ४०० ०७८.

दिनांक : ०८/०४/२०२६
वरील सोसायटीच्या वतीने लिहून देण्यात येते की, आमच्या सोसायटीचे रहिवाशी कै. सुखराज बिहारी यादव यांचे दिनांक २२/११/२०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे वारस हृदयनारायण सुखराज यादव हे आपल्या कुटुंबासोबत राहतात, हे कायम स्वरूपी आमच्या सोसायटीचे रहिवाशी आहेत तरी ही खोली त्यांचे नावे करण्यास काहीही हरकत नाही. तरी रुम नं. २२२ दुसरा मजला हा हृदयनारायण युवराज यादव यांचे नांवे करावा, हि नम्र विनंती.

शिक्का
सही/-
न्यु हरि ॐ सहकारी गृहनिर्माण संस्था (रजि.)

नवा काळ

• मुंबई | गुरुवार ९ एप्रिल, २०२६ • पान -८

# केरळ, आसाम व पुद्दुचेरीत आज विधानसभेचे मतदान



**बारपेटा -** देशभराचे लक्ष लागलेल्या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांपैकी केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी येथे उद्या मतदान होणार आहे. या तिन्ही राज्यांतील प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. या तिन्ही राज्यांमध्ये मिळून एकूण २९६ जागांसाठी मतदान होणार आहे. त्यात आसाममध्ये १२६, केरळमध्ये १४० आणि पुद्दुचेरीतील ३० जागांचा समावेश आहे. या निवडणुकांचे निकाल पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू विधानसभा निवडणुकांनंतर ४ मे रोजी एकत्रित जाहीर करण्यात येणार आहेत. तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी, तर पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल रोजी मतदान पार पडणार आहे. केरळमध्ये मुख्यमंत्री पिनारयी विजयन यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी डाव्या आघाडी (एलडीएफ) सलग तिसऱ्यांदा सत्तेत येण्याच्या प्रयत्नात आहे. आसाममध्ये मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा सत्ता मिळवण्याचा भाजपाला विश्वास आहे. पुद्दुचेरीमध्ये द्रमुक आणि काँग्रेस यांची आघाडी आहे. काल काँग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि द्रमुकचे नेते एम. के. स्टॅलिन यांनी सभा घेत मतदारांना शेवटचे आवाहन केले.

# इराण जिंकला नाही! पण पराभूतही झाला नाही

**- समीर करंबे**



**चाळीस दिवसांपासून चालू असलेल्या इराण विरुद्ध अमेरिका-इस्त्रायल आखाती युद्धात अखेर दोन आठवड्यांसाठी (का होईना) युद्धविराम घोषित झाला. हा युद्धविराम सशर्त असला तरी युद्धामुळे सध्या जगात निर्माण झालेला भूराजकीय तणाव कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. मध्यस्थ देशांचे यासाठी गेले काही दिवस प्रयत्न चालू होते. त्यामुळे आज ना उद्या युद्धविराम होणार, हे ठरलेलेच होते. ट्रम्प यांनी काल -परवा एका रात्रीत इराणला संपवू, एक संस्कृती आज रात्री संपूर्ण नष्ट होणार, अशा वल्गना करत इराणला धमक्या दिल्या होत्या. त्यांनीच आज सकाळी युद्धविराम मान्य केला. हे ट्रम्प यांच्या लहरी, बेभरवशी स्वभावाला साजेसे झाले.**



**आतापर्यंतच्या** या युद्धात जिंकले कोण आणि हरले कोण, याचा विचार केला तर बलाढ्य अमेरिका -इस्त्रायलचा या युद्धात पराभव झाला नसला तरी त्यांचा विजय नक्कीच झाला नाही. तर इराणचा विजय झाला नसला तरी पराभवही नक्कीच झाला नाही. हे युद्ध मुळातच इस्त्रायल अमेरिकेने कारण नसताना छेडले. इस्त्रायलचे राष्ट्राध्यक्ष बेंजामिन नेतन्याहू यांची ती राजकीय गरज असू शकते. त्यांना इस्त्रायलचे तहहयात प्रमुख बनायचे आहे. चीनच्या जिनपिंग यांच्याप्रमाणे त्यांचे स्वप्न आहे. त्यामुळे त्यांना अधूनमधून युद्धाची सुरसुरी येत असते. जनतेच्या मनात युद्धज्वर पेरला की आपली मनिषा पूर्ण करणे सोपे होईल, असे त्यांना वाटत असल्याने त्यांनी गाझापाठोपाठ इराणविरोधात युद्ध छेडले. त्यांनी युद्धाची ठिणगी पेटवली म्हणून अमेरिकेने त्यात उतरायचे काहीच कारण नव्हते. इराणमधील इस्लामी राजवट अमेरिकेला खुपत असली तरी इराणकडून अमेरिकेला थेट धोका कधीच नव्हता. नेतन्याहू यांच्या मागे फरफटत अमेरिका युद्धात सामील झाली.

अमेरिका -इस्त्रायल या देशांना असे वाटले होते की, आपली ही आघाडी महाबलाढ्य आहे. इराणला नमवणे अजिबात अवघड होणार नाही. या युद्धाला काहीतरी कारण असावे म्हणून इराण अण्वस्त्रे विकसित करत आहे, अशी आवई उठवण्यात आली. २००४ मध्ये इराकमध्ये सद्दाम हुसेनची राजवट असताना अमेरिकेने आखाती युद्ध केले तेव्हाही इराककडे सामूहिक संहाराची अस्त्रे - शस्त्रे असल्याचा प्रचार होता. त्याचे कुठलेच पुरावे नव्हते. हा प्रचार पूर्णपणे खोटा असल्याचे नंतर सिद्ध झाले. आताही इराणकडे कुठलाही अण्वस्त्र कार्यक्रम नाही, असे आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेने अलीकडेच म्हटले आहे. त्यामुळे हे युद्ध मुळात खोटेपणावर बेतलेले आहे. निव्वळ नेतन्याहू यांची युद्धखोरी आणि ट्रम्प यांची युद्धखोरी यासाठी ते पुकारण्यात आले होते. त्यामुळे जगातील इतर देशांनी अमेरिकेला साथ दिली नाही. अगदी 'नाटो'तील अमेरिकेच्या सहकाऱ्यांनीही स्वतःला या युद्धापासून दूर ठेवले. त्यावर ट्रम्प यांनी थयथयाट केला. नाटो तोडण्याची धमकीही दिली. परंतु कुणीही त्याला बधले नाही. हे युद्ध अनावश्यक असल्याची बाब यातून अधोरेखित झाली.

हे युद्ध आपणच सुरू केल्याने इराण-अमेरिकेवरच ते जिंकण्याची जबाबदारी आली. इराण आपल्या सामर्थ्यापुढे काही दिवसांत माघार घेईल, असे दोन्ही देशांना वाटले होते. त्यांनी इराणला उद्ध्वस्त करण्याचे हर प्रकारे प्रयत्न केले. इराणचे सर्वोच्च नेते खोमेनी यांना त्यांच्या परिवारासह टिपले. अनेक लष्करी अधिकाऱ्यांना ठार केले. इराणच्या तेलसाठ्यांवर, ऊर्जा प्रकल्पांवर, सरकारी इमारतींवर हल्ले केले. अनेक निरपराध नागरिकांचे बळी घेतले. पण इराण डगमगला नाही की, त्याने कच खाल्ली नाही. ट्रम्प दररोज मोठमोठ्या बढाया मारत राहिले, नवनव्या धमक्या देत राहिले. युद्ध कधीच संपले आहे. आम्ही इराणला नष्ट केले, असे म्हणत राहिले. लष्कराला संपवले आहे. इराणने अतिशय शांत राहून प्रत्युत्तर दिले. इराणची शस्त्रे काही दिवसांत संपतील, अशी अमेरिका-इस्त्रायलची अटकळ होती. इराणकडील छुप्या क्षेपणास्त्रांचा त्यांना अंदाज आला नाही. इराणने इस्त्रायलवर हल्ला करून त्यांचे बहुचर्चित आयरन डोम कवच कुचकामी ठरवले. एवढेच नव्हे तर तीन हजार किलोमीटर अंतरावर असलेल्या हिंदी महासागरातील अमेरिकेच्या दिएगा गार्सिया बेटावर हल्ला करून अमेरिकेला चकित केले. याहून अधिक प्रभावी ती इराणची युद्धनीती. अमेरिका-इस्त्रायलने हल्ले सुरू केल्यावर इराणने मध्य-पूर्वेतील अमेरिकेच्या मित्रदेशांवर हल्ले करायला सुरुवात केली. वास्तविक या देशांचा या युद्धाशी काही संबंध नव्हता. परंतु या देशांची कळ काढल्याशिवाय अमेरिकेवर वळ उमटणार नाही, हे इराणला ठाऊक होते. म्हणून सौदी अरेबिया, जॉर्डन, ओमानसारख्या देशांना इराणने लक्ष्य केले. तिथल्या अमेरिकन बँका, सॉफ्टवेअर कंपन्यांची कार्यालये, तेल प्रकल्पांवर हल्ले चढवले. यात सगळ्यात मोठा फटका आंतरराष्ट्रीय आर्थिक केंद्र असलेल्या दुबईला बसला. मध्य-पूर्वेत अमेरिकेचे जुने आर्थिक हितसंबंध आहेत. हे सगळ्या जगाला ठाऊक आहे. त्यातही ट्रम्प आणि त्यांच्या कुटुंबाचे खासगी आर्थिक हितसंबंध आहेत. तो वर्मी लागला. इराणने या देशांवर निशाणा साधल्याने अमेरिकेवर दबाव आला. याशिवाय युद्ध सुरू होताच इराणने होर्मुजची सामुद्रधुनी तेलवाहतुकीला बंद केली. जगातील २० टक्के तेलवाहतूक या सामुद्रधुनीतून होते. ती बंद झाल्याने जगातील तेल व्यवहार विस्कळीत झाला. यामुळे तेलाचे भाव भडकले. ही नाकेबंदी परिणामकारक ठरली. त्यामुळे युद्धविरामाची मागणी जगभरातून होत होती. त्यातून युद्धविरामाची चर्चा सुरू झाली होती. अखेरच्या काही दिवसांत अमेरिकाच युद्धविरामाबाबत आग्रही (की हतबल) असल्याचे वाटत होते.

आता दोन आठवड्यांच्या युद्धबंदीनंतर प्रामाणिकपणे तिचे पालन होणार का, त्यानंतर पुन्हा युद्ध सुरू होणार का, मध्य-पूर्व धुमसत राहणार का, असे अनेक प्रश्न आहेत. या युद्धविरामापासून इस्त्रायल अलिप्त असल्यासारखा वाटत आहे. या युद्धविरामात लेबनॉनचा समावेश नाही, असा सूर इस्त्रायलने लावला आहे. इस्त्रायलची युद्धाची खुमखुमी लवकर संपणारी नाही. शिवाय खोटारडेपणा हा त्यांचा स्थायी स्वभाव आहे. या युद्धाची फलनिष्पत्ती काय? तर काहीच नाही. ना इराण पराभूत झाला ना इराणमधील इस्लामी राजवट उलथली. अमेरिकेच्या भ्रमाचा भोपळा फोडणारे हे आणखी एक युद्ध ठरले. अमेरिका युद्ध सुरू करते. परंतु ते संपवत नाही. किंबहुना तिला ते संपवता येत नाही. व्हिएतनाम, इराक आणि अफगाणिस्तानात हे दिसून आले आहे. इराणच्या बाबतीतही हेच घडत आहे. या युद्धात इराणबरोबर अमेरिकेचेही नुकसान झाले आहे. त्याची किंमत आता अमेरिका जगाकडून वसूल करेल.

# समरजीत घाटगेची भाजपात घरवापसी हसन मुश्रीफांसोबतचा वाद संपला

■ मुंबई

**विधानसभा** निवडणुकीत तिकीट न मिळाल्याने भाजपा सोडून शरद पवार गटात गेलेले कोल्हापूरचे नेते समरजीत घाटगे यांनी अखेर पुन्हा भाजपामध्ये घरवापसी केली आहे. मुंबईतील भाजपा प्रदेश कार्यालयात मंत्री चंद्रकांत पाटील आणि रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत त्यांनी पुन्हा कमळ हाती घेतले. यावेळी घाटगे यांनी मंत्री हसन मुश्रीफ यांच्याशी असलेले दीर्घकालीन वैर संपल्याचे स्पष्ट केले.

पक्षप्रवेशानंतर समरजीत घाटगे म्हणाले की, मी माझ्या मूळ पक्षात परतलो आहे. यामुळे कोणालाही अडचण निर्माण होणार नाही. हसन मुश्रीफ यांच्याशी असलेला वाद संपला असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांदरम्यानच आमच्यात सलोखा निर्माण झाला होता. या घडामोडींमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका महत्त्वाची होती. भाजपामध्ये पुन्हा प्रवेश करण्याचा निर्णय अचानक घेतलेला नसून, गेल्या काही महिन्यांपासून याबाबत चर्चा सुरू होती, असेही घाटगे यांनी नमूद केले.




# भारताचा न्यूझीलंड सोबत २४ एप्रिलला मुक्त व्यापार करार



■ नवी दिल्ली

**भारत** आणि न्यूझीलंड या दोन्ही देशांमध्ये शुक्रवार २४ एप्रिल रोजी दिल्लीत 'भारत मंडपम' येथे मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे. या व्यापार करारामुळे देशांतर्गत निर्यातदारांना न्यूझीलंडच्या बाजारपेठेत त्यांच्या मालासाठी शुल्कमुक्त प्रवेश मिळेल, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

या मुक्त व्यापार करारामुळे पुढील १५ वर्षांत २० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक येण्याची अपेक्षा आहे. गेल्यावर्षी २२ डिसेंबर रोजी दोन्ही देशांनी या करारा संदर्भातील वाटाघाटी पूर्ण केल्याची घोषणा केली होती. या करारामुळे भारताच्या वस्त्रोद्योगाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. या प्रवेशामुळे भारतीय वस्त्र निर्यातदारांना न्यूझीलंडमधील आपला बाजारहिस्सा वाढवण्यास मदत होईल. त्यामुळे या श्रमप्रधान क्षेत्रात संभाव्यतः अधिक निर्यात आणि रोजगार निर्मिती होऊ शकेल. याव्यतिरिक्त, हा करार इतर मुक्त व्यापार करारांमधील अशाच प्रकारच्या वचनबद्धतेशी सुसंगत आहे, जे जागतिक स्तरावर भारताच्या वस्त्र आणि तयार कपड्यांच्या निर्यातीला चालना देण्यावर लक्ष केंद्रित करतात.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# महाराष्ट्र सहकारी संघाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आ. दरेकरांची सहकार मंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य सहकारी संघाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आज सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयातील दालनात महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांच्यासोबत संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्र राज्य सहकारी संघाला गतवैभव प्राप्त करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. या बैठकीला राज्य सहकारी संघाचे पदाधिकारी, सहकार विभागातील अधिकारी उपस्थित होते.



या बैठकीत चर्चेवेळी दरेकर म्हणाले की, १९२० ते १९४२ पर्यंत राज्य सहकारी संघाला सरकारकडून अनुदान मिळत होते. सहकारी संस्थांनी नफ्यातून शिक्षण निधी संघाला देण्याची तरतूद कायद्यात केली गेली. त्यामुळे संघाला शिक्षण निधी मिळत होता. २०१३ ला कायदा दुरुस्ती करण्यात आली आणि हा

» पान २ वर

# वादग्रस्त अभियंता अंकित मिश्रा बुलेट ट्रेन प्रकल्पातून बदली

■ विरार

**वसई** विरार महापालिकेतील वादग्रस्त ठेका अभियंता अंकित मिश्रा याची बुलेट ट्रेन प्रकल्पातून अखेर बदली करण्यात आली आहे. मिश्रा याची बांधकाम घोटाळ्या प्रकरणी सक्तवसुली संचलनालयाने चौकशी केली होती.

अंकित मिश्रा हा ठेका अभियंता असून पूर्वी पालिकेच्या नगररचना विभागात कार्यरत होता. तत्कालीन माजी आयुक्त अनिलकुमार पवार आणि नगररचना संचालक वाय. एस. रेड्डी यांनी शहरात बांधकाम परवानगी देताना मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार केले होते. बांधकामाच्या प्रति चौरस फुटामागे पैसे आकारले जात होते. हा आर्थिक व्यवहार अंकित मिश्रा सांभाळत असल्याचा आरोप होता. त्याची सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) चौकशी केली होती. या आर्थिक देवाण-घेवाणीची त्याने कबुलीही दिली होती. त्यानंतर मिश्रा याची बांधकाम विभागात बदली करण्यात आली होती.

मात्र माजी आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी निवृत्त होण्यापूर्वी मिश्रा याची बुलेट ट्रेन प्रकल्पात बदली केली होती. या नियुक्तीला स्वराज्य अभियान पक्षाचे अध्यक्ष आणि माजी नगरसेवक धनंजय गावडे यांनी विरोध केला होता. बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या सुरक्षेला अशा वादग्रस्त अभियंत्यामुळे धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली होती. अखेर विद्यमान आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी मिश्रा याची बदली केली आहे.

# निनावी तक्रारींच्या आधारेच समीर वानखेडे यांची चौकशी

**एनसीबीची हायकोर्टात प्रतिज्ञापत्राद्वारे माहिती**

■ मुंबई

**केंद्रीय** महसूल अधिकारी समीर वानखेडे यांनी तपास केलेल्या दोन प्रकरणांमधील कथित अनियमिततेबाबत सुरू केलेले चौकशीचे सत्र हे निनावी तक्रारींवर आधारित होते. ते राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्या सांगण्यावरून नाही, अशी माहिती एनसीबी अर्थात केंद्रीय अमली पदार्थ नियंत्रण विभागाने उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राद्वारे दिली.

वानखेडे यांची प्राथमिक चौकशी दोन विशिष्ट आणि निनावी तक्रारींच्या आधारे सुरू केल्याची माहिती, एनसीबीचे उपमहासंचालक विशाल सानप यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे दिली. तसेच नवाब मलिक किंवा त्यांच्याकडून आलेल्या कोणत्याही सूचनेच्या अनुषंगाने ही चौकशी सुरू नसल्याचेही स्पष्ट केले. त्यांच्या याचिकेची न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने दखल घेतली.



त्यावेळी वानखेडेंचे वकील चव्हाण यांनी प्रतिज्ञापत्रावर प्रत्युत्तर दाखल करण्यासाठी वेळ मागितला. त्याची दखल घेऊन न्यायालयाने सुनावणी दोन आठवड्यांनंतर सूचीबद्ध केली. वानखेडेंविरोधातील दोन्ही तक्रारींमध्ये समाविष्ट असलेल्या आरोपांची पडताळणी आणि त्याबाबत चौकशी करण्याचा अधिकार तपास यंत्रणेकडे असल्याचेही एनसीबीने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. तसेच वानखेडेंची चौकशी अद्याप प्राथमिक टप्प्यावरच आहे.

वानखेडे यांना त्यांची बाजू मांडण्याची निष्पक्ष संधी मिळावी. कारण नैसर्गिक न्यायाचे तत्त्व हेच अपेक्षित असते, असेही त्यांना चौकशीसाठी बोलावल्याबाबत स्पष्टीकरण देताना नमूद केले. वानखेडे हे २०२४ पासून याचिका आणि इतर कायदेशीर प्रक्रियांचा अवलंब करून चौकशीच्या प्रक्रियेस विलंब करीत असल्याचा आरोप प्रतिज्ञापत्रात केला आहे.

# काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या मोहसिना किडवाईंचे निधन

■ नवी दिल्ली

**काँग्रेसच्या** ज्येष्ठ नेत्या आणि माजी केंद्रीय मंत्री मोहसिना किडवाई यांचे आज वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झाले. नोएडा येथे वृद्धापकाळाने त्यांची प्राणज्योत मालवली.

मोहसिना किडवाई या मागील काही काळापासून वयोमानानुसार होणाऱ्या आजारांनी त्रस्त होत्या. त्यांच्या कुटुंबियांनी आणि जावई राझी उर रहमान किडवाई यांनी त्यांच्या निधनाची माहिती दिली. आज पहाटे नोएडातील मेट्रो रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास दिल्लीतील निजामुद्दीन स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मोहसिना किडवाई या काँग्रेस पक्षातील अत्यंत आदरणीय नेत्या म्हणून ओळखल्या जात होत्या.



# भीमाशंकर मंदिर आता ३१ मेपर्यंत बंद राहणार

■ पुणे

**पुणे** जिल्ह्यातील भीमाशंकर मंदिर भाविकांसाठी आता ३१ मेपर्यंत दर्शनासाठी बंद राहणार आहे. यापूर्वी ९ जानेवारी ते ९ एप्रिलदरम्यान मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, विकासकामे पूर्ण न झाल्याने ही मुदत वाढवण्यात आली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर वाढणारी भाविकांची गर्दी, सुरक्षेचे कारण आणि सुरू असलेली विकासकामे लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी याबाबत माहिती दिली.

# युद्ध थांबवण्याचे श्रेय पाकिस्तानला हे मोदींचे सर्वात मोठे अपयश

■ मुंबई

**संजय राऊतांची टीका**

**अमेरिका-** इस्त्रायल-इराण युद्धबंदीचे श्रेय पाकिस्तानला, ही मोदी काळामध्ये भारताला मारलेली ही सगळ्यात मोठी चपराक आहे. हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अपयश आहे. सगळ्यात आधी जयशंकरसारख्यांचा राजीनामा घेतला पाहिजे, अशी टीका उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी आज केली.

संजय राऊत म्हणाले की, संपूर्ण जगाचा विध्वंस होईल अशा प्रकारचे युद्ध सुरू होते. हजारो लोक मारले गेले. पण इराण सारखा देश हा इस्त्रायल आणि अमेरिकेसारख्या महाशक्तींना शरण गेला नाही. ३५ दिवसांपेक्षा जास्त काळ अमेरिका आणि इस्त्रायला झुंजत ठेवले आणि जगात अमेरिका, इस्त्रायलविषयी जी फालतू भीती होती, ती इराणने मोडून काढली. देशासाठी कसे लढावे, राज्यकर्त्यांनी, जनतेने कसे बलिदान करावे हे इराणने जगाला दाखवून दिले. तरीही इराणचे नुकसान झाले. त्याहीपेक्षा इस्त्रायलचे नुकसान झाले आणि ट्रम्पसारख्या झुंड राष्ट्रप्रमुखाला धडा शिकवला. पण शेवटी युद्धात मध्यस्थ करण्याचे श्रेय पाकिस्तानला जाते. या निमित्ताने पाकिस्तान जगाच्या नकाशावर आले आहे.

# इच्छापत्र नोंदणीसाठी कस्टोडियन नियुक्त

**राज्य सरकारने ॲडव्हान्स मेडिकल डायरेक्टिव्ह अथवा 'लिव्हिंग विल'साठी संरक्षकांची नियुक्ती केली असून, या दस्तऐवजांच्या जतनासाठी आवश्यक प्रक्रिया निश्चित केल्या आहेत. व्यक्तींना त्यांची लिव्हिंग विल अपलोड करता यावी यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मही उपलब्ध करून देण्यात आला आहे. काल जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार शहरी विकास विभागाने सर्व महापालिका आयुक्त आणि नगर परिषदांच्या मुख्य अधिकाऱ्यांना लिव्हिंग विल सुरक्षित ठेवणे व त्यांची देखभाल करण्याची जबाबदारी दिली आहे.**




■ मुंबई

**ॲडव्हान्स** मेडिकल डायरेक्टिव्ह म्हणजे एखादी व्यक्ती गंभीर आजारी असताना किंवा शारीरिक अथवा मानसिक अक्षमतेमुळे स्वतःचे वैद्यकीय निर्णय घेऊ शकत नाही, तेव्हा भविष्यात कोणते उपचार घ्यावेत किंवा घेऊ नयेत उदा. व्हेंटिलेटर, कृत्रिम आहार याबद्दलची इच्छा ती व्यक्ती 'आधीच' या दस्तऐवजात लिहून ठेवते. रुग्ण स्वतः चे निर्णय घेण्यास असमर्थ असताना, त्याची स्वायत्तता आणि सन्मान टिकवून ठेवणे आणि कुटुंबीय किंवा डॉक्टरांवर निर्णयाचा बोजा न टाकणे हा याचा मुख्य उद्देश आहे. सर्वोच्च न्यायालयाने

» पान ७ वर

# राणा अय्युब यांची ट्विट जातीयवादी कारवाई करा! कोर्टाचे पोलिसांना निर्देश

■ नवी दिल्ली

**दिल्ली** उच्च न्यायालयाने पत्रकार आणि लेखिका राणा अय्युब यांच्या हिंदू आणि विनायक सावरकर यांच्यावरील ट्विट्ना अपमानास्पद आणि सांप्रदायिक ठरवत पोलिसांना कारवाईचे निर्देश दिले. राणा अय्युब यांनी २०१३ ते २०१७ दरम्यान ही ट्विट केली होती.

उच्च न्यायालयाने राणा अय्युब, एक्स आणि दिल्ली पोलिसांना नोटीस जारी करून संबंधित याचिकेवर उत्तर मागितले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी होणार आहे. वकील अमिता सचदेव यांनी दाखल केलेल्या याचिकेवरील या सुनावणीत न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौरव म्हणाले की, ही ट्विट अत्यंत अपमानास्पद, चिथावणीखोर आणि सांप्रदायिक आहेत. हा विषय तातडीने विचार करण्यासारखा आहे. दिल्ली पोलीस आणि केंद्र सरकार यांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे. सचदेव यांनी याआधी साकेत न्यायालयात राणा अय्युब यांच्या विरोधात फौजदारी कारवाईची मागणी केली होती.